रविवार, १५ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 15 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-147 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-18 ● PRICE-5

## उत्साह नामविस्ताराचा



औरंगाबादेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त राज्यभरातून आलेल्या आंबेडकरप्रेमींनी बाबासाहेबांना अभिवादन करीत जल्लोष केला.

## सिसोदियांच्या कार्यालयावर सीबीआयची छापेमारी!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांच्या दिल्ली सचिवालयातील कार्यालयावर सीबीआयने धाड टाकली आहे. खुद्द मनिष सिसोदिया यांनी याबाबत ट्विटरद्वारे माहिती दिली आहे. या छापेमारीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. आज पुन्हा एकदा सीबीआयचे अधिकारी माझ्या कार्यालयात आले आहेत. मी त्यांचे स्वागत करतो. त्यांनी माझ्या घरावर छापेमारी केली. कार्यालयातही छापेमारी केली. माझ्या लॉकरची तपासणी करण्यात आली.
माझ्या गावापर्यंत त्यांनी चौकशी केली. मात्र माझ्याविरोधात अद्याप काहीही सापडलेले नाही. भविष्यातही काही आढळणार नाही. कारण मी काहीही चुकीचे केलेले नाही. मी प्रामाणिकपणे दिल्लीतील मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून काम करत आलो आहे, असे मनिष सिसोदिया आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.
मागील वर्षी ऑगस्ट महिन्यातही मनिष सिसोदिया यांच्यासहित २१ ठिकाणी सीबीआयने छापेमारी केली होती. दिल्लीमधील उत्पादन शुल्क धोरणातील कथित अनियमिततेच्या संदर्भात ही छापेमारी करण्यात आली होती.

## सचिन पायलटांचे 'एकला चलो रे'

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राजस्थानमध्ये यावर्षी अखेरीस विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले जाणार आहे. राजस्थानात सत्तापालट करण्यासाठी भाजपाकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. अशातच माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आहे. सचिन पालयट यांनी राजस्थानमध्ये सभांचे आयोजन केले आहे. यामुळे पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी अद्यापही १० महिने बाकी आहेत. त्यापूर्वी सचिन पायलट हे पुढील आठवड्यापासून शेतकरी, युवकांना संबोधित करणार आहेत.

## मोसंबीवर मंगू रोगाचा प्रादुर्भाव; शेतकऱ्यांची वाढली चिंता

### संकटाची मालिका थांबता थांबेना; शासनाने मदत देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

बेग मुदशीर इस्माईल
घनसावंगी : मराठवाड्यातील सर्वात मोठ्या प्रमाणात अंबड व घनसावंगी तालुक्यात मोसंबीचे उत्पादन घेतले जाते. परंतु काही दिवसांपासून मोसंबीवर मंगू रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. यामुळे मोसंबी बागायतदारांची चिंता वाढली आहे. याआधी कोरोना संक्रमणाच्या वेळेस मार्केट बंद असल्याने शेतकऱ्यांना मोसंबी बांधावर तोडून फेकण्याची वेळ आली होती. कोरोना काळ संपत नाही तर अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या बागेतील मोसंबीची फळे अक्षरशःखाली गळून गेली होती. या संकटातून कसेबसे सावरत नाही तोच आता मंगू रोगाची चिंता मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना सतावत आहे. मागील तीन वर्षांपासून शेतकऱ्यांवर संकटांची मालिका लागोपाठ सुरूच आहे. कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. मोसंबी फळावर मंगूरोग पडल्याने मोसंबी काळी पडत आहे. परिणामी मोसंबी ही कवडीमोल भावाने मार्केटला विकली जात आहे. तर काही शेतकऱ्यांकडे मोसंबी काळी पडल्याने व्यापाऱ्यांनी पाठ फिरवल्याने बांधावर मोसंबी तोडून फेकण्याची वेळ आलेली आहे. शेतकऱ्यांना या संकट काळात शासनाने धीर देण्याची अतिशय गरज आहे. तसेच कृषी विभागाने पंचनामा करावा व त्यांना योग्य ती मदत देऊन या रोगावर योग्य उपाययोजना करण्याच्या सूचना कृषी विभागाच्या वतीने दिल्या पाहिजेत, अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहेत. असे असले तरीही अजूनही अतिवृष्टीच्या अनुदानाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेले नाहीत. या अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना लवकरात लवकर त्यांच्या खात्यावर जमा करून त्यांना या संकट काळात शासनाने धीर देण्याची गरज आहे.






जालना या भागात मोठ्या प्रमाणावर मोसंबीच्या बागा आहेत . मात्र या मोसंबी बागांवर अतिवृष्टीमुळे मंगू रोग पडल्याने उत्पादन तर घतलेच आहे . शिवाय भावही घसरले आहेत . मोसंबीला मिळणारा कमी भाव, यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत . याच चिंतेतून शेतकऱ्यांनी मोसंबीच्या बागा तोडण्याचा निर्णय घेत आहे . मात्र गेल्या दोन वर्षापासून दहा ते बारा रुपयाचा भाव मोसंबीला मिळाला आणि त्यातही अनेक रोगांचा प्रादुर्भाव झाडावर होत असल्याने त फळांची नासाडी झाली . **कचरू थोरात**



मेहनतीने वर्षभर मोसंबीच्या बागा जोपासायचा . फळांना आपल्या मुलाप्रमाणं जपायचं . लहरी निसर्ग आणि वेगवेगळ्या रोगांपासून वाचवण्याचा प्रयत्न करायचा . शेवटी एवढे सगळे करुन मोसंबी मार्केटमध्ये विक्रीला न्यायची आणि हाती निराशा घेऊन यायची हेच मोसंबी मोसंबी पिकाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचे सध्याचं वास्तव आहे . त्यात सरकार कडूनही शेतकऱ्यांना तोकडी मदत मिळाली आहे . **नारायण दवे**



आजुन अतिवृष्टीने झालेले नुकसानीचे अनुदान खात्यावर आलेले नाही अशातच आता मंगु रोगाने चिंता वाढवली आहे . मोसंबीला मिळणारा कमी भाव, यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत .मुलांची शिक्षण व घर खर्चा कसा करावा रावा याची चिंता आहे . कृषी विभागाने पंचनामा करून या मुंगू रोगावर योग्य ते उपाय योजना सुचवाव्यात . **श्रीकांत घाडगे**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल




आधुनिक केसरी

जशी आपली मायबोली तशीच देहबोली. मायबोलीत आपण भाषेचा म्हणजे शब्दांचा वापर करतो. तर देहबोली म्हणजे ' शब्दावाचून भाषा.' ज्ञानेश्वर माउलींच्या शब्दात सांगायचे तर देहबोली म्हणजे ' शब्देविण संवादू .' जशी आपली सावली सदैव आपली सोबत करते तशीच आपली देहबोली सदैव सावलीसारखी आपल्यासोबत असते. अगदी जन्मापासून. थोडक्यात म्हणजे ती आपल्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग असते.

तुमची देहबोली तुम्ही काही न बोलता तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल सांगत असते. म्हणून आपल्या देहबोलीबद्दल आपण जागरूक असले पाहिजे. हाच या लेखाचा उद्देशही आहे. आधी आपण काही उदाहरणे पाहू. खाली काही घटना दिल्या आहेत. त्या काय सांगतात बघा.

१. शंतनुच्या शाळेत आज त्याचा निकाल होता. तो घरी आला तोच गाणे गुणगुणत. आणि घरी आल्यावर तर त्याने उंच उडीच मारली. २. राहुल मंद पावलांनी चालत आला. त्याचे खांदे खाली झुकलेले होते. मान सुद्धा किंचित खाली झुकली होती. ३. ग्यानबा आपल्या शेताच्या बांधावर बसला होता. गुडघ्यात डोके खुपसून शांत बसून होता. ४. अन्विता वर्गात बसल्या बसल्या जांभया देत होती. सारखे घड्याळाकडे पाहत होती.

या वर दिलेल्या घटना किंवा प्रसंग आपल्याला फक्त त्या व्यक्तीच्या देहबोलीतून बरेच काही सांगून जातात. शंतनू कसा चालत आला, त्याने उडी मारली ही त्याची देहबोली आपल्याला त्याने काही न सांगता सुद्धा आपल्याला सांगून जाते की त्याने परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. राहुलची चाल आपल्याला तो निराश किंवा नाराज झाला आहे हे सांगते. ग्यानबाचे त्या अवस्थेतील बसणे आपल्याला सांगते की तो दु:खी झालेला आहे. तर अन्विताची देहबोली आपल्याला सांगते की तिला कंटाळा आला आहे. आपण केव्हा एकदा बाहेर जाऊ असे तिला झाले आहे.



## आनंदी पहाट

## अंतर्मनावर तणाव येऊ देऊ नये

आधुनिक केसरी

आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. अनेकदा अविचारानं अथवा विचाराशिवाय कृती केल्यानं पश्चातापाची वेळ येते. ती केवळ तापदायकच नव्हे तर घातकही ठरू शकते. मनांत येणारा प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहाराला कारणीभूत ठरत असतो. आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा संबंध आपल्या अंतर्मनावर कोरल्या गेलेल्या विचारांशी असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एखाद्या व्यक्तीचे यश देखील आपल्या मनांत नकारात्मक विचार निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकते. अलीकडच्या काळांत अल्पवयीन मुले-मुली नैराश्याचे शिकार होताना दिसत आहेत. नकारात्मक विचारांचं पर्यवसान रागात, उद्वेगात आणि कालांतरानं गुन्हेगारीत होण्याचं प्रमाण अलीकडच्या काळांत खूपच वाढल्याचं दिसून येत आहे. ही अतिशय खेदाची आणि चिंतेची बाब आहे. आपल्या व्यक्त होण्यातून सकारात्मक वातावरणाची निर्मिती करणं जरुरीचं असतं. सकारात्मक विचारमंथन हे नेहमीच उर्जा देणारे ठरत असते. त्याचा थेट परिणाम आपल्या व्यक्तिमत्वावर होत असल्याची अनुभूती येत असते. त्यासाठी आपलं व्यक्तिमत्व व्यक्त राहू नये.

मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, मानसिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असतं. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो ? यावर ते अवलंबून असतं. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया

अनावधानानं बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात.

## जिव्हाळा...

आधुनिक केसरी


घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती तिथे असावा प्रेम जिव्हाळा.. घराच्या बाबतीत या ओळी अगदी चपखल बसतात. चार भिंतीचे घर तर कोणीही बांधतो, पण त्या भिंतींनाही ओलावा असावा .तिथल्या माणसात जिव्हाळा असावा. हा जिव्हाळा कोणी निर्माण करायचा ? कसा निर्माण करायचा? आजी आजोबा, आई वडील, काका काकू, बहीण भाऊ, आत्या मावशी या सर्वांनी आपल्या नात्यात प्रेम, ओलावा ,जिव्हाळा, ओढ निर्माण करावी. घरातील कोणी एखादी व्यक्ती बाहेरगावी गेली तर त्यांच्या आठवणीने आपण बैचन व्हावं. नाहीतर "बरी गेली पिडा" असं कोणी म्हणायला नको. अशाश्वत गोष्टींचा हव्यास करण्यापेक्षा शाश्वत जे आहे ते ओळखा, ते जपायला शिका. संपत्तीचा हव्यास करण्यापेक्षा ज्ञानाचा हव्यास करा. संपत्ती पेक्षा ज्ञान निश्चितच मोठे आहे. ज्ञानाने मान मिळतो. ज्ञान असेल तिथे लक्ष्मी असतेच. आणि नसली तरी तिचा फारसा उपयोग होत नाही. पण ज्ञानाचा उपयोग कुठेही होतो .प्रेम जिव्हाळा तोच शिकवतो. ज्ञानच सांगते की माणूस म्हणून जन्माला आला ना! मग माणसासारखं वाग.. तसं जग. सारखं सारखं मरण बरं असं म्हणू नको. हा जन्म पुन्हा नाही. काहीतरी पुण्याई म्हणून हा जन्म मिळाला. म्हणून घरातील प्रत्येकाने एकमेकांशी खूप प्रेमाने, जिव्हाळ्याने वागा." शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी ". बाभळीचे झाड लावले तर काटेच उगवणार. आंब्याची कोय लावली तर सुंदर आंब्याचे झाड येऊन त्याच्या पानांचा फळांचा साराच उपयोग होतो .तसेच जर आपल्याशी कोणी जिव्हाळ्याने वागावं असं वाटत असेल तर आधी आपण जिव्हाळा पेरला पाहिजे. पेरलाच नाही तर उगवेल कसं ? आणि खडकावर पेराल तर कधीच उगवणार नाही. सुपीक जमिनीत पेरून त्याला वेळच्यावेळी खत पाणी देत रहा .आपल्या लहान लेकरांशी नेहमी खूप जिव्हाळ्याने वागा. तेही तुमच्याशी तसंच वागतील. मोठ्यांचा मान राखा. लहानांचा आदर करा. जिव्हाळ्याचे कारंजे सतत बागडू द्या . नको नेहमीच उन्हाळा असू द्या थोडा पावसाळा फुलेल आपोआप जिव्हाळा....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-57




## निरुपण

आधुनिक केसरी

**सृजन, स्थिती आणि प्रलय या सर्वत्र अव्याहतपणे चालणाऱ्या अपरिहार्य प्रक्रिया आहेत. त्यांची बेरीज म्हणजे ईश्वर. माणूस मात्र त्यांच्या अनुकूलतेस 'देव' तर प्रतिकूलतेस 'दानव' म्हणून संबोधतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**क्रियाशील माणूस यशस्वी होईल याची खात्री देता येते पण यशस्वी माणूस क्रियाशील राहील याची देता येत नाही.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**देव भूत नक्षत्र सब, अखिल विश्व ब्रह्माण्ड । आश्रित गति है जाहि से, वाणी आदि हेमाण्ड ।।९१।। (स्वर्वेद पंचम मंडल अष्टम अध्याय) ०५/०८/९१**

**मराठी अनुवाद :** तेजोमय अण्ड, आदि वाणी तथा वेद, पंचभूत, समस्त नक्षत्र तसेच अखिल विश्व ब्रह्मांड ज्याच्या आधारावर आश्रित होऊन गती प्राप्त करत आहेत, तोच आराध्य महाप्रभू आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

माणूस कितीही मोठा असला तरी त्याला व्यावहारिक जगात वावरावे लागते. मी खुपच देवधर्म केला तर मला आता जेवण करण्याची गरज नाही . असं कोणी म्हणणार नाही व्यावहारिक जगात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अर्थार्जनासाठी करावेच लागते. म्हणजेच प्रपंच व परमार्थ किंवा बध्द। व मुक्त यांचा देहाच्या परिस्थितीशी संबंध नाही हे लक्षात ठेवावे. बध्दपणा व मुक्त पणा या जीवाच्या अवस्था आहेत. त्या प्रत्येकाने अंतर्यामी अनुभवायच्या असतात. अगदी मोठा सत्पुरुष जरी असला तरी त्याला देहाने जगात वावरावे लागते. ज्या जगात बध्द बध्द पणाने जगतो त्याच जगात मुक्त मुक्तपणास बाधा न येता रहातो. जगांत वावरण्याने मुक्त अवस्था भ्रष्ट होत नाही. तर जगात रमण्याने ती भ्रष्ट होते. वावरणे व रमणे यातील फरक या ठिकाणी लक्षात घ्यायला हवा. बध्दाला देहबुद्धीच्या बळाने स्वस्वरूपाचा स्पर्श नसतो तर मुक्ताला आत्मबुध्दी च्या बळाने द्रुष्य विश्वाचा स्पर्श नसतो. द्रुष्यविष्व हेच संपूर्ण सत्य मानून बध्दाचे मन मीपणाने वावरते. तर आत्मस्वरूप ब्रम्ह हेच संपूर्ण सत्य मानून मुक्ताचे मन उन्मन होऊन वावरते. शुध्दब्रम्ह निरूपण अभ्यासताना आपण पाहिले आहे की ब्रम्हाच्या ठिकाणी देहबुद्धी व आत्मबुध्दी दोन्हीही नाहीत. ते स्वतः सिध्द असल्याने त्याला बध्दपणा नाही व मुक्त पणाही नाही. पण आपणं त्याच्या विविध प्रकारच्या लक्षणावरून अभ्यासू शकतो की हा विचार फक्त मानवी देहालाच लावला जातो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम घेण्याला काहीही आड येत नाही

आधुनिक केसरी

आपण असे पाहू की, नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून, कोणत्याही तर्‍हेच्या शंका-कुशंका न घेता,



कशाही तर्‍हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही.

जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, ' देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो. ' प्रह्लाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. ' देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. ' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंतःकरणात समाधान ठेवावे.

**आजचे बोधवचन आहे – जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

नामयोगी असलेले माझे सद्गुरू श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज सांगतात, "नाम सदा बोलावे, गावे, भावे जनासी सांगावे"मुखातनामयेणे किंवानामस्मरणकरावेसे वाटणे हेचमुळात मोठे पुण्यआहे. मानवदेहधारीअसलेलाजीवचफक्तनाम घेऊशकतो, बाकीइतरयोनींतीलजीवांना हीसुविधाउपलब्धनाही आणित्यामुळे नाम घेण्यासाठीच जीवाला मनुष्यदेहप्राप्त झाला आहेस असे सर्व संत सांगतात.



राष्ट्रपतीपदक
विजेत्या तमाशा
सम्राज्ञीस समर्पित
तीन कविता
पान 14

# आधुनिक केसरी

पूजनीय
सरसंघचालकांचा
मोलाचा सल्ला !
पान 11



३

रविवार, १५ जानेवारी २०२३



# लासूर स्टेशनला संक्रांतीचे अनोखे वाण! सासूने किडनी देऊन वाचवले सुनेचे प्राण!

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे संक्रातीच्या पुण्यपर्वकाळावर एक अनोखा प्रसंग घडला असून सुनेला सासूने किडनी दान देऊन एकप्रकारे संक्रांतीचे अनोखे वाण दिले. सासूने स्वतःची किडनी देऊन सुनेचे प्राण वाचवले आहेत. त्यामुळे लासूर स्टेशन परिसरातील गावांत या सासूचे कौतुक होत आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, लासूर स्टेशन येथील सासू रत्नाबाई रमेश जयस्वाल यांच्या सून योगीता संजय जयस्वाल यांना किडनी प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे किडनी दान करणारा दाता सापडण्याचे आव्हान जैस्वाल



कुटुंबांपुढे दत्त म्हणून उभा ठाकले होते. मात्र योगीता यांच्या सासू रत्नाबाई यांनी लेकाच्या संसाराची घालमेल पाहून किडनी दान करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. तामिळनाडू राज्यातील कोईमतूर येथील कोवई मेडिकल सेंटर अँड हॉस्पिटल येथे डॉ. विवेक पाठक यांनी अखेर संक्रांतीच्या पूर्वसंधेला सासूची किडनी सुनेला प्रत्यरोपण करून सासूही सुनेला लेकीप्रमाणे जीव लावू शकते, याचे अप्रतिम आदर्श उदाहरण जगासमोर ठेवले आहे. राष्ट्रमाता जिजाऊ, माता रमाई, माता सावित्री, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या महाराष्ट्रातच असा प्रसंग घडू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण सासू- सुनेच्या या प्रसंगाने दाखवून दिले आहे.



## उर्फी जावेदने पोलिसांकडे नोंदवला जबाब

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चित्रविचित्र कपड्यांमुळे नेहमीच चर्चेत असणारी उर्फी जावेद अडचणीत आली आहे. सार्वजनिक ठिकाणी अंगप्रदर्शन केल्यामुळे उर्फीला मुंबई पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. भाजपा नेत्या चित्रा वाघ यांनी सोशल मीडिया सेन्सेशन उर्फी जावेदच्या कपड्यांवर आक्षेप घेत तिच्याविरोधात मुंबई पोलिसांत तक्रार दाखल केली होती. मुंबई पोलिसांनी तक्रारीची दखल घेत उर्फीला नोटीस बजावली. आज (१४ जानेवारी) उर्फीला अंबोली पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलवले होते. नग्नता तसेच अश्लीलतेचा प्रचार करत असल्याचा आरोप चित्रा वाघ यांनी उर्फीवर केला होता. नुकतंच उर्फीने अंबोली पोलीस ठाण्यात येऊन स्वतःचा जबाब नोंदवला आहे.

जबाबात उर्फी म्हणाली की, मी एक भारतीय आहे, मला माझ्या आवडीचे कपडे परिधान करायचा पूर्ण अधिकार आहे. भारताच्या राज्यघटनेने मला हा अधिकार दिला आहे. शिवाय मी माझ्या कामाच्या अनुषंगाने हे कपडे परिधान करते. त्यावरून माझे फोटोशूट होते, कधीकधी कामाच्या गडबडीत मला कपडे बदलायला वेळ मिळत नाही तेव्हाच फोटोग्राफर बाहेर येऊन फोटोज काढतात आणि ते व्हायरल होतात. आता हे व्हायरल होणारे फोटो मी कसे थांबवणार? असा उलट प्रश्नच तिने या जबाबात विचारला आहे. एकूणच उर्फी आणि चित्रा वाघ यांच्यातील एक प्रकरण दिवसेंदिवस चिघळत आहे.

## जीवघेणा मांजा



मांज्यामुळे कबुतराचा जीव टांगणीला.. औरंगाबादच्या उत्तरानगरी भागातील फोटो शूट केला आहे आधुनिक केसरी परिवारातील लेखक बाळासाहेब जोगदंड यांनी.

## ४० चेहरे पुन्हा दिसणार नाहीत : आदित्य

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** मागील सहा महिन्यांत राज्यात नवे वाद-विवाद निर्माण झाले, गद्दारीची भावना निर्माण झाली, राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात पळविले. हे सर्व राज्यात घडत असताना शिवसेनेत नवे चेहरे निर्माण होत आहेत. निष्ठावंत शिवसैनिक पुढे येत आहेत. सुकलेली पाने गळून गेली आहेत. त्यामुळे राज्यातील अल्पआयुचे आणि खोके सरकार दोन ते तीन महिन्यात कोसळणारच अशी टिका आमदार आदित्य ठाकरे यांनी केली. ४० जणांनी व्ही.आर.एस. घेतला असून त्यांचे चेहरे पुन्हा महाराष्ट्रात दिसणार नाही, असेही ठाकरे म्हणाले.

ठाण्यातील घोडबंदर भागात शनिवारी ठाकरे गटाच्या वतीने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. राजकीय कार्यक्रम, मेळावे होत असतात. ज्या व्यक्तिला आम्ही पुढे आणले. त्या एका गद्दाराने राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात पळविले, याची लाज वाटते. असे आदित्य म्हणाले. मागील सहा महिन्यांत जिथे कुठे कार्यक्रम असतात. तिथे एकच कॅसेट त्यांच्याकडून वाजत असते, असाही आरोप त्यांनी केला.

राज्यात नवे वाद-विवाद निर्माण झाले, गद्दारीची भावना निर्माण झाली, राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात पळविले. हे सर्व राज्यात घडत असताना नवे चेहरे निर्माण होत आहेत. निष्ठावंत शिवसैनिक पुढे येत आहेत. त्यामुळे राज्यातील अल्प आयुचे हे खोके सरकार कोसळणारच असेही ते म्हणाले. ४० जणांनी व्ही.आर.एस. (स्वेच्छा निवृत्ती) घेतला असून त्यांचे चेहरे पुन्हा महाराष्ट्रात दिसणार नाही, असेही ठाकरे म्हणाले. सत्ताधाऱ्यांचा राजकीय वर्ग हा तुम्हाला धर्मा-धर्मात, जाती-जातींमध्ये भांडवित आहेत. मागील सहा महिन्यांत मोघलशाही सुरु असल्याचे चित्र आहे. निवडणूका जाहीर केल्या जात नाहीत. शेतकऱ्यांचा आवाज दाबला जात आहे, असेही आदित्य म्हणाले. ज्या चाळीस गद्दारांना आयुष्यात सामाजिक आणि राजकीय ओळख दिली. निवडून आणले, मोठी मंत्रीपदे दिली. पण ज्यावेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यावेळी हे एका टेबलवर चढून नाचत होते, अशी घाणेरडी लोक आज सत्तेवर बसले आहेत. अशी टिकाही आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटातील आमदारांवर केली.

## बाजारात भेसळयुक्त कुंकाची विक्री

### सुवासिनींना होऊ शकतात त्वचेचे आजार

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** हिंदू धर्म मध्ये कुंकू हे मांगल्याचे प्रतीक आहे. जरी दैनंदिन काळामध्ये स्त्रिया टिकलीचा वापर करत असतील. तरीही सणासुदीमध्ये, लग्न समारंभात, देवपूजा व कार्यक्रमात कुंकवापासून सुरवात होते. घरातील देवपूजेचे इतर कोणत्याही समारंभ कुंकवा शिवाय असतात. रघुवंशात, श्रृंगार शतकात, अमृ शतकात कुंकूम तीलकाचा उल्लेख आढळतो. आजही महाराष्ट्राच्या कोणत्याही देवळाच्या बाहेर स्टॉलमध्ये कुंकवाच्या मोठ्या मोठ्या राशी विक्री दिसतात. हिंदू स्त्रिया नवे वस्त्र वापरायला काढताना त्याला प्रथम कुंकू लावतात. कुंकू हे सुवासिनीने सुवासिनीला सौभाग्याचं लेणं म्हणून लावलं जातं.

सौभाग्यवती स्त्रियांनी कुंकू दान आवर्जून करावे असेच संकेत शास्त्रामध्ये आढळतात.

**"कुंकूम शोभन रम्य सर्वदा मंगलप्रदम |**
**दानेनास्य महत्सौख्य स्यात सदा मम ||"**

कुंकू है शोभिवंत रम्य मंगलप्रद त्याच्या दानाने मला महासौख्य व सौभाग्य प्राप्त व्हावे. पूर्वीच्या बायकांनी कुंकू लावायची प्रथा चालवून बायकांचे आरोग्य सांभाळलं, व्यवसाय केला नाही.

कुंकू हे हळदी पासून तयार केलेल असावं परंतु सध्याच्या काळात कुंकू हे दर्जेदार राहिलेले नाही. सणासुदी मध्ये वाढलेली मागणी आणि



मिळणारा नफा या दोन्हीचा विचार करून अधिकच्या नफ्यापोटी कुंकवामध्ये अतिशय घातक कलर वापरून बाजारात ग्राहक म्हणून आलेल्या स्त्रियांना आकर्षित करण्यासाठी रंगदार कुंकू विकण्याची प्रथा सुरु झाली आहे. बाजारात स्वस्त कुंकवाच्या नावाखाली केमिकल युक्त कलर वापरून आपली गडद लाल कुंकू मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. ते कुंकू स्त्रियांच्या त्वचेसाठी हानिकारक ठरू शकते यामुळे कपाळावरती काळा डाग पडणे, कपाळ खाजवणे या प्रकारचे विविध त्वचेचे विकार होऊ शकतात. असे त्वचेचे आजार टाळण्यासाठी स्त्रियांनी भेसळयुक्त कुंकू न घेता नैसर्गिक पद्धतीने बनवलेल् कुंकू बाजारातून विकत घ्यावे. नैसर्गिक पद्धतीने बनवलेले कुंकू ओळखण्याची पद्धत म्हणजे नैसर्गिक कुंकवाला हळदीचा वास येतो, तसेच कुंकू हातावर घेऊन त्यावर ओला चुना चोळला तर ते काळे होते. जर कुंकू मध्ये रंगाची भेसळ असेल तर ओला चुना मिसळल्यानंतरही भेसळ युक्त कुंकाचा रंग लालच राहतो.




# वारसदारांचे राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**समाजाला प्रगतीपथावर घेऊन जाताना आपला स्वतःचा विकास किती साधावा ह्यास काही मर्यादा हवी. विश्वस्त म्हणून काम करताना मालकी गाजवणे लोकशाहीस मारक आहे. लोकशाहीमध्ये या मालकी हक्कातूनच वारसदारांचे राजकारण फोफावत असते. कार्यकर्त्याने आयुष्यभर जिंदाबाद मुर्दाबाद म्हणायचे, सतरंज्या उचलायच्या आणि मालकाच्या नंतर मालकाच्या पोराने मालकाची परंपरा वारसाहक्काने पुढे चालवायची. भारतीय राजकारणात अशी हजारो उदाहरणे सापडतील. त्या विरोधात ब्र सुद्धा काढणे म्हणजे विरोधी असणे, असे गृहीत धरले जाते.**

राजकीय वारसदारांची परंपरा निर्माण होण्यामागे काही कारणे आहेत. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्यातील परंपरा शरणता. यास तुम्ही गुण, अवगुण, लक्षण, वैशिष्ट्य काहीही म्हणू शकता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर थोडाबहुत अपवाद सोडला तर एकाच कुटुंबात सत्ता असणारी अशी कित्येक घराणी सर्वांना तोंडपाठ आहेत. उदाहरणे देऊन जागा व्यापू इच्छित नाही. राजकारणात पहिल्या पिढीने स्वकर्तृत्वावर स्थान प्राप्त करणे यास वैचारिक, पक्षीय किंवा धोरणात्मक विरोध असू शकतो, तो कोणीही समजून घेईल; परंतु कर्तृत्ववान बापाच्या पोटी कितीही नालायक पुत्र निपजला तरी तो साहेबच समजला पाहिजे, हे मात्र विवेकास धरून होणार नाही. म्हणजे सर्वच राजकीय वारसदार नालायक असतात असे म्हणता येत नाही. काही बाप से बेटा सवाई असेही असू शकतात. परंतु केवळ तेच लायक असतात आणि राजकारण त्यांनीच करावे असे काही विधिलिखित आहे का? एक मतदार म्हणून सामान्य माणसाने याचे भान सदोदित राखले पाहिजे. या ठिकाणी आपले हृदय अधिक विशाल करून इतरेजनांना देखील राजकारणात संधी कशी प्राप्त होईल, हे समाजानेच पाहिले पाहिजे. आपल्याकडे प्रत्येक गोष्टीचे मोल करण्याचे एक दुष्ट षडयंत्र सातत्याने चालत असते. आपल्या मताधिकाराचेही मग आम्ही मोल करू लागतो. या मताची किंमत किती असावी, हे प्रत्येकाच्या वकुबानुसार बदलत असते. प्रत्येकजन दारूच्या बाटलीला आणि मटणाला विकेलच असे काही नाही. त्याला भावनिक साद कदाचित मनपरिवर्तनास उपयुक्त ठरणारी असू शकते. सहानुभूती हा चांगला गुण असला तरी निवडणुकीच्या राजकारणात यामुळे समाजाची हानी होत नसली तरी आपण एका अनिष्ट प्रथेला जन्मास घालतो आहोत, हे समजून घेतले पाहिजे. पूर्वीच्या काळी म्हणजे राजेशाहीमध्ये वगैरे कायदे करणाऱ्यास कायदा लागू होत नसे. काही अपवाद वगळले तर आज अशी कोणती परिस्थिती बदलली आहे? कारण राजेशाहीत पितापुत्रांची एक सलग परंपरा आपणास दाखवता येते, तर लोकशाहीमध्ये यात असा कोणता बदल झाला. पूर्वी धाकदपटशहा दाखवून सत्ता सांभाळली जायची. आज अनेक प्रलोभने दाखवून, सहानुभूतीने हे कार्य पार पाडले जाते. लोकशाहीत मतदाराला राजा म्हणायचे आणि गोड बोलून हवे ते साध्य करायचे, हे ठरलेलेच आहे. खरेतर कोणालाही राजा म्हणण्याची आवश्यकता नाही, परंतु आमच्या मानगुटीवर बसलेले राजेशाहीचे भूत काही उतरत नाही. कफ्फलकाला राजा म्हणून मोठेपणा द्यायचा आणि पुढची पाच वर्षे त्यास आणखी कफ्फलक बनवत रहायचे हे धोरण लोकशाहीत विसंगत ठरते, हे आपल्या गावीही नसते. महात्मा गांधींनी सत्याच्या आग्रहास्तव राजकारण हे सूत्र भारतीयांना प्रदान केले आहे. यात सर्व आले. सत्याचा मार्ग कौटुंबिक वारसापद्धतीतून जात असेल तर हा सत्य शोधनाचा कोणता प्रकार म्हणावयाचा, याचा विचार मतदाराने करणे गरजेचे आहे. निवडणूक मग कोणतीही असो तेथे वारसदार दत्त म्हणून उभा आहेच. चूक त्यांची नाहीच. कार्यकर्त्यांच्या नालायकपणातून आणि हुजरेगिरीतून राजकीय वारसदारांची पैदास होत असते. आणि कार्यकर्त्यांना कसे सांभाळायचे, पोसायचे हे वारसांना वारसाहक्काने पक्के ठावूक झालेले असते. त्यामुळे भारतीय राजकारणात आपण कितीही कपाळमोक्ष करून घेतला तरी जोपर्यंत कार्यकर्ते आणि मतदार जागे होणार नाहीत तोपर्यंत हे असेच चालू राहणार. त्याला इलाज नाही. कारण राजकीय वारसदारांना निवडणुकीपासून कायद्याने दूर करू शकत नाही. कोण कोठे जन्मावे हे थोडेच कोणाच्या हाती असते. त्यांनाही व्यक्तिस्वातंत्र्य आहे. फरक एवढाच की, त्यांच्या




व्यक्तिस्वातंत्र्याचा परीघ सामान्य कार्यकर्ता आणि मतदारांपेक्षा अधिक मोठा असतो एवढेच. आमच्यात स्वातंत्र्य, क्रांतीकारकत्व अथवा एकूण लोकशाहीची मूल्ये रुजायला हवी होती त्याप्रमाणात रुजलीच नाहीत. लोकशाही म्हणजे फक्त साहेबांना अथवा त्यांच्या वारसांना निवडून देणे, हे आपले इतिकर्तव्य समजून बसलो आहोत. मग हीच मंडळी अगदी कायदेशीरदृष्ट्या स्वतःची माया जमवण्यात आणि आपल्या वारसांना पुढे आणण्यात मशगूल असतात. भारतीय लोकशाही समाजवादी पद्धतीने चालावी ही फक्त अपेक्षाच राहते. कारण समाजवादात सत्तेचे विकेंद्रीकरण महत्त्वाचे असते. अशी विकेंद्रीत सत्ता आज पहावयास मिळते का? हा कळीचा प्रश्न आहे. सामान्य माणसाच्या व्यक्तिवादी श्रद्धेतून सत्तेची वतने निर्माण होत जातात आणि आपण परिघाबाहेर ढकलले जातो. ज्यांना भारतीय इतिहास, भूगोल काय आहे याची साधी कल्पना देखील नसणारे केवळ वारसा आहे म्हणून निवडून येतात. राजकीय पक्ष अशा वतनदार वारसांना हाताशी धरून आपल्या मानगुटीवर बसवणार. मग हेच वारसदार सभागृहात गेल्यानंतर आपल्या प्रश्नावर बोलण्याऐवजी धन्याचे बोल पोपटासारखे बोलतात. यावर उत्तर काय? सत्ताधाऱ्यांचा वारसदार कितीही कर्तबगार असला तरी - तशीही त्यांची कर्तबगारी म्हणजे सुरुवातीच्या काळात फक्त वारसाच असतो - मतदारांनी अशा कोणत्याच उमेदवारांना निवडून न देणे, हे त्यावरील एकमेव उत्तर असू शकते. कारण दोष त्यांचा नसला तरी वारसदारांच्या वाडवडिलांनी सत्तेची चव चाखलेली असते व पर्यायाने वारसाहक्काने वारसदारही त्यापासून अलिप्त राहत नाही. ही वारसदारांची बांडगुळं सुसंस्कृत समाजाला आणि लोकशाहीला परवडणारी असू शकत नाहीत. सामान्य कार्यकर्ते आयुष्यभर तसेच खितपत पडू द्यायचे नसतील तर आपणांस विचार करावाच लागेल. भारतीय लोकशाही जगात सर्वात मोठी लोकशाही असल्याने आपल्याकडे सर्व जगाचे लक्ष असते. आपल्यात सुधारणा करू या आणि सर्वार्थाने लोकशाही बळकट करू या.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# 15 जानेवारी आर्मी दिन



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क 9320441116

आधुनिक केसरी

**देशात दरवर्षी 15 जानेवारी आर्मी दिन म्हणजेच सैन्य दिवस म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारताचे पहिले सेनाध्यक्ष के.एम.करियप्पा यांनी या दिवशी त्यांच्या पदाचा स्वीकार केला. भारतातील ब्रिटीश कमांडर इन चिफ जनरल सर फ्रान्सिस बचर यांच्याकडून करियप्पा यांनी सूत्रे हाती घेतली होती. या ऐतिहासिक क्षणानिमित्त १५ जानेवारी हा सैन्य दल दिवस म्हणून साजरा केला जातो.**



राष्ट्रीय सुरक्षा व एकता अबाधित ठेवणे , परकीय तसेच अंतर्गत आक्रमणांपासून देशाचे रक्षण करणे, सीमेवर सुरक्षा व शांतता कायम ठेवणे ही भारतीय लष्कराची प्रमुख कर्तव्य आहेत. भारतीय लष्कर नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर असते. भारतीय लष्कर हे जगातील एक मोठे सैन्य आहे. भारतीय लष्कर आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक पद्धती, आधुनिक शस्त्रास्त्रे यांचा सतत अभ्यास व वापर करून स्वतःला सक्षम बनवत आहे. भारतीय लष्कर दल हे प्रत्येक भारतीयासाठी गौरवशाली आणि अभिमानास्पद आहे. प्रत्येक शत्रू पक्षाच्या हल्ल्या प्रसंगी निर्भयपणे भारतीय जवानांनी शत्रुचा पराभव केला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशामध्ये शांतता प्रस्थापित करण्यामध्येही जवानांचा सहभाग आहे.

युद्ध असो वा नसो, रक्त गोठविणाऱ्या थंडीत, उष्ण वाळवंटामध्ये आणि दाट जंगल परिसरामध्ये डोळ्यात तेल घालून रात्रं-दिवस आपल्या देशाचे जवान देशप्रेमापोटी देशाच्या सीमांचे आणि सर्व भारतीयांचे रक्षण करीत असतात. या सर्वांची जाणिव आणि कृतज्ञता म्हणून दर वर्षी 15 जानेवारी रोजी सैन्य दिवस साजरा केला जातो. त्यानिमित्त आपली राजधानी नवी दिल्ली आणि सैन्याच्या सर्वच प्रमुख कार्यालयात परेडसह इतर अन्य कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सैन्य दिनानिमित्त भारतीय लष्करासंबंधी प्रमुख बाबी पुढील प्रमाणे आहेत.

**भारतीय सैन्याची स्थापना** – कोलकाता येथे 1776 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने सरकारच्या कारभारात भारतीय सैन्याची स्थापना झाली. भारतीय सैन्याच्या 53 छावण्या आणि 9 सैन्य तळ आहेत. भारतीय सैन्यात सैनिक आपल्या इच्छेने सहभागी होतात. भारतीय लष्कराचा पायदळ विभाग - हा विभाग भारतीय सशस्त्र सेनेचा एक मोठा घटक आहे. भारताचे राष्ट्रपती हे भारतीय लष्कराचे सरसेनापती आहेत आणि लष्करप्रमुख सेनेचे संपूर्ण नियंत्रण करतात. **सर्वात उंच युद्धभूमी** – समुद्रसपाटीपासून तब्बल 5 हजार मीटर उंचीवर असलेले भारतातील सियाचीन ग्लेशियल हे जगातील सर्वात उंच रणमैदान आहे. आसाम रायफल 1835 या वर्षी स्थापन झालेली आसाम रायफल ही देशातील सर्वात जुनी पॅरामिलिट्री फोर्स आहे

जगातील सर्वात उंच पूल सन 1982 मध्ये भारतीय सैन्याने हिमाचल प्रदेशमधील द्रास आणि सुरू नदीच्या मध्यभागी लद्दाखच्या पर्वतरांगामध्ये बेल पुल हा जगातील सर्वात उंच पूल बांधला आहे. नौसेना अकॅडमी आशियातील ही भारतीय प्रकारातील सर्वात मोठी अशी भारतीय नौसेना अकॅडमी, केरळमधील एझिमाला येथे आहे. **गुप्तचर विभाग** – सन 1941 मध्ये डायरेक्टोरेट ऑफ मिलिट्री इंटेलिजन्स नावाने भारतीय सैन्याची गुप्तचर यंत्रणा स्थापना झाली. सैन्य दलातील भ्रष्टाचार आणि सीमा रेषेवर गुप्त माहिती मिळविण्यासाठी हा विभाग कार्यरत आहे. भारतीय सैन्यांच्या बलिदानाचे आणि शौर्याप्रती आदर व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे. सैन्य दिनानिमित्त समस्त भारतीय लष्कर दलाला आपल्या सगळ्यांतर्फे नतमस्तक होऊन अभिवादन!

# संतांच्या संगतीने जीवनाचा उद्धार

आधुनिक केसरी

मानवी जीवन जगत असताना संगतीला फार महत्त्व आहे.संताच्या संगतीमध्ये राहिल्याने जीवनाचा उद्धार होतो. जगद्गुरु तुकोबाराय सांगतात संत चरणरज सहज जरी आपल्या कपाळी लागलं तरी आपल्या जीवनातली इच्छा, वासना समुळ बिजासहित नष्ट होते आणि रामनामाची आवड वाढीस लागून जीवनामध्ये ज्या सुखाची गरज आहे ते सुख घडो घडीला वाढू लागते. भगवंताबद्दल प्रेम निर्माण होते आणि हृदयामध्ये असलेला भगवंत त्याची अनुभूती आपल्याला येते. संताच्या संगतीमध्ये राहिल्याने आशा नावाचा पाश तुटून जातो म्हणून संत संगती करणे हे फार गरजेचे आहे. संत या जगात एकटे आले फायदा सर्वांचा झाला .जगाच्या कल्याणा संताच्या विभूती । देह कष्टविती परोपकारे ।। संत या जगात येतात ते लोकांचे हित करण्याकरता. रात्रंदिवस लोकांचे कल्याण कसे होईल ? हाच एक विचार घेऊन संत आपलं कार्य करत असतात .संतांनी सामान्य जगाला जागा केलं संतांनी संताला जागं केलं, संतांनी देवाला सुद्धा जागा केली आहे. संत हे सर्वज्ञ असून निर्जीव गोष्टीवरही संताचा अधिकार आहे. माऊली महावैष्णव ज्ञानोबारायांनी निर्जीव असणारी जड भिंत चालवली .रेड्याला बोलायला लावलं ज्ञानेश्वरी सारखा धर्म कीर्तन असणारा ग्रंथ जगाला सांगितला संताचे आपल्यावर फार उपकार आहेत . ढेकणाच्या संगतीमध्ये जर हिरा आला तर तो नष्ट होतो . म्हणून चांगल्याच्या संगतीमध्ये राहा चांगल्याच्या संगतीमध्ये राहिलं की चांगलं होतं . संसारी माणसापेक्षा साधक श्रेष्ठ ,साधकापेक्षा सिद्धपुरूष श्रेष्ठ , आणि सिद्ध पुरुषापेक्षाही संत श्रेष्ठ आहेत . संत हे चालते बोलते ग्रंथच आहेत म्हणून संत संगतीला जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे . जगद्गुरु तुकोबारायाच्या संगतीमध्ये गंगाराम मावळ , तुकाराम लोहकरे तसेच संताजी जगनाडे यांच्यासारखे सामान्य माणसे उद्धरून गेले .एवढेच नव्हे तर संताजी महाराज जगनाडे यांच्याकरता जगद्गुरु तुकोबारायांना वैकुंठामधून यावे लागले एवढं प्रेम संतांच भक्तावर असतो .भगवंत प्राप्त करून घेण्याकरता संत हे दुवा आहे . भगवंतापेक्षाही संत श्रेष्ठ आहेत .करतून अगर तुम अन्यथा करतो शक्ती संताजवळ आहे म्हणून मनुष्याने जीवनामध्ये संत संगती करावी आणि आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा.



रामायणाचार्य हभप राम महाराज उदागे अखिल भारतीय वारकरी मंडळ जिल्हा उपाध्यक्ष (नगर)

रामभाऊ आवारे
संपर्क 8788504512

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वैराग्यमूर्ती सदगुरु संत वामनभाऊ महाराज



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही संत आणि महंत यांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेली भुमी, महाराष्ट्र देशाात संपन्न असण्याचे कारण या पावनभूमीत अनेक संत आणि महंत यांनी आपले संबंध जीवन लोककल्याणासाठी संतांच्या विभूती जगाच्या कल्याणा आणि भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी समर्पित केले, आपल्या अध्यात्मिक ज्ञानाचा वसा व वारसा महाराष्ट्राला दिला. याच संत परंपरेतील एकोणीसाव्या शतकातील संत वामनभाऊ महाराज एक महान तपस्वी संत , समाज सुधारक, वैराग्य मुर्ती, सद्गुरु संत वामन भाऊ महाराज वास्तविक त्या त्या कालखंडात सामाजिक परिवर्तन सहज होत नसत त्यासाठी अनेक महापुरुष यांनी आपले संबंध जीवन लोक कल्याणासाठी समर्पित केलेले असते.**

महाराष्ट्राच्या पावन भूमीत संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत रामदास स्वामी, संत गाडगे महाराज, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, संत नामदेव महाराज, संत कान्होपात्रा, संत गजानन महाराज, संत स्वामी समर्थ, साई बाबा संत अवजीनाथ महाराज,संत भगवान बाबा असे महान तपस्वी संत महापुरुष, सिद्धपुरुष, होऊन गेले. पंढरपूर, देहू, आळंदी, शिर्डी, शेगांव, पैठण, अक्कलकोट , भगवान गड असे अनेक नामांकित अध्यात्मिक पीठ या महाराष्ट्रात आहेत. अठराव्या शतकाच्या शेवटी व एकोणवीसाव्या शतकाच्या सुरुवातीला देशात इंग्रजांची राजवट चालू होती. स्वातंत्र्य भारत चळवळ शेवटच्या टप्प्यात होती. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर होता. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील काही भाग व मराठवाडा हा हैद्राबादस्थित निझाम यांच्या संस्थानात होता. दरम्यानच्या काळात रजाकारांची प्रचंड दडपशाही होती. अनेक धार्मिक बंधन, मर्यादित अधिकार,आशा बिकट खडतर कालखंडात एक आशेचा किरण उगवला आणि मराठवाड्याच्या मातीत एक अनमोल रत्न जन्माला आले तो दिवस म्हणजे सुवर्ण दिन दि .01/01/1891 रोजी बीड जिल्ह्यातील फुलसांगवी जि.बीड गावात.

माता राहीबाई भाग्याची खाण ! पिता तोलाजी हा पुण्यावान !!
पुत्र जन्मला रत्नासमान ! तयासी शोभे नाव वामन !!

तोलाजी ग्यानबा सोनवणे व राहीबाई तोलाजी सोनवणे यांच्या पोटी संत वामनभाऊ महाराज यांचा जन्म झाला. जन्मानंतर अवघे 40-50 दिवसात आईचे वैकुंठ गमन झाले, आईचे छत्र हरवले, आज्जीला पान्हा फुटला, बाल अवस्थेतील सांभाळ आजीने केला. आईचे प्रेम, माया, आपुलकी भाऊंना मिळाली नाही. अगदी बाल अवस्थेत अध्यात्मिक गोडी ज्ञान साधना किर्तन ऐकणे, भजन गायन या विषयी प्रचंड आवड होती. बिकट परिस्थिती असतांना सुद्धा प्राथमिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर संबंध जीवन हे समाजसेवेसाठी, लोककल्याणासाठी समर्पित करण्याचा निर्णय बाल अवस्थेतील वामनभाऊ महाराज यांनी घेतल्याने प्राथमिक शिक्षणानंतर ज्ञानीयांचा राजा अशी ओळख असणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदीत भाऊ पोहचले. आळंदीत अध्यात्मिक शिक्षण घेत असतांना एकेदिवशी संत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांची भेट झाली, परिचय झाला. एकमेकांना प्रेमपुर्वक अलिंगण दिले.

संत वामनभाऊ महाराज हे संत भगवान बाबा पेक्षा वयाने 5 वर्ष मोठे असल्याने भगवान बाबांनी आदरपुर्वक भाऊ ही उपाधी दिली आणि त्या दिवसापासून संत वामनभाऊ महाराज हे भाऊ म्हणून संबंध राज्यभर प्रसिद्ध झाले. बारा वर्षाचे अध्यात्मिक शिक्षण पुर्ण झाल्यानंतर आळंदी येथील निरोप घेवून बाला घाटातील डोंगर रांगात असणारे नाथ सांप्रदायातील नऊ नाथांपैकी एक गहिनीनाथ महाराज यांची संजिवन समाधी स्थळ असणार नाथ चिंचोली येथील देवस्थान गहिनीनाथ गड येथे वामनभाऊ महाराज आले. गहिनीनाथ गड येथील तत्कालीन महंत यादव बाबा महाराज यांची काही वर्ष सेवा केल्यानंतर वामनभाऊ महाराज यांची गहिनीनाथ गडाच्या महंत पदी निवड झाली. वामनभाऊ महाराज हे आजिवन ब्रम्हचारी संत. वामनभाऊ महाराज महंत पदी निवड झाल्यानंतर समोर असणारी आव्हानं बिकट होती. देश आणि मराठवाडा स्वातंत्र्याच्या टप्प्यात असतांना किर्तनाच्या माध्यमातून संबंध महाराष्ट्र भर जे का रंजले गांजले तयासी म्हणी जो आपले, तोची साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा त्याप्रमाणे वंचित, पिडित अत्याचारीत लोकांना ज्ञान उपदेश करुन एकत्र करणे, राष्ट्रभाव, भागवत धर्म आणि अन्याय अत्याचाराला न घाबरण्याची उमेद, शक्ती, धैर्य सर्व सामान्य माणसात निर्माण करण्यासाठी आणि अध्यात्माच्या माध्यमातून



पापपुण्य, न्याय अन्याय, सदाचार, संस्कार, संस्कृती शिक्षणाचे महत्व आणि मुल्य सर्व सामान्य लोकांना अगदी आपुलकीने गावागावात, वाडीवस्तीवर, जाऊन भाऊंनी अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकजागृती केली. देश आणि मराठवाडा स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणाचे मुल्य, संस्कार, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती बदलण्यासाठी भाऊंनी आयुष्य वेचले, संत भगवानबाबा व संत वामनभाऊ हे गुरुबंधु, दोघांचे कार्यस्थळ वेगवेगळे होते परंतू विचार आणि ध्येय मार्ग एकच होता. संत वामनभाऊ व भगवान बाबा यांनी एका विचाराने एकोणवीसाव्या शतकात भगवानगड व गहिनीनाथ गड परस्पर विचारातून, सहकार्यातून भव्य अशा गडांची निर्मिती केली आणि महाराष्ट्रातील अठरा पगड जातीधर्मातील लोकांना हक्काचे धर्मपीठ भगवान गड व गहिनीनाथ गड निर्माण केले. दसरा मेळाव्याला भगवान गडावर राज्यभरातून दरवर्षी किमान 10 ते 15 लाख भाविक येतात. 25 जानेवारी 2022 रोजी वामन भाऊ महाराज यांची पुण्यतिथी असल्याने गहिनीनाथ गडावर राज्यभरातून 4 ते 5 लाख भाविक येतात. भगवान गड व गहिनीनाथ गड आज राज्यातील नामांकित तीर्थ क्षेत्र आहेत. संत वामन भाऊ महाराज यांनी गहिनीनाथ गडावरुन चालू केलेली पायी दिंडीची परंपरा आजही अखंडीतपणे चालू आहे. 24 जानेवारी 1976 मध्ये वामनभाऊंनी देह ठेवतांना वैकुंठ गमन करत असतांना संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी दिवशी सुरु होणारा अखंड हरिनाम सप्ताह हा संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी दिवशी सुरु होणारा अखंड हरिनाम सप्ताह हा संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीदिवशी काल्याचे कीर्तन होऊन सप्ताहाची सांगता होती.

एवढा प्रचंड महा योगायोग महाराष्ट्राच्या संत परंपरेत गुरु बंधू असणारे संत भगवान बाबा व वामन भाऊ यांच्या पुण्यतिथीत दिसून येतो. संत भगवान बाबा व संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील हजारो गावात अखंड हरिनाम सप्ताह आजही चालू आहेत. महाराष्ट्रा बाहेर देखील आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश सुद्धा पुण्यतिथी खुप मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

आजच्या समाजाला खरी गरज आहे ती संत भगवानबाबा व संत वामनभाऊ महाराज यांच्या विचारांची एकमेकांची उणी दुणी न काढता, तुझ माझ न करता अहंकार विरहित आपल समजून चालण्याची या महान संताच्या विचाराचे अनुकरण करण्याची नितांत गरज आहे. संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांचे कार्य तेवढेच प्रेरणादायी आहे आणि भविष्यात ही तेवढेच प्रेरणादायी राहील. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने कोटी कोटी प्रणाम !!!

**(लेखक हे संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य तथा वंजारी समाज ईतिहास अभ्यासक व लेखक बालसंस्कार शिबिर अध्यात्मिक मार्गदर्शक आहेत.)**


# गांधींच्या हिंद-स्वराज्याची प्रासंगिकता

आधुनिक केसरी

**'गांधी म्हणजे विसाव्या शतकाला पडलेलं आणि एकविसाव्या शतकालाही न सुटलेलं कोडं आहे'. असं म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. गांधी खऱ्या अर्थाने युगपुरुष होते. लेनिन, स्टॅलिन, हिटलर, वूड्रो विल्सन, रूझवेल्ट सारख्या महान विभूतींच्या समकालीन असणाऱ्या या व्यक्तिमत्वाने जगाला शांततेचा संदेश देऊन मानवी समूहाच्या जगण्याचे संदर्भच बदलून टाकले. किरकोळ देहयष्टी, सर्वसाधारण वेशभूषा धारण करणाऱ्या या अवलियाने आपल्या कर्तुत्वाने अख्या जगाला दखल घेण्यास भाग पाडले.**

मृत्युच्या सत्तर वर्षानंतरही गांधी जगभरात पूजले जातात, विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ पुरुष म्हणून ज्यांची निवड केली जाते, जगभरात ज्यांचे पुतळे उभारले जातात आणि सर्वाधिक लिखाण सुद्धा याच व्यक्तीमत्वावर केले जाते. अशी किमया सर्वांनाच साधता येत नाही.

गांधी मरतात मात्र त्यांचे विचार आजही जिवंत आहे, हे पदोपदी जाणवते. गांधीकडे दूरदृष्टी होती. ते भविष्याचा वेध घेणारे द्रष्टे होते. म्हणूनच तर त्यांचे विचार आजही प्रासंगिक वाटतात. वर्तमानातील गढूळ सामाजिक वातावरणात गांधी विचारच जगाला तारू शकतो. असा विश्वास अनेक जण बाळगून आहे. त्यामुळेच गांधी विचारांवर रोज नव-नवे संशोधन समोर येत आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. हनुमंत कुरकुटे यांचे "हिंद स्वराज्य" हे गांधी विचारांची प्रासंगिकता विषद करणारं नवं पुस्तक नुकतच बाजारात आलं आहे. कधीकाळी बंदी घातलेल्या 'हिंद स्वराज्य' या गांधींच्या पुस्तिकेवर संशोधन करून लेखकाने



या पुस्तिकेतील विचारांची प्रासंगिकता शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. डॉ. कुरकुटे यांनी हिंद स्वराज्याची प्रासंगीकता या विषयावर २०१२ मध्ये आचार्य पदवीचे संशोधन केले होते. मात्र विद्यापीठीय संशोधनाला मर्यादा असतात. असे संशोधन सर्वसामान्य वाचकांच्या हाती येत नाही. त्यामुळे या संशोधनाला पुस्तक रुपात त्यांनी समोर आणले आहे. या पुस्तकात लेखकाने तटस्थपणे आपले विचार मांडले आहेत. एकीकडे देशात भयावह स्थिती असताना, सर्वत्र निराशेचे वातावरण असताना, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची पायमल्ली होत असताना, मानवतावादी विचारांची चर्चा, संवाद आणि लेखन होणं लेखकाला आवश्यक वाटते, ही महत्वाची बाब आहे. हिंसात्मक आणि विषम जगासाठी गांधी विचार हे आशेचा किरण ठरू शकतात असा विश्वास लेखकाला आहे.

प्रस्तुत पुस्तकाची सहा प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणांमध्ये महात्मा गांधींचा जीवन परीचय करून देण्यात आला आहे. तर दुसऱ्या प्रकरणामध्ये गांधींच्या हिंद स्वराज्य या संकल्पनेचे स्वरूप विषद करण्यात आले आहे. यामध्ये गांधीनी ही पुस्तिका कशा प्रसंगी लिहिली आणि त्यावर काय प्रतिक्रिया आल्यात याचा उहापोह करण्यात आला आहे. खरं तर या पुस्तिकेतील विचारांवरून त्याकाळी गांधी प्रचंड टीकेचे धनी ठरले होते. इतकेच नाही तर गांधींचे राजकीय गुरु गोपाल कृष्ण गोखले यांनी तर असे विधान केले होते की, गांधी आफ्रिकेतून परतल्यावर स्वतः हे पुस्तक नष्ट करतील. गांधीचे शिष्य जवाहरलाल नेहरूंनी तर या पुस्तकाकडे दुर्लक्षच केले होते. या पुस्तकातील विचार हे अवास्तव आणि कालबाह्य आहे असे उद्गार जवाहरलाल नेहरू यांनी काढले होते. अशाप्रकारे या पुस्तकाविषयी असलेली उदासीनता वर्तमानात कशी प्रासंगिक आहे, याचा शोध लेखकाने या पुस्तकातून घेतला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये गांधींच्या आधुनिकतेवरील टीकेचे वर्णन करण्यात आले आहे. सुरवातीच्या काळात गांधी इंग्लंडच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थितीने प्रभावित झाले होते. मात्र कालांतराने गांधीना याच इंग्लंडच्या परिस्थितीमध्ये दोष दिसू लागला. पुढे संस्कृती आणि जीवनपद्धती याबद्दलचे त्यांचे विचार बदलत गेले. ते इतके बदलले की, गांधी आधुनिकतेवर टीका करू लागले. त्यांच्या या विचारांचा मागोवा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला आहे.

'गांधी आणि धर्म' या प्रकरणामध्ये लेखकाने गांधींचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन विषद केला आहे. गांधी जरी हिंदू असले तरीही त्यांची धर्म संकल्पना पारंपारिक हिंदुत्ववादी नव्हती, तर ती नैतिक व मानवतावादी होती, या अनुषंगाने मांडणी करण्यात आली आहे. तर पाचव्या प्रकरणामध्ये हिंद स्वराज्य संकल्पनेची प्रासंगिकता मांडण्यात आली आहे. यामध्ये हिंद स्वराज्य आणि यंत्र उद्योग, हिंद स्वराज्य आणि स्वदेशी उद्योग, विकासाच्या संकल्पनेची पुनर्मांडणी, हिंद स्वराज्य आणि पर्यावरण, हिंद स्वराज्य आणि सांप्रदायिक सद्भावना, हिंद स्वराज्य आणि सत्याग्रह, हिंद स्वराज्य आणि संसदीय लोकशाही, हिंद स्वराज्य आणि शिक्षण अशा विविध मुद्यांच्या आधारे वर्तमान परिप्रेक्षातून वेध घेण्यात आला आहे. ही मांडणी करत असताना लेखकाने गांधी विचारांचा सखोल व चिकित्सक अभ्यास केल्याचे दिसून येते. औरंगाबाद येथील कैलास प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला डॉ. रामदास भटकळ यांची प्रस्तावना लाभली आहे.

**पुस्तक- हिंद स्वराज्य**
**लेखक- डॉ. हनुमंत कुरकुटे**
**प्रकाशक- कैलास प्रकाशन औरंगाबाद**
**किंमत- २८०**
**पृष्ठे-२३२**

डॉ. संतोष डाखरे, चंद्रपूर
८२७५२९१५९६

# मुळचे समाजभान असणाऱ्यांना जगाच्या आरशाची गरज नसते



सौ.सोनाली भोगे
पिंपळगाव बसवंत

आधुनिक केसरी

**माणूस हा मुळातच समाजशील प्राणी आहे. कुटुंब,समुह किंवा समाजाशिवाय कोणताही व्यक्ती एकाकी राहू शकत नाही.म्हणूनच समाजात विविध विचारांचे लोक असतात.त्यात काही मनसोक्त जगतात, बोलतात, वागतात तर काही लोकं समाजाचा विचार करून आचार, विचार, उच्चार करतात म्हणजे सतत "लोकं काय म्हणतील" या विचारधारेला धरुन कृती करतात.थोडक्यात काय तर आपल्या आचरणाचा इतरांवर काय परिणाम होईल याचा विचार केला जातो. यालाच आपण समाजभान म्हणू शकतो. हे दोन्ही प्रकार सोडले तर तिसरा प्रकार कुणाच्यातरी आवडीनुसार किंवा दबावाखाली जगणारेही लोकं आहेतच समाजात.माणसाचा विकास व वाढ होत असताना सुयोग्य विचार व सुसंस्कारांचा पाया भक्कम असेल तर निश्चितपणे वाटचाल योग्य दिशेने होते."चुक नाही अशी व्यक्ती नाही आणि व्यक्ती म्हटल्यावर चुक होणार नाही ही गोष्ट अशक्य"; परंतु आपण त्या चुकांमुळे काय शिकलो हे लक्षात घ्यायला हवे.अन्यथा त्याच त्या चुका वारंवार घडत असल्यास नकळतपणे ते आपले व्यक्तिमत्व तयार होत असते.**

प्रतिमा चांगली असो वा वाईट तिची छाप स्पष्टपणे दिसून येते.म्हणूनच तर हे समाजाप्रती चे वाद समोर येतात. कधी धर्मरक्षणासाठी तर कधी इतिहासासाठी, तर कधी स्त्री च्या वस्त्रांसाठी! कितीतरी लोकं बोलायला पुढे सरसावतात.

लोकशाही हा समाजाचा गाभा आहे.पण, किती विषय जनमताने सोडवले जातात हेही तितकेच महत्त्वाचे.
विषय म्हणा किंवा वाद कौटुंबिक असो अथवा सामाजिक. हेकेखोर वृत्तीतून तो कधीही सुटत नाही.उलट सर्वानुमते निःसंकोचपणे पर्याय निघतात.समाज म्हणजे तरी काय हो ! तुम्ही आम्ही मान्यता दिलेला एक ठराविक आकृतीबंध ज्यात आपण आचार विचारांची देवाणघेवाण करतो. समाजाने घालून दिलेले निर्बंध आणि त्यानुसार वाटचाल म्हणजे मर्यादा. त्या मर्यादेत स्वतःचे स्वातंत्र्य उपभोगणे म्हणजे संस्कार! आणि स्वातंत्र्य व संस्कार, मर्यादा यांना धरुन चालणे म्हणजे समाजभान असणे होय. आयुष्य म्हणजे टेलिव्हिजन चे चित्रपट किंवा मालिका नाहीत जे ठराविक तासाभरात काहीही करता येईल. त्याला केवळ आभासी प्रतिमा म्हणता येईल आणि या आभासी दुनियेत जगणारे लोकं कधीही समाधानी नसतात. अनुकरण आणि अंधानुकरण यातला फरक कळायला लागला की माणूस मर्यादेत राहायचे शिकतो. आपल्या चष्म्याच्या काचा स्वच्छ असल्या कृती आणि विकृती या आरशात स्पष्टपणे दिसू लागतात.

# नवचैतन्य देणारा भारतीय संस्कृतीतील एक सण मकरसंक्रात !!

आधुनिक केसरी

**मकरसंक्रांत हा भारतातील पौष महिन्यात येणारा एक शेती संबंधित सण आहे. सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे.भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण एकमेकांना स्त्रिया देतात. हरभरे, ऊस, बोरे, गव्हाची ओंबी, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात. बायका उखाणे घेतात. हा सण जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष महिन्यात येतो.**

संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते अशी समजूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते आपल्या महाराष्ट्रात प्रत्येक सण साजरा होतांना अतिशय उत्साह, आनंद, एकमेकांना मान सन्मान देण्याची पध्दत, रूढी परंपरा यांना फार महत्व दिल्याचं आपण पाहातो.या पंरपरा सुरू झाल्या त्यामागे देखील पुर्वजांचा एक चांगला हेतु असल्याचे लक्षात येते.

मकरसंक्रात सणापुर्वी वातावरणात असतो तो कमालीचा गारठा. प्रत्येक सजीवाला या थंडीची हुडहुडी फार गारेगार करून सोडते. कधी एकदा सुर्य तापतोय आणि ही थंडी कमी होते असे प्रत्येकाला वाटते.आणि हा सुर्यदेव तापायलाच तयार नसतो! तो तयार होतो ते या मकर संक्रांत भारताच्या विविध राज्यात विविध नावाने आणि विविध पद्धतीने साजरी केली जाते जसे मकरसंक्रात (महाराष्ट्र). . . पोंगल (तामिलनाडु) उत्तरायण (गुजरात व राजस्थान) लोहढी (पंजाब) माघमेला (ओडिसा) भोगाली बिहु – (आसाम) . . . संक्रांती (कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, बिहार) अशी विविध नावं या सणाला आहेत.प्रत्येक धर्म आपापल्या प्रथांप्रमाणे या दिवसाला साजरा करत असले तरी देखील आनंद, उत्साह, जल्लोष हा सगळीकडे असतोच असतो.मकरसंक्रांत या सणाचे आणखीन एक वैशिष्टय म्हणजे हा सण कायम 14 जानेवारीलाच येतो कधीतरी या सणाला 13 जानेवारी किंवा 15 जानेवारीला आल्याचे आपण पाहातो पण ही अपवादात्मक स्थिती सोडल्यास हा उत्सव नेहमी 14 जानेवारीला येतो पौष महिन्यात जेव्हां सुर्य मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा हा उत्सव सर्वत्र संपन्न करण्याची परंपरा आहे.हा भारतीय सण सौर कालगणनेशी संबंधीत अतिशय महत्वाचा सण असुन शेतीशी देखील संबंधीत आहे.मकरसंक्रांतीपासुन हळुहळु दिवस मोठा होत जातो आणि रात्र लहान होत जाते. सुर्याची तीव्रता दाहकतेत बदलत पुढेपुढे सरकायला लागते आणि साधारण 10 ते 15 दिवसांच्या अंतराने रथसप्तमी असते (मकरसंक्रांतीपासुन ते रथसप्तमी पर्यंत अनेक सुवासिनी हळदीकुंकवाचे आयोजन करतात.)असं म्हणतात की या रथसप्तमीपासुन



सुर्याच्या रथाला घोडे लागतात आणि सुर्यदेव चांगलेच मनावर घेतल्याप्रमाणे आग ओकायला (तापायला) सुरूवात करतात.मकरसंक्रांतीला सुवासिनी एकमेकिंना सुगडयाचे वाण देतात या वाणात हरभरे, मटर, बोरं, ऊस, गहु, तीळ, नाणे, असल्याचे आपण पाहातो. (हरभरे, मटर, बोरं, गव्हाच्या ओंब्या या दिवसांमध्येच विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने वाणात त्याचा समावेश आपल्याला पहायला मिळतो) ऊस, हरभरे, बोरं, गव्हाच्या ओंब्या, तीळ सुगडयात भरून हे वाण महिला वर्ग ज्यापध्दतीने एकमेकिंना देतं त्याचप्रमाणे पंढरपुरच्या रूक्मिणीला देखील सुहासिनी स्त्रिया आजच्यादिवशी हे वाण देण्याकरता गर्दी करतांना दिसुन येतात.मकरसंक्रांतीला काळे कपडे घालण्याची, एकमेकांना देण्याची देखील प्रथा आहे."तिळगुळ घ्या आणि गोडगोड बोला""तिळगुळ घ्या आणि गोडगोड बोला" असं म्हणण्याची संधी आपल्याला केवळ या सणालाच मिळते बरं कां! तिळ आणि गुळ हे उष्ण असल्याने या थंडीच्या मौसमात आपल्या शरीरात आवश्यक उष्णतेची गरज तिळगुळ पुर्ण करतं आणि याच मुख्य कारणामुळे मकरसंक्रांतीला तिळगुळ देण्याची परंपरा सुरू झाली असावी.नवे लग्न झालेल्या नववधुचे हळदीकुंकु या दिवसांमध्ये पहिल्यांदा मोठया प्रमाणात हौसेने करतांना आपण पाहातो याकरता तीच्यासाठी काळी साडी, हलव्याचे दागिने (नव्या नवरदेवाला देखील हलव्याचे दागीने घालतात) विविध आभुषणं घालुन तिला सजविले जाते.कोणताही सण आपल्याला आनंद, उत्साह, नवचैतन्य, देण्याकरताच येत असतो. रोजच्या दैनंदिन आयुष्यातल्या घडामोडींपासुन चार क्षण निवांत काढुन आपण देखील सणाचा हा अंगिकारतो त्यात रममाण होतो, भेटीगाठी होतात आणि या सण उत्सवापासुन मिळालेली उर्जा पुढे कित्येक दिवस आपल्याला रोजच्या दिनक्रमात जगण्याकरता उपयोगाला येते ! आणि म्हणुन आपण प्रत्येक सण उत्साहाने, आनंदाने जगावयास हवा तरच आपल्या जीवनामध्ये उत्कर्षाची पहाट उजाडेल !!

राजू जाधव मांगूर
जि.बेळगांव

# विचारांचे भावविश्व : विचार मंथन




सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**विचारमंथन हा लेखसंग्रह आहे. यामध्ये विविध विषयांवरचे एकूण ३४ लेख असून पुस्तकास प्रा.डॉ. श्रीमती शैलजा बरुरे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. मुखपृष्ठ उमेश डोंगे यांचे आहे. या पुस्तकाची अनुक्रमणिका चाळल्यानंतर वाचकांच्या सर्वप्रथम लक्षात येते की, विविध विषयावरील लेखांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. लेखकाने आपल्या मनोगतामध्ये शाळेत विज्ञानशिक्षक म्हणून काम करत असताना नवीन प्रवेशित विद्यार्थिनीचे नाव नकोशी आहे हे पाहिल्यानंतर तिच्या जन्माची आणि तिच्या नकोशा असण्याची कथा सर्वप्रथम उजेडात आणली.**

शिक्षण विभागाने हा लेख प्रकाशित होताच, या मुलीच्या नाव बदलाच्या प्रस्तावास मंजुरी दिली आणि त्या विद्यार्थिनीचे नाव बदलण्यात आले. एक शिक्षक, एक स्तंभ लेखक एका विद्यार्थिनीला तिच्या नकोशा असणाऱ्या अस्तित्वाला शिक्षण विभागाच्या आणि जीवनाच्या केंद्रस्थानी आणतो. मला वाटतं लेखन, साहित्य मग ते कोणत्याही प्रकारच असो, स्तंभ लेखन, ललित अथवा वैचारिक किंवा कथा, कादंबरी, कविता या सगळ्यांचा उद्देश माणूसपण जिवंत ठेवून माणसाला जगण्यासाठी आधार देणे, कधी कधी उभारी देणं हाच साहित्याचा हेतू असतो. भारतात शिक्षण व्यवस्थेत निर्माण झालेली मरगळ झटकण्यासाठी अशा कृतीशील शिक्षकांची गरज भागविणारे श्री. सुरेश मंत्री यांच्या विचार विश्वामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, आर्थिक, विज्ञान व तंत्रज्ञान अशा मानवी जीवनातील अत्यावश्यक विविध क्षेत्र व त्यात निर्माण झालेले प्रश्न-समस्या, त्यावरील उत्तरांची चर्चा यांना स्थान आहे. ही केवळ समकालीन प्रश्नांची चर्चा असली तरी सुद्धा मानवाच्या भविष्यासाठी, भावी पिढ्यांसाठी, शाश्वत विकासासाठी कोणती पावले उचलली जाणे आवश्यक आहे आणि संपूर्ण मानवी समूहासाठी उत्तरे शोधणारी ही लेखमाला आहे. त्यामुळे हे पुस्तक केवळ तत्कालीन समस्यांचा आढावा घेणारे लेखन ठरत नाही. याची उपयुक्तता सर्वकालिन आहे. विचारमंथन हे पुस्तक व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास, सुजाण पालकत्व, जबाबदार नागरिकत्व अशा कोणत्याही अंगाने वाचकाने पुस्तक हातात धरल्यानंतर त्याला हवे ते मुद्दे या पुस्तकात मिळू शकतात. लोक काय म्हणतील ? या लेखामध्ये लेखकाने लोकांच्या इच्छा आकांक्षांचे ओझे मनावर न बाळगता विविध दाखले देत त्यातही अंबाजोगाई सारख्या शहरातील स्थानिक लोकांची विशेषतः धीमंत राष्ट्रपाल यांच्या लोकजागर या संस्थेची ओळख आणि उदाहरण देऊन लोक काय म्हणतील ? या आजारावरचे उत्तर सांगितले आहे. आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत आपण सर्वजण तंत्रस्नेही झालो आहोत. जगण्यासाठी आपल्याला संगणक, मोबाईल, इंटरनेट यासारखी साधने आणि फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटर यासारखी समाज माध्यम अत्यावश्यक ठरत आहेत. ही साधने वापरता वापरता आपण या साधनांच्या अधीन झालो आहोत आणि त्यातून नव्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. लेखकाने या सगळ्या प्रश्नांचा वेध घेण्यासाठी या पुस्तकामध्ये जीवघेणी सेल्फी, मोबाईलचे युग, इंटरनेटच्या बाहेर सुद्धा जीवन आहे या लेखांचा समावेश केलेला आहे. तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणाम वापरणाऱ्यांना निश्चितपणे माहीत नसतात. लेखकाने या पुस्तकात अतिशय वैज्ञानिक पद्धतीने या सर्व दुष्परिणामांची चर्चा केली आहे. आत्मविश्वास सारख्या छोट्या लेखामध्ये आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे, असे सांगत असतानाच आजच्या युगामध्ये तंत्रज्ञानापासून दूर राहात नकारात्मक भावना व अपप्रवृत्ती पासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी विविध उपायांची चर्चा या लेखामध्ये केली गेली आहे. आपल्याला शाश्वत विकास हीच आपली एकमेव गरज असून भावी पिढ्यांचं नुकसान न करता आज मला माझी जीवनशैली बदलण्याची कशी गरज आहे अथवा उपलब्ध असणाऱ्या अनेक गोष्टींचा आनंद घेताना कोणाचेही नुकसान मग त्यामध्ये आजूबाजूचे पशुपक्षी, प्राणी व पुढे जन्माला येणाऱ्यार मानवी पिढ्या यांचा विचार करायला जीवनशैली बदलण्याची गरज हा लेख शिकवतो. मानवाने केलेल्या प्रगतीला आपण विकास असे म्हणतो मुळामध्ये हा विकास आहे की विनाश याचे निकष आपल्याला तपासावे लागणार आहेत. काही गोष्टी साध्य करण्यासाठी आपण अनेक चांगल्या गोष्टींचा विनाश केलेला आहे. याची चर्चा विकासाकडे की विनाशाकडे ? या लेखामध्ये करण्यात आली आहे. विचार




मंथन या पुस्तकात सुरेश मंत्री यांनी अनेक व्यक्ती चित्रे ही रेखाटली आहेत. हजारो अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांच्या निधनानंतर लिहिलेला लेख म्हणजे सिंधुताई च्या आयुष्याची संघर्षमय कहाणी होय. ती वाचकांना अत्यंत प्रेरणा देणारी आहे. एखाद्या व्यक्तीचे चित्रण करत असताना एकूण त्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलच्या अनेक पैलूंना छोट्याशा लेखामध्ये सामावून घेणं, ही खरे म्हणजे लेखकाची कसरत असते. असाच काहीसा अनुभव लोक लेखक अण्णाभाऊ साठे या लेखामध्ये ही आपल्याला आल्याशिवाय राहत नाही. उत्तम लिहिण्यासाठी उत्तम वाचनही लेखकाची आवश्यक किंवा अपरिहार्य गरज असते, याची साक्ष पुढच्या लेखात म्हणजे लोकनेते राजर्षी शाहू महाराज या लेखात येते. अभिनयाचा जादूगार : दिलीप कुमार या लेखातही दिलीप कुमार यांच्या विषयी लिहीत असताना अतिशय नवख्या वाचकांना दिलीप कुमार यांच्या वडिलांची नाशिकच्या देवळाली मध्ये मालकीच्या फळबागा होत्या. ही माहिती सांगून आश्चर्याचा धक्का दिला आहे. दिलीप कुमारच्या अभिनयावर प्रेम करणाऱ्या जुन्या जाणत्या प्रेक्षकांबरोबरच या पुस्तकाचे, नव्या पिढीचे, युवावाचकही दिलीप कुमारच्या प्रेमात पडण्याची शक्यता आहे. लेखकाची निरीक्षण शक्ती, व्यक्त होण्याची पद्धती व सशक्त आशय असणारे लेख हे या पुस्तकाची अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. जिंकलस पोरी हा मीराबाई चानू यांच्यावरील लेख, शेतकऱ्याचा मुलगा निरज चोप्रा याच्यावरील लेख अथवा चक दे इंडिया या लेखांमधूनही क्रीडा क्षेत्रातील विविध क्रीडा प्रकारातील खेळाडू त्यांचे वैयक्तिक जीवन संघर्ष, त्यांनी केलेली दैदिप्यमान कामगिरी, नोंदविले गेलेले विक्रम याची लेखक नोंद घेतो. अष्टपैलू शिक्षक अष्टपैलू विद्यार्थी घडवू शकतात. अशी गरज विचारमंथनचे लेखक पूर्ण करताना दिसून येतात. विचार मंथन च्या निमित्याने लेखकाने अनेक स्त्री प्रश्नांचा आढावा घेतला आहे. नकोशी सारख्या लेखामधून भारतात व विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाड्यामध्ये स्त्री जन्माची होत असलेली अवहेलना वर्णन केली आहे. अनेक मुलीं जन्मानंतर 'नकोशी' असतात म्हणून त्या नकोशी नावानेच संबोधल्या जातात. परंतु भारतात जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाची काळजी घेणे हे भारतीय संविधानाने सोपवलेली जबाबदारी एक शिक्षक म्हणून पार पाडताना श्री. सुरेश मंत्री यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. केवळ आपल्या लेखनाची गरज म्हणून हा माणूस स्तंभ लेखन अथवा पत्रकारिता करत नाही तर आपल्या अवतीभवती त्याला जे दुरुस्त करता येणे शक्य आहे तो त्या सगळ्या व्यवस्था दुरुस्तीचे काम करतो आहे. खरंच ती सध्या काय करते..? या लेखामधून महिला सक्षमीकरण अथवा महिलांचा विकास याची केवळ सांख्यिकीय प्रचाराची मानसिकता लेखकाने उघड केली आहे. स्त्रियांसाठी, लहान मुलांसाठी हळवा झालेला हा शिक्षक मातृह्रदयी आहे. लहान मुले, स्त्रिया यांच्यासाठीचं हे हळवेपणच लेखकाला माणूस म्हणून एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. सजग लेखकाने त्याच्या दृष्टीने पाहिलेलं हे समकालीन जग विचारमंथन च्या स्वरूपात आपल्यासमोर येत आहे. लेखकाने पुस्तक आपल्या हाती दिले आहे.

आता आपण लेखकाच्या आशावादाला वाचक व संवेदनशील माणूस म्हणून प्रतिसाद देऊया.

आपण शाश्वत विकासासाठीचे वाटाडे होऊया.

**लेखक - सुरेश मंत्री**
**प्रकाशक – शॉपीजन.इन**
**पृष्ठ - १६१**
**किंमत – २६०/- (सवलतीसह)**

**- प्रा. अंकिता वाघ (लोहिया),**
**- ग्लोबल इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट, संगमनेर**



# राष्ट्रीय भूगोल दिन

आधुनिक केसरी

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहीत आहे. भूगोल हा विषय आपण शालेय जीवनापासून शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलाचे ज्ञान अफलातून होते त्यामुळे त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी डॉ सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो. भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील GEOGRAPHY या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरुन आलेल्या या शब्दाचा अर्थ 'भूवर्णन शास्त्र' पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते. भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे. १) प्राकृतिक भूगोल २) मानवी भूगोल ३) प्रादेशिक भूगोल प्राकृतिक भूगोलात भूरुप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबतच किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही प्राकृतिकभूगोलात समावेश होतो. मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो. प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्तोत्रांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल अभ्यासात विविध पद्धतींचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना तर भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, ड्रोन कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरिक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग त्याचे स्वरूप, विविध भूप्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

श्याम ठाणेदार
संपर्क ९९२२५४६२९५

# चला पोलीस भरतीवर बोलू काही



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या महाराष्ट्रात पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. हजारों जागेसाठी लाखों अर्ज उमेदवारांनी केले आहेत. अनेक वर्षांपासून तरुण नोकरीच्या जाहिराती ची प्रतिक्षा करत होते. पोलीस भरती प्रक्रीयेमुळे काही तरुणांना आशेचा किरण मिळून जगण्याला थोडेफार का होईना पण बळ मिळत आहे. पोलीस भरती या प्रक्रियेकडे गांभीर्याने बघितलं तर बेरोजगारी, मेहनत, तडजोड याची जाणीव होते. परंतू आपण मागील काही वर्षापासून महत्वाच्या मुद्यांवर चर्चा न करता शुल्लक विषयावर चर्चा होत आहेत कि ज्या विषयावर चर्चा झाली काय आणि नाही झाली काय त्यांच्या सर्वसामान्य नागरिकांच्या जिवनावर काहीही परिणाम होत नाही.**

हल्लीच्या चर्चेमधुन महागाई, शिक्षण, बेरोजगार, आरोग्य आणि शेतमालाला भाव हे मुद्देच बाजूला गेले आहेत. धर्म, रंग, आणि वैयक्तिक कपड्यावर सध्या बोलूनच उघवलेला दिवस माळवत आहे. आपण दोनच उदाहरणे बघितले तर आपल्या लक्षात येईलच. पठाण चित्रपटाचे गाणे रिलीज झाले आणि शाहरुख खानला विरोध सुरू झाला. शाहरुख खानला विरोध करण्यामागे तार्किक काय कारण होते हे अजूनही लोकांना कळाले नाही. भगव्या रंगाला धर्माचा मुलामा चढवून चुकिची माहिती पसरवून निव्वळ धार्मिक द्वेषाने गेल्या काही दिवसापासून चर्चा, मुलाखती सुरू आहेत. भगवा रंग वापरून बोल्ड सिन अगोदरही खूप वेळा दाखवले गेलेले आहेत तरी फक्त शाहरुख ला विरोध हे तार्किक नव्हते.

दुसरा विषय सध्या सुरू आहे तो उर्फी जावेद चा तोडके कपडे घालण्यावरून सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. आता कोणी कसे आणि कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तीक विषय असताना कपड्यावर बोलुन वेळ वाया घालून काहीच उपयोग नाही. पण धर्मनिरपेक्ष देशामध्ये धर्मावर चर्चा होतात. बर धार्मिक संघटना, यांनी एखाद्या वेळी धर्माच्या मुद्यावर बोलले तर समजून घेऊ. दोन धार्मिक संघटने मध्ये काही मतभेद असतील तर सरकारच्या मदतीने ते मिटवले जाऊ शकतात परंतु येथे सगळं उलट आहे. येथे धार्मिक बाबींवर बोलुन धार्मिक तेड निर्माण करण्याचा प्रयत्न हे सरकार मध्ये असलेले आणि सरकारच्या पक्षात असलेलेच लोक करत असतील तर मग मध्यस्थी करून वाद कोणी मिटवायचा आणि सरकार मध्ये असलेल्या लोकांनी जर धर्मावर बोलुन वेळ वाया घालायचा तर रोजगार शिक्षण आरोग्य महागाई ह्या गोष्टींवर कोणी बोलायचे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. रोजगार,शिक्षण,आरोग्य आणि महागाई यावर जर चर्चा झाली आणि उपाय शोधले तर सर्वांना फायदा होतो. परंतु सध्या सुरू असलेल्या चर्चेमधुन फक्त चँनल्सवाल्यांना फायदा मिळत आहे. म्हणून महाराष्ट्रात पोलीस भरती सुरु असुन कोणत्याही राजकीय नेत्यांनी याकडे लक्ष गांभीर्याने लक्ष दिले नाही. आता काहींच्या मनात प्रश्न असेल भरती प्रक्रिया सुरू आहे प्रशासन त्यांचे काम करत आहे. मग नेते आणि इतरांनी लक्ष देण्याची काम गरज. परंतु लक्ष दिले तर वास्तविक परिस्थिती समजते. म्हणून आपण ओझरते जरी बघितले तरी खुप चिंताजनक बाब आपल्या लक्षात येते. अनेक वर्षांपासून भरती नसल्याने अनेक तरुणांचे वय निघून गेले. अनेक तरुण घरची परिस्थिती हलाखीची असल्याने औद्योगिक कंपन्यामध्ये जाऊन कुटुंबाचा निर्वाह करण्यासाठी मेहनत करत आहेत. वय निघून गेलेले बेरोजगार आणि औद्योगिक कंपनी मध्ये काम करणाऱ्यांना मैदानावर तयारी करायला मिळत नाहीत असे आपण एकुण आकडेवारी बघितली तर लाखोंच्या संख्येत आहे. थोडक्यात काय तर लाखों तरुण काही वैयक्तिक तर काही आर्थिक कारणाने सध्या होत असलेल्या पोलीस भरथीचे उमेदवारी अर्ज भरू शकले नाही. अठरा हजाराच्या वर जागेसाठी सध्या भरती प्रक्रिया सुरू आहे. परंतु आपण ठोबळमानाने विचार केला तर अठरा हजार जागेसाठी अकरा लाखाच्या वर उमेदवारी अर्ज आले आहेत. आता हे जे उमेदवारी अर्ज आलेले आहेत ते फक्त मैदानी तयारी करणाऱ्या तरुणांचे आहेत. काही तरुणांनी तारीख लवकर जाहीर होत नाही म्हणून मैदानी तयारी करणे सोडून आणि उमेदवारी अर्ज भरले नाहीत ते वेगळे. अठरा हजार जागेसाठी अकरा लाखांच्या वर अर्ज आणि त्यातही उच्च शिक्षीत तरुणांचे अर्ज ही बाब खुप गंभीर आहे. कोणतीही नौकरी कमी दर्जाची मुळीच नाही. परंतु प्रश्न हा आहे जे शिक्षण घेऊन तरुणांनी अधिकारी होऊन समाजासाठी ध्येय धोरणे बनवून सर्वांगीण हिताचे काम करायला पाहिजे होते ते तरुण कर्मचारी बनुन बनवलेल्या धोरणावर फक्त नोकरी मिळून कुटुंब चालावे म्हणून काम करतील. समाजातील बुद्धीजीवी वर्ग जर फक्त पोटाची खळगी भरेल म्हणून पहिल्याच पायरी वर राहीला तर सर्वात वरच्या पायरीवर बुद्धीजीवी लोकांची कमतरता निर्माण होऊन शिक्षणाप्रती निराशा निर्माण होऊन. पदवीधर होऊन पोलीस कर्मचारी होण्यापेक्षा बारावीच करून पोलीस कर्मचारी होण्यास काय अडचण आहे. असा साधा प्रश्न तरुणांच्या डोक्यात यायला वेळ लागणार नाही. म्हणून सदर बाब खूप गंभीर असुन लक्ष वेधण्यालायक आहे तरीही कोणी या विषयाकडे लक्ष द्यायला तयार नाही. अकरा लाखापेक्षा जास्त आकडा हा फक्त पोलीस भरती ची तयारी करणाऱ्यांचा आहे. अजूनही यापेक्षा जास तरुण वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे आहेत ज्यांनी पोलीस भरतीचा अर्ज भरला नाही. ढोबळ मानाने विचार केला तर पोलीस भरती मधील दहा लाख ऐंशी हजार तरुण बेरोजगार, ज्यांना वयामुळे भरता आले असे लाखों तरुण, तारिख जाहीर होत नाही म्हणून ज्यांनी पोलीस भरती ची अपेक्षा सोडून दिली असे लाखो तरुण, आपण असा ठोबळ मानाने विचार केला तर पंचवीस लाखांच्या वर फक्त तरुणांनाचा आकडा जातो. मग एवढ्या तरुणांच्या उदरनिर्वाहासाठी



सरकारची काय भूमिका असायला पाहिजे, सरकारने काय नियोजन केले आहे, या विषयावर चर्चा का होत नसेल. उर्फी शॉर्ट कपडे घालते त्या ऐवजी लाखो तरुणांना कपडे घेण्यासाठी पैसे नाहीत यावरही बोलायला पाहिजे. लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहून होण्याच्या वादावर चर्चा केल्या पेक्षा लाखों तरुणांना लग्नासाठी मुलीच मिळत नाही हा विषय महत्त्वाचा नाही का? आज राजकीय नेते सुद्धां चर्चा करताना अर्धवट माहिती च्या आधारे विषय वाढतात व महत्वाचा विषय बाजूला सारतात. कोणताही द्वेष, पुर्वग्रह मनात न ठेवता सत्याला सत्य आणि असत्याला असत्य म्हणण्याची नितीमत्ता हि नेतृत्वाकडे पाहिजे असते. दोन तीन वर्ष रिलेशनशिप मध्ये राहून दोघांच्या वैयक्तिक कारणाने एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला असेल तर त्याला शिक्षा व्हायलाच पाहिजे परंतु गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगार मुस्लिम असेल तर त्याला लव वेगळे स्वरूप देणे चुकिचेच आहे. बर मागे जे श्रद्धा प्रकरण मिडिया सह काही राजकाऱ्यांनी गाजवले आणि लवजिहाद वर बोलत होते ते फक्त आरोपी चे नाव ऐकून. आरोपीचे नाव आफताब होते म्हणून लव जिहाद वर भर दिला परंतु आफताब हा मुस्लिम नाही याची माहिती किती लोकांना आहे. आफताब पुनावाला असे त्याचे होते. अर्थात गुन्हेगारांना जात धर्म नसते परंतु राजकीय आणि जबाबदार लोक जर गुन्हेगारी मध्ये जात आणि धर्म शोधत असतील आणि विशिष्ट जातीधर्माचा द्वेष आणि तिरस्कार म्हणून विरोध करत असतील तर हे चुकिचेच आहे. आज देशातील परिस्थिती खुप बिकट झाली आहे. ज्वलंत विषयावर चर्चा न करता, ज्वलंत समस्येवर उपाय योजना न करता. जो विषय मुळात चर्चेचा नाही त्याला ज्वलंत केले जाते. आणि ज्यांनी देशातील , राज्यातील, आपल्या मतदार संघातील जनतेला प्राधान्य क्रम देऊन काम करण्याची अपेक्षा असताना जनतेचा विचार न करता धर्माचा विचार करून जनतेलाच भटवले जाते हि खुप मोठी शोकांतिका आहे. आणि सत्य व ज्वलंत विषयावर चर्चा होऊन त्या विषयाचे गांभीर्य जनतेपर्यंत जायला पाहिजे. म्हणून लव जिहाद, रंग आणि कपडे यावर गोंधळ करून झाला असेल तर पोलीस भरती फक्त एक निमित्त आहे. बेरोजगारी आणि बेरोजगार तरुण व त्यांच्या कुटुंबाला येणाऱ्या अडचणी यावर बोलले, जाणुन घेतले तर ज्याला मन आहे त्याच्या डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहणार नाही. शेतमालाला भाव मिळत नाही, शेतीमध्ये काम करणे आज हीनपणाचे मानले जात आहे, शिकुन सुद्धां नौकरी मिळत नाही म्हणून लाखों तरुणांचे विवाह सुद्धा होत नाही हा तर खुप चिंतनाचा विषय आहे पण यावरही कधी चर्चा होत नाही. उमेदवार जास्त जागा कमी असल्याने अनेक तरुण तरुणींना नैराश्य येईल. पण खचून जायच नाही, कारण तुम्ही घेतलेली मेहनत, केलेली तडजोड ही खुप मौल्यवान आहे, आणि आपल्या मेहनतीला व तडजोडीला यशस्वी करायचे असेल तर तरुण तरुचींनी खचून न जाता मेहनतीवर विश्वास ठेवून अर्थाजन करण्याचें वेगवेगळे परंतु संविधानीक मार्ग निवडणूक वेगवेगळ्या क्षेत्रात ठसा निर्माण करण्याची ताकत ठेवावी. सत्याची जाणीव होण्यासाठी चला पोलीस भरतीवर बोलु काही.

# आरोग्यदायी टिप्स

आधुनिक केसरी

आजच्या या धावपळीच्या जीवनशैलीमुळे व तसेच दूषित वातावरण व खानपान या गोष्टींचा आपल्या आरोग्यावर खूप जास्त परिणाम होत असतो. चला तर मग जाणून घेऊयात आपल्या आरोग्यासंबंधित काही गोष्टी. चांगले पोषण हे निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. जश्या इतर गोष्टी आपल्या जीवनातील एक हिस्सा बनल्या आहेत त्याचप्रमाणे चांगले आरोग्य ठेवणे व आरोग्यासंबंधीत इतर गोष्टींबद्दल जाणून घेणे अश्या गोष्टींना सुद्धा आपल्या जीवनातील एक हिस्सा बनविणे गरजेचे आहे. निरोगी व तंदुरुस्त राहण्यासोबत होणाऱ्या अजरांपासून वाचण्यासाठी आरोग्य टिप्सची खूप जास्त आवश्यकता असते. जेव्हा आपण आपल्या आरोग्यावर दुर्लक्ष करू लागतो तेव्हा आयुष्यातील इतर गोष्टींवर होणाऱ्या परिणामांचा सामना देखील आपल्यालाच करावा लागतो. नेमही असे मानले जाते की योगा किंवा व्यायाम केल्याने शरीर लवचिक आणि सुदृढ बनते पण फक्त एवढेच नाही. नियमित योगा किंवा व्यायाम केल्याने मन शांत राहतो, रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते, शरीरात अतिरिक्त चरबीचे प्रमाण कमी होण्यास खूप मदत होते आणि आपले शरीर आजारांवर मात करण्यालायक बनते आणि अश्या बऱ्याच गोष्टींचा फायदा आपल्याला होत असतो.

**२) पुरेशी झोप घ्या**

एक निरोगी आयुष्य जगण्यासाठी कमीत कमी ७ ते ८ तासांची झोप घेणे आवश्यक असते. पुरेशी झोप ही आपल्या शरीरसाठी व आपल्या मेंदूच्या कार्यासाठी खूप उपयुक्त असते त्यामुळे रोज लवकर झोपण्याची व सकाळी लवकर उठण्याची सवय लावायला हवी.

**३) निरोगी आहार घ्या**

सर्वांनाच पोषक आहाराची गरज असते पण बऱ्याच जणांना माहिती नसते आपल्या आहारमध्ये कोण-कोणत्या गोष्टींचा समावेश करावा. आपल्या आहारामध्ये कच्च्या भाज्यांचा समावेश करणे आपल्या शरीरसाठी खूप जास्त लाभदायक असते म्हणूनच दैनंदिन जीवनात कच्च्या भाज्या खाण्यावर भर देणे गरजेचे आहे. तसेच भरपूर प्रथिनेयुक्त आहरांचा समावेश करा यामध्ये सर्व प्रकारच्या डाली, शेंगदाने, बदाम, सोयाबीन्स, दही, दूध, अंडी, मासे या गोष्टींचा आहारमध्ये समावेश वाढवणे गरजेचे आहे.

**४) प्रक्रिया केलेले जंक फूड टाळा** (बाहेरील खाद्यपदार्थ)

प्रक्रिया केलेले जंक फूड विशेषतः आरोग्यासाठी चांगले नसते. बाहेरील खाद्यपदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात उष्मांकांचा समावेश असतो जे आपल्या शरीरसाठी हानिकारक असते. बाहेरील खाद्यपदार्थ झटपट भूक भागवण्यासाठी तर मदत करतात पण त्यामुळे खूप काही गोष्टींना सामोरे जाण्याची वेळ येते.

**५) मीठ आणि साखर कमी वापरा**

जर तुम्ही मिठाचा किंवा खारट पदार्थांचा जास्त सेवन करत असाल तर तुम्हाला हृदय विकाराच्या आजारांचा सामना करावा लागू शकतो व आपले रक्तदबाव देखील बिघडू शकतो. त्यामुळेच आपल्या जेवणाच्या टेबलावर मीठ आणि मसाले काढून टाकणे तसेच खारट स्नॅक्स टाळण्याचा प्रयत्न करा. दुसरीकडे, बाजारात मिळणारे गोड पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात साखरेचे प्रमाण असते. रोजच्या चहामध्ये देखील खूप प्रमाणात साखर असते. यामुळे आपल्या शरीरातील रक्तात साखरेचे प्रमाण वाढू लागते आणि मधुमेह व वजन वाढणे तसेच इतर समस्यांचा उगम होऊ लागतो.

**६) रोज ग्रीन टी चा समावेश करा.**

ग्रीन टी आपल्या शरीरसाठी खूप लाभदायक असते. ग्रीन टी च्या होणाऱ्या फायद्यांमुळे जगभरात ग्रीन टी चे सेवन



दिवसेंदिवस वाढत चालले आहे. रोज ग्रीन टी चे सेवन केल्याने आपल्या शरीराचे वजन नियंत्रणात राहते, ताणतणाव कमी होण्यास मदत होतो, मधुमेह होण्यापासून सुटका मिळू शकते, रोगप्रतिकार क्षमता वाढते, हृदय चांगले कार्य करते, पाचनशक्ती सुधारते, हाडांसाठी देखील ग्रीन टी चांगली असते तसेच ग्रीन टी रोगप्रतिकरक्षमता वाढवून अजरांपासून वाचवून दीर्घायुष्यासाठी मदत करते.

**७) धूम्रपान करू नका**

तंबाखूचे धूम्रपान केल्यामुळे फुफ्फुसाचा आजार, हृदयरोग आणि स्ट्रोक सारख्या एनसीडी होतात. तंबाखूमुळे केवळ थेट धूम्रपान करणाऱ्यांनाच नाही तर धूम्रपान न करणाऱ्यांनाही त्याचा धोका असतो. तुम्ही सध्या धूम्रपान करत असल्यास तर तुमच्यासाठी ही एक हानिकारक गोष्ट ठरू शकते. एकदा तुम्ही धूम्रपान करणे टाळाल तर तुम्हाला त्वरित आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी लाभ मिळेल. धूम्रपान केल्याने आपले आयुष्य देखील कमी होते त्यामुळे जर तुम्ही धूम्रपान करत असाल तर आजपासून हे सोडून द्या.

**८) आपला रक्तदाब नियमितपणे तपासा**

उच्च रक्तदाब, याला "साइलेंट किलर" म्हणतात. हे असे आहे कारण उच्चरक्तदाब असलेल्या बऱ्याच लोकांना समस्येची जाणीव नसते कारण त्यामध्ये कोणतीही लक्षणे नसतात. अनियंत्रित सोडल्यास उच्च रक्तदाब हृदय, मेंदू, मूत्रपिंड आणि इतर रोगांना कारणीभूत ठरू शकते. आपल्या ब्लड प्रेशरची नोंद आरोग्य सेवकाकडून नियमितपणे करुन घ्या म्हणजे तुम्हाला आपले क्रमांक माहिती असतील. जर आपला ब्लड प्रेशर जास्त असेल तर आरोग्य सेवकाचा सल्ला घ्या. उच्च रक्तदाब रोखण्यासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आहे.

**९) सुरक्षित पाणी प्या**

असुरक्षित पाणी पिण्यामुळे कोलेरा, अतिसार, हिपॅटायटीस ए, टायफाइड आणि पोलिओ सारख्या पाण्यामुळे होणारे रोग होऊ शकतात. जागतिक पातळीवर, कमीतकमी 2 अब्ज लोक विष्ठेने दूषित पिण्याच्या पाण्याचा स्रोत वापरतात. आपण पीत असलेले पाणी सुरक्षित आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आपल्या वॉटर कंसिएंसर आणि वॉटर रिफिलिंग स्टेशनचा वापर करा. आपल्या पाण्याच्या स्त्रोताबद्दल आपल्याला खात्री नसेल तर कमीतकमी एका मिनिटासाठी आपले पाणी उकळवा. हे पाण्यातील हानिकारक जीव नष्ट करेल. पिण्यापूर्वी ते नैसर्गिकरित्या थंड होऊ द्या.
आपल्या शरीरसाठी किमान ५ ते ६ लिटर पाणी पिणे आवश्यक असते याने आपले शरीर निरोगी रहण्यास फायदेशीर ठरते.

**१०) आपले हात नेहमी स्वछ ठेवा**

हात स्वच्छता केवळ आरोग्य कर्मचाऱ्यांसाठीच नाही तर सर्वांसाठीच गंभीर आहे. स्वच्छ हात संसर्गजन्य आजारांचा प्रसार रोखू शकतो. सॅनिटायझरचा वापर करून आपले हात स्वच्छ करा मळलेले हाथ धुण्यासाठी साबण आणि पाण्याचा किवा हँडवॉश चा वापर करायला हवा.

**११) वेळेत भोजन करा**

वेळेत नियमित प्रमाणे आहार घेतल्याने आपले शरीर संतुलित रहण्यास मदत होते. योग्य वेळेत आहार घेतल्याने आपले शरीर तणावमुक्त राहते आणि कामात सुद्धा मन लागते. सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण कधीच वगळू नका. सकाळी ८ च्या आत नाश्ता करणे, दुपारी १ च्या सुमारास आणि रात्री ९ च्या आत जेवणे शरीरसाठी योग्य असते.

**रोज १ सफरचंद : No Doctor**
**रोज ४ बदाम : No Cancer**
**रोज १ लिंबू : No Fat**
**रोज १ ग्लास दूध : No Bones Problem**
**रोज १२ ग्लास पाणी : No Skin Problem**
**रोज ४ खजूर : No Weakness**

# गाने गाने पे लिखा है...

आधुनिक केसरी

दादा कोंडके त्यावेळी त्यांच्या पहिल्या मराठी सिनेमा सोंगाड्या च्या चित्रीकरणात व्यस्त होते. आपल्या पहिल्या



सिनेमात लताच्या आवाजात एखादं तरी गाणं असावं अशी त्यांची फार इच्छा होती. त्यांनी संगीतकार रामभाऊ कदमांशी तसं बोलूनच ठेवलं होतं. वसंत सबनीस यांच्याकडून त्यांनी एक मस्त लावणी लिहून घेतली.लावणीचे बोल होते 'राया मला पावसात नेऊ नका..' लताबाईंच्या रामभाऊंसोबत रिहर्सल सुरू झाल्या. दादा इकडे कोल्हापूरात शूटींग मध्ये व्यस्त होते. त्यांनी रामभाऊंना लवकरात लवकर ती लावणी रेकॉर्ड करून ती पाठवायला सांगितली. राम कदमांनी लगेच बॉम्बे लॅब बुककरून लताला सकाळी नऊ वाजता रेकॉर्डींग करीता बोलावले. लताबाई वेळेवर आल्या पण ' आज घसा बरोबर नाही आज रेकॉर्डींग नको' असं म्हणून निघून गेल्या. रामभाऊंवर जणू बॉम्बच पडला. रेकॉर्डींगचे भाडे इतर खर्च मराठी चित्रनिर्मात्याच्या आवाक्याच्या बाहेरचा होता. तिकडे दादा या लावणीची वाट पाहत खोळंबून बसले होते.रेकॉर्डींग रद्द कर्णे कुणालाच परवडणारे नव्हते.मग काय मार्ग काढायचा? त्यांचा एक ढोलकी पटू होता पंडीत विधाते नावाचा. रामभाऊंनी त्याला बोलावले व सांगितले.' आत्ताच्या आत्ता माहिमला जा आणि पुष्पा पागधरेला घेवून या. येताना टॅक्सीतच तिला गाण्याची चाल समजून द्या व जमलं तर रिहर्सल घ्या! पण गाणं आज रेकॉर्ड झालचं पाहिजे'. ठरल्या प्रमाणे पुष्पा पागधरे आल्या व एक दोन टेकमध्येच लावणी रेकॉर्ड झाली सुध्दा! रामभाऊंनी लगोलग दुपारीच ती कोल्हापूरला दादांकडे पाठवून दिली व सुटकेचा निश्वास सोडला. पण खरी गंमत पुढेच आहे.

दोन दिवसांनी राम कदम कोल्हापूरला गेले. तिथल्या जवळच्या रेंदाळ या गावी शूट चालू होतं.रामभाऊ ला पाहताच दादांनी त्यांना मिठी मारली.आनंदाने ते म्हणाले' अरे काय सुंदर लावणी बनवली आहेस आणि लताने काय बेफाम गायलीय. युनिट मधील सर्व लोक पागल झालेत त्या लावणीने आम्ही कालच चित्रीकरणसुध्दा करून टाकले.'

राम भाऊंनी त्यांचा उत्साह कमी झाल्यावर बाजूला घेवून रेकॉर्डींगची खरी स्टोरी दादांना सांगितली. आता आश्चर्यचकीत व्हायची पाळी दादांची होती. ज्या स्वराला सारे युनिट खुद्द दादा लताचा समजत होते तो आवाज तिचा नसून पुष्पा पागधरेचा आहे हे मान्य करायला त्यांना फार वेळ लागला! आपल्याकडे एक म्हण आहे 'दाने दाने पे लिखा' त्याच चालीत आता म्हणावे लागेल 'गाने गाने पे लिखा है' राम भाऊंच्या संगीतात लताचे गाजलेले गाणे १९७२ साली आलेल्या 'पिंजरा ' या चित्रपटात होते. केला इशारा जाता जाता (१९६५), अशीच एक रात्र होती (१९७१)पिंजरा (१९७२) चंदनाची चोळी अंग अंग जाळी(१९७५) हे त्यांचे अन्य गाजलेले सिनेमे.१९ फेब्रुवारी १९९७ ला त्यांचे निधन झाले.

# तीळगूळ घ्या... गोड गोड बोला.....!!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते.**

मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १५ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!



# मी फास बोलतोय..!

आधुनिक केसरी

ना रक्ताच्या चिळकांड्या, ना हाडामांसाचा चिखल पण जीव जाताना मुका आक्रोश करणारे कंठ आणि हळू हळू दोरी सोडून देत सैल होणारे हात, कंठाभोवती स्वतःला आवळून घेणारा मी आणि त्या काळजातून आक्रोश करणाऱ्या हातांची माझ्यासोबत शेवटची मिठी. गाठीगाठीने बनलेली माझी आकृती, या आकृतीने अशीच एक संसारगाठ तुटताना डोळ्यांनी निरखली आहे. त्या शेतकऱ्याचं निर्वाण होताना त्याचा आत्मा माझ्यासवे सलगी करत होता आणि त्या काही क्षणांच्या सोबत्यानं माझ्यासोबत बरीच हितगुज केली. मी आपला अंदाज बांधत होतो, नेमकं काय घडलं असावं? माणूस असाच जीवावर उदार होणार नाही. त्याच्या आणि माझ्या तिखट संवादाला प्रारंभ झाला. एखाद्या मुकचित्रपटातील अभिनेत्याप्रमाणे तो खुणावत होता. सर्वप्रथम त्याने स्वतःला दोष दिला. "आम्ही शेतकरी सर्वांचं पोट भरतो, आम्ही पोशिंदे आहोत." असं त्याच्या हयातीत त्याने कधीच बोललं नसावं, कसलाही स्वार्थ न ठेवता,तो सदैव ऋणी राहणे पसंद करतो, अशा या बळीराजाला स्वतःला दोष देण्याची गरज पडावी? असा प्रश्न माझ्या मेंदू नसलेल्या आकृतीला पडला तर या सर्वोच्च बुध्यांक असलेल्या मानव जातीला का पडू नये? स्वतःला दोष देऊन झाल्यावर त्याने हातातील दोरी मोकळी केली, दोरी म्हणजे माझंच एक निरागस, निष्पाप, उपयोगी रूप बरं का! किती विचित्र असतं ना जग, स्वतःची चूक नसताना तो चिरडला गेला आणि माझी चूक नसताना मी एका पापाचा भागीदार झालो.

भयंकरच होतं सगळं! शेवटच्या क्षणी सतत कुटुंबाचा विचार करणारे त्याचे मन खुप काही बोलण्याचा प्रयत्न करत होते. मी गेल्यावर सर्वकाही ठीक होईल असे मनाला बजावून त्याने स्वतःला धीर दिला.त्याच्या मनातली मला कळलेली कारणं तशी साधीच, पण विळखा घालून बसलेल्या सर्पासारखी असंख्य बळीराजांचे जीव घेत होती. मेहनतीचे बीज मातीत मिसळताना त्याने कधीच संकोच केला नव्हता, आता मात्र त्यालाच मातीमोल करण्यासाठी काळ फितूर झाला . आज त्या यमराजाचे डोळे पाणावले असतील.सगळेच हुजरी होते, तो शेतकरी, त्याची कारणे, तो यम आणि मी सुध्दा. पण त्या कारणामध्ये एक कारण म्हणजे शेतकऱ्यांची पिळवणूक करणारे माणसातीलच काही हात, त्या हातांपर्यंत माझी ही हाक पोहचली तर मी सर्वांचा ऋणी राहीन.

महेश जायभाये
संपर्क 8080854137

# एकीच्या गालात हसू तर दुसरीच्या डोळ्यात अश्रू



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**आज मकरसंक्रांतीचा सण आहे. त्यानिमित्ताने सर्वांना मकरसंक्रांतीच्या हार्दिक, हार्दिक शुभेच्छा हा सण सर्वानाच आवडता आहे. म्हणून ह्या सणाची सर्वजण आतुरतेने वाट बघत असतात. इतर सणाला सुद्धा सर्वजण मानतात पण, ह्या सणाला मात्र अधिकच मानत असतात. कारण ह्याच सणाच्या दिवशी सर्वजण आपुलकीने म्हणत असतात की, तीळगुळ घ्या आणि गोड, गोड बोला पण, इतर सणाला का बरं म्हणत नाही. .? हा सुद्धा एक प्रश्नच आहे नाही का. .? असो, पण, काही का असेना निदान या तरी सणाच्या निमित्ताने म्हणतात ही चांगली गोष्ट आहे पण, त्याच म्हणण्याप्रमाने खरच सर्वजण तसे वर्षभर आपुलकीने बोलतात आणि वागतात का. ..? हाही एक प्रश्नच आहे. जसे, आपण म्हणत असतो तसेच वागणे सुद्धा प्रत्येकांचे कायमच असायला पाहिजे. पण, तसं मात्र होताना दिसत नाही.**

मकरसंक्रांतीचा हा सण एकमेकात गोडवा निर्माण करणारा आहे,स्नेहबंधनाचे धागे विणनारा आहे एवढेच नाही तर ह्याच सणाच्या निमित्ताने वर्षातून एकदा तरी एकमेकांच्या घरी जाणे, येणे होते आणि असेच चालू रहायला पाहिजे. हा सण खास करून महिलांचा आवडता आहे. एका महिन्यापासून खरेदी करण्यासाठी महिला आनंदाने बाजारात जात असतात अतिशय चांगली गोष्ट आहे. पण, ह्याच समाजामध्ये अशा काही महिला आहेत की, हा सण येण्याच्या आठ दिवसापासून रडत असतात त्या कोण आहेत हे, सर्व महिलांना ओळखता आले पाहिजे. या भूमातेवर जेवढ्या महिला जन्मांला आलेल्या आहेत त्या क्रांतिज्योती सावित्रीआई फुले, महा संस्कारी,स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ, भारतमाता, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर तसेच होऊन गेलेल्या सर्व महा विभूती च्या लेकी आहेत आज त्यांच्याचमुळे प्रत्येक महिला येशाचा शिखरावर पोहचली आहे हे, कोणत्याही महिलांनी क्षणभरासाठी सुद्धा विसरता कामा नये. पण, आज का म्हणुन त्यांचा विसर पडतो आहे हेच समजत नाही. एक महिला दुसऱ्या महिलेचे दुःख समजू शकत नाही, तीला आधार देऊ शकत नाही, तीचे अश्रू पुसू शकत नाही का म्हणुन ती, हे सर्व करू शकत नाही..? आजची महिला सुशिक्षित आहे, ज्ञानी आहे, हुशार आहे पण का म्हणुन अशी वागते. .आणि कशासाठी. .? असे अनेक प्रश्न आजच्या महिलांच्या बाबतीत दिसत आहेत. आजच्या लेखाचा शीर्षक हा तीन महिलांवर ती आहे. यातील पहिली महिला म्हणजेच एक सुहासिनी महिला, दुसरी मोलमजुरी करणारी महिला आणि तिसरी विधवा महिला या तिनही महिलाच आहेत. एकाच हाडामासांच्या व एकच रंगाने बणलेल्या रक्ताच्या आहेत पण, तिघीहींमध्ये मात्र जमिन आसमानचा फरक आहे. म्हणतात ना की, नियतीचा खेळ कोणी आजपर्यंत जाणला निसर्गाचा नियम आहे की, एक दिवस जन्माला येणे व एक दिवस जाणे इथे महिलेचा काय दोष आहे. .? जेव्हा, तीचा पती जिवंत असतो तेव्हा मात्र ह्याच समाजात ती स्वतंत्रपणे फिरू शकते, हळदीकुंकू घेण्यासाठी जाऊ शकते इतर समारंभात भाग घेऊ शकते, आनंदीत राहू शकते, एवढेच नाही तर ती इतरांना ही आधार देते पण, त्याच महिलेचा पती जेव्हा वारल्यानंतर ह्याच समाजात तीचा मानसम्मान एका क्षणात संपून जाते ...? अरे, नियती तर..हा खेळ खेळते पण आपण तर माणसे आहोत ना..?आपण कसे काय तिच्या जीवनाशी खेळू शकतो. .? ती, सुद्धा एक महिलाच आहे तीला समजून घ्यायचे सोडून तिच्या जवळून तिरप्या दृष्टीने आपण बघतो हे, कितपत योग्य आहे आणि अशा प्रकारे बघण्याचा कोणी अधिकार दिला...? एक वेळचे हे,सर्व ठीक आहे की,काही जुन्या संस्कृती,जुने चांगले विचार सर्वानी आत्मसात केले पाहिजे पण, ते,कोणीही करत नाही उलट त्या निरपराध महिलेलाच आजच्या विज्ञान युगात सुद्धा सारं काही सहन करावे लागते फार मोठे दुःख वाटते हे, सर्व बघताना हे, सर्व थांबविण्यासाठी पुढाकार घ्यायचे सोडून उलट तीला पुन्हा गांजून सोडतात हे,कोणत्याही महिलेला व पुरुषाला शोभा देत नाही.



हे, सर्व थांबविण्यासाठी एका महिलेची वैरीण न बनता सर्वात आधी महिलांनी समोर यायला पाहिजे. आज मकरसंक्रांतीच्या निमित्ताने सुहासिनी महिला एकमेकींना हळदीकुंकू देऊन वाण वाटणार आहेत त्याच समारंभात विधवा महिलांच्या दुःखी जीवनात क्षणभरासाठी तिच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी तिलाही सहभागी करून घ्यायला पाहिजे ती कधीच म्हणणार नाही की,मला हळदीकुंकू, वाण द्या तीला फक्त, आपुलकीने बोललेले दोन शब्द भरपूर आहेत. क्षणभरासाठी ती, आपले दुःख विसरून जाईल फक्त ,एवढे तिच्यासाठी करता आले पाहिजे. आणि प्रयत्न करून बघा नक्कीच एक महिला होण्याचा तुम्हांला अभिमान वाटेल. .कारण, त्याच महिलेच्या त्यागामुळे भारत देशातील सर्व जनता सुखानी जगू शकत आहे. ते, म्हणजेच सिमेवर राहून तिनही कडक ऋतूमध्ये लढा देत असतात आणि एक दिवस शहिद होतात ते,आम्हां सर्वांचे शूरवीर सैनिक होत ,त्यांना आपण कसे विसरू शकतो. ..?

त्याच प्रमाणे ह्याच समाजामध्ये राहणारी तिसरी महिला म्हणजेच , मोलमजुरी करणारी गरीब महिला होय. आज ह्या गरीब, मोलमजुरी करणाऱ्या महिलांना सुध्दा कोणीही ओळखत नाही. त्यांना सुद्धा भेदभाव केल्या जाते. पण, कोणत्याही महिलेने अशा प्रकारची भेदभावाची भावना आपल्या मनात ठेवू नये, कारण, परिस्थिती कधी बदलेल व कधी कोण राज्याचा रंग होईल हे सांगता येत नाही. म्हणून या महिलांविषयी जरा विचार करून बघावे कोणाला त्या धन, संपत्ती मागत नाही तर फक्त, त्यांना दोन शब्द प्रेमाचे, आपुलकीचे हवे असतात हेच त्यांच्यासाठी खूप काही असते म्हणून निदान माणुसकीच्या नात्याने तरी असे वागू नये, भेदभाव विसरुन जावे, व एक महिला म्हणून महिलेला सन्मान देण्यासाठी तीला स्वतंत्रपणे जगता यावे यासाठी पुढाकार घ्यावा आणि घ्यायला पाहिजे. कारण आज ही अत्यंत काळाची गरज आहे.

# वर्षातला पहिला सण - संक्रांत

आधुनिक केसरी

आज मकर संक्रांत हा सण संपूर्ण भारतात वेगवेगळ्या राज्यात आप आपल्या पद्धतिने मोठ्या उत्साहात साजरा केला जातो सूर्य जेव्हा मकर राशित प्रवेश करतो तेव्हा त्या दिवसाला मकर संक्रांति म्हणतात वर्षातला हा पहिला सण हयाँ दिवशी घराघरातील लहानापासून तर मोठ्यांपर्यंत सर्व सदस्य काळ्या रंगाचे वस्त्र परिधान करतात कारण यामागचे कारण असे आहे की वर्षाच्या पहिल्या सनाला येणारे संकट आपल्यावर येऊ नये म्हणून काळ्या रंगला महत्व आहे. सुवासिनी स्त्रियाचा हळदी कुंकु कार्यक्रम पुढील आठ चालतो घरातील लहान बाळ असो किंवा नवंवधू हलव्याच्या दगिने घालून फोटो काढले जातात हयाँ दिवसात हलव्याच्या दागीन्याना मोठी मागणी असते स्वयंपाक घरात गोड़ धोड




करून आपल्या मेलेल्या पूर्वजाना घास आगारी टाकून नमस्कार केला जातो घराघरात तीळ, मुरमुरे, शेंगदाने लाडु केले जातात मनातला कोणा आपल्या व्यक्तिविषयिचा राग काढून परत नव्याने सुरवात करण्याचा हा दिवस असतो वर्षानुवर्ष एकमेकांसोबत बोलत नसलेल्या व्यक्तिसुद्धा आजच्या दिवशी दोन चार शब्द का असेना या सणाच्या निम्मीताने बोलतात मनातला राग, द्वेष, मत्स्यर, कायमचा काढून टाकावा आणि प्रेमाचे दोन शब्द बोलावे असा या सनाचा उदेश्य आहे गुजरात राज्यात हयाँ सणाला पतंग उड़वान्याला मोठे महत्व आहे संक्रांतिला दिवसभर घराच्या छता वर पतंग उड़वतांना लहान मूल मोठी माणस स्त्रिया दिसतात मकर संक्रांतिला तीळ आणि गुळाला विशेष महत्व आहे. भूतकाळात घडलेल्या कडू आठवणीना विसरुन नव्याने गोड़ सुरवात करण्याचा हा दिवस असतो थंडीच्या दिवसात शरीराला ऊब मिळावी म्हणून तील खाल्ली जाते गुळाचे ही विशेष महत्व आहे गुळ खालल्यावर आणि दांन केल्यावर सूर्य आणि शनि ग्रहाचे शुभ कार्य होते तील गुळाचा प्रसाद म्हणून दिला जातो यामुळे घरातील अशांतिचा नाश होतो आणि घरात शांति राहते, अशी ही मकर संक्रती सर्वांच्या आयुष्यत सुख समाधान आणि घेऊन येवो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

# अळूची पाने आरोग्यासाठी वरदान ! फायदे जाणून घ्या

आधुनिक केसरी

अळूची भाजी, अळूच्या वड्या अनेकजण चवीने खातात. अळू आरोग्यासाठीही लाभदायक आहे. आयुर्वेदातही याचे महत्व सांगण्यात आले आहे. याचे शरीरासाठी अनेक फायदे आहेत. याच्या सेवनाने अनेक आरोग्य समस्यांपासून सुटका होते. या भाजीचे कोणते फायदे आहेत, जाणून घेवूयात.



**हे आहेत फायदे –**

**ब्लड प्रेशर**

ब्लड प्रेशर नियंत्रित राहते. तणावाची समस्या होत नाही.

**वजन**

यातील फायबरमुळे मेटाबॉलिज्म सक्रिय राहते. यामुळे वजन नियंत्रणात राहते.

**पोटाच्या समस्या**

पोटांच्या समस्यांवर गुणकारी आहे. पचनक्रिया सुरळीत होते.

**पूरळ**

अळूची पाने जाळून त्यांची राख नारळाच्या तेलामध्ये मिसळून लावल्यास पूरळ नाहीसे होण्यास मदत होईल.

**दृष्टी**

यातील व्हिटॅमिन ए मुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते. डोळ्यांच्या मांसपेशी मजबूत होतात.

**सांधेदुखी**

सांधेदुखीत दररोज अळूच्या पानांचे सेवन केल्यास आराम मिळेल.

## वेड




वेड मग ते कशाचेही असो
एकदा तरी लागायलाचं हवं..
भेटली नाही 'ती' तरीही तिच्यावर
एकदा प्रेम करायलाचं हवं..

भर पावसाळ्यात भेटत असते
अजूनही पाण्यात होडी सोडताना..
हळूच हसते गालात आजही
गाव तिचे सोडताना..

वहीचे शेवटचे पान ठेवले होते
आजही तिच्या आठवणीत राखून..
कधीतरी तिने दिलेले गुलाब फुल
आजही मनात फुलतेय आठवून..

बस स्टॉपवर तिने दिलेला कटाक्ष
आजही हृदयाचा वेध घेतोय..
तिच्या पाठीमागे घरापर्यंत गेलेले
आजही अधून मधून आठवत जातोय..

एकदा तिने दिलेले गिफ्ट मी
लग्नाच्या गिफ्टमध्ये आजही शोधतोय..
मायना बदलून आलंय का पाहण्यात
दिवसेन दिवस निघून जातोय..

स्वप्नात आली की थांबत नाही
आयुष्याचा पट उलगडत जाते..
आठवणीत तिच्या आजही
दिवसाची रात्र होते..

ती कधी भेटलीच तर
आठवत जातात सोनेरी दिवस..
तिने लावलेले वेडाचे झाड
आठवत राहते खास न खास..

अश्याच वेडाच्या कथा
जन्मोजन्मी घडत जाव्यात..
प्रेम दुसरे असते काय?
आठवणी मनात जागवत जाव्यात..

तू भेटलेल्या मंदिरात आजही
भक्तीसाठी रांगा लागल्या आहेत..
शोधतोय त्या रांगेत आजही तुला
दिसशील वाटतेय आजही त्यात..

वेड तुझे आजही मनातून
काही केल्या जात नाही..
तू केलेल्या जादुई नजरेतून
प्रेम काही सुटत नाही..

वेड मग ते कशाचेही असो
एकदा तरी लागायलाचं हवं..
भेटली नाही 'ती' तरीही तिच्यावर
एकदा प्रेम करायलाचं हवं..

@ संजय जेवरीकर
पत्रकार






## क्रिमरोल

भूक उचंबळून वर यायची
आतडी फाटायची
जीभ सुकायची
लाईफ संघर्षाच्या काळात
करिअर करिअर म्हणायची
तेव्हा, पोटाला आधार देणारा
कटिंग चहाबरोबर
खिसा सांभाळत हातात यायचास
माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल...

दिवसातून एकच भेट
तुझं माहीत नाही
पण मी तरसायचो तुला भेटायला
भुकेचा आणि मेंदूचा
जुगार चाललेला असताना
भूक नेहमी हारायची
तेव्हा तू द्यायचास आधार
माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल...

तू फार आवडत होतास
असं नाही
पण तू भूक अडवत होतास
काही काळ तरी
तुला बनवणाऱ्या हाताला
मी कायम सलाम करत राहिलो
माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल...

मराठवाड्याचा दुष्काळ
विदर्भाचे दुःख
खान्देशी,माणदेशी,
कोकणी आणि बरंच काही
फक्त तू जवळून पाहिलं
तु प्रत्येकाचा आधार झालास
माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल...

तू हातात आलास की
नेमकं त्याचवेळी आई
फोनवर विचारायची
काही खाल्लं का रे बाळा..?
तेव्हा तुला अख्खा तोंडात
कोंबून बोबडे बोल बोलायचो
आईशी आई जेवतोय नंतर बोलतो.
खरंतर तेव्हा फार जवळचा वाटायचास
मला माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल...

अस्लमला भेटतोस
चंदनशिवेला भेटतोस
भोसलेला भेटतोस
आणि एखाद्या जोशीलासुद्धा
पण तूच एकमेव आहेस
कुणाला नाव,गाव,जात,धर्म
न विचारता आधार देत राहतोस
माझ्या प्रिय मित्रा क्रीमरोल..

तू संपून जाणारा
एक पदार्थ असलास तरीही
तू स्टगलरांचा फार मोठा आधार
आहेस तू मला जी साथ दिलीस
नाद खुळा यार नाद खुळा
पाच रुपयात भूक मारायची
कला तुझ्यात आहे

म्हणूनच अनेक स्टगलर कलाकारांना
तुझा फार मोठा आधार आहे
माझ्या प्रिय मित्रा क्रिमरोल..

दंगलकार-नितीन चंदनशिवे
मु.पो.कवठेमहांकाळ
जि.सांगली, 7020909521

## सूनबाई सूनबाई



नको बाई रुसू अन कोपऱ्यात बसू।
सासूसास-याला करु नकोधुसफूसू ।।

नवरा येताच नको करु दांडपट्टा सुरु।
आदळ आपटून पलंगावर नको पसरु ।।

दीराला पाण्यात पाहू नकोस ।
नणंदेला टाकून बोलू नकोस ।।

करूनका वसवस जरा धीर धरा ।
घाला मायेची पाखर प्रेमाचा पिसारा।।
घरात आपुल्या नका घडवू महाभारत ।
करूया सणवार साजरा परत परत।।

होईल बोभाटा मारकी म्हैस म्हणून ।
बोला प्रेमाने धरू नको लई ताणून ।।

आपल्या घराची कळा सांगतं आंगण ।
करा घरच्या मुलाबाळांची पाठराखण ।।
वा.र.आहेर. नासिक, 9958782982

## दारु पिऊन तुम्ही ..

पडते पाया बाबा नका मला मारू
दारू पिऊन तुम्ही असा धिंगाणा
करू !! धृ . !!

मजुरीसाठी माय माझी शेतात जाते
लवकर उठून घरी सकला स्वयंपाक
करते तरी तुम्ही तिचा असा जीव
नका घेऊ

मजुरांसवे बोंड बोंड उन्हात वेचते
थकुनभागून संध्याकाळी घराला
येते ढोसलून तुम्ही तिला शिव्या
नका देवू

व्यसनी आहे बाप तुझा पोरी मला
म्हणता डोळ्यात काहून तुम्ही
माझ्या आसवं आणता बदला
तुमची सवय बाबा द्याना मला
शिकू

-आनंदा वारांगणे मोलखेडा ता
सोयगाव जिल्हा औरंगाबाद
मो नंबर 8698626369






प्रभु करा दया अपार
समोर आहे कडेकपार
नको अपेक्षांचे लटांबर
बसू दे समाधानाने काठावर ।।
नको देऊ असुयेचा सहवास
अन नको कुणाचा दुश्वास
करू बापड्यांसाठी अट्टाहास
न घडो कुणाला जगी उपवास।।
जाऊ द्या तिमीर दुरितांचे
होऊ या मायबाप अनाथांचे
सुख मिळावे नामसंकीर्तनाचे
होईल सार्थक नश्वर जीवनाचे ।।
नको मज विरक्ती नको मज आसक्ती
भवसागर पार कराया दे मज शक्ती
असु दे मज ठायी तुझी भक्ती
आस लागली मिळो मज मुक्ती।।
आहेर वा.र. नासिक
9958782982

## सासू माय

अंतर कधी दिले नाही तू कधी
माया लावली तू मायेच्या लळेची
एकटीच बई तू आम्हा सोडूनी चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई होती
भेटली...
तुझ्या पदरात दाटलेला दयेचा सागर
डोक्यावरुन कसा आटत चालला
मायेचा पदर तुझा कसा इरत चालला
एकटीच बई तू आम्हा सोडूनी चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई होती
भेटली...
रुततीलं ना ग..,खडे बोचरे तुझ्या
अनवाणी पायामधी
नसेल ना सोबत तुझा हात धराया
कुणी
एकटीच बई तू आम्हा सोडूनी चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई होती
भेटली...
एकटीच बई तू परतीच्या वाटेवर
एकटीच बई तू आम्हा सोडूनी चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई
होती भेटली...
थांब ना ग..,जाऊ नको अशी
वाऱ्यासारखी जिव्हाळ्याने जपली
तू नाती-गोती एकटीच बई तू आम्हा
सोडूनी चाललीसासूच्या रुपात माय
रुख्माई होती भेटली...
अजून बई, दे तुझा सहवास
नको नेऊ मायेच आभाळ
हेरावून
एकटीच बई तू आम्हा सोडूनी
चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई होती
भेटली...
सवयीने,घरात तुझी होईल शोधा-शोध
हाक तुझी ऐकायला तरसतील कान
एकटीच बई तू आम्हा सोडूनी चालली
सासूच्या रुपात माय रुख्माई होती
भेटली...
लक्ष्मण वाल्डे-कन्नड



# काळोखाच्या तपोवनातून; जीवननिष्ठा जपणारी कविता



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मराठीचे आद्य गझलगायक असलेले आणि गझल गंधर्व या नावाने ओळखले जाणारे सुधाकर कदम यांच्या कवितांची ओळख महाराष्ट्रातील काव्य रसिकांना मीच आहे येथे फक्त पारसा ह्या संग्रहात द्वारे झालेलीच आहे. मुळात गायक-संगीतकार असलेले सुधाकर कदम गीतकार, गझलकार, अभंग रचनाकार, सशक्त विडंबनाकार अशा सर्व पातळीवर आपल्याला पुन्हा भेटतात ते त्यांच्या काळोखाचा तपोवनातून ह्या दुसऱ्या काव्यसंग्रहातून, या संग्रहात सुधाकर कदम यांनी मराठीतील जवळपास सर्व काव्यप्रकार हाताळले आहेत हे विशेष. दीर्घ आणि व्यापक असा अनुभव, सकारात्मक विचारशैली, उस्फुर्त सृजनशीलता, शब्द सौंदर्य ह्या सोबत नेमक्या सुरांची साथ त्यामुळे कवितेला लाभलेली लयबद्धता ह्या सर्व अनुषंगाने सुधाकर कदम यांची कविता काव्य रसिकांना आकर्षून घेणारी ठरते. पुण्यासारख्या आधुनिक शहरामध्ये राहत असले तरीही मूळ विदर्भातील रहिवासी असलेल्या सुधाकर कदम यांना ग्रामीण भागात जगणाऱ्या शेतकऱ्याच्या दुःखाची आणि वेदनेची जाणीव आहे. आपल्या कवितेमधून शेतकऱ्यांचे दुःख मांडतांना कवी म्हणतात...**

**चिल्यापिल्यासंगे ।उन्हापावसात राबतो शेतात। सालोसाल...
जीवापलीकडे। मेहनत करी तरीही भाकरी। मिळेचि ना...
ए.सी.त बसोनि। शेतकऱ्यावरी लिही कादंबरी। मुंबईत...**

वर्षानुवर्ष शेतामध्ये राबत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनामध्ये सालोसाल अंधारच आहे. जिवापाड मेहनत करून आपल्या देशामध्ये शेतकऱ्याला आणि त्याच्या कुटुंबियांना दोन वेळचे जेवण सुद्धा मिळत नाही. अंगावर व्यवस्थित कपडे सुद्धा मिळत नाहीत. अशा दयनीय अवस्थेत शेतकरी जगत असताना त्याचे हिरवेगार शेत पाहून शेठ सावकार त्याला त्याने घेतलेल्या कर्जासाठी तोडत असतात. अनेकदा तर कर्जबाजाऱ्याला आत्महत्या सोडून दुसरा उपाय दिसत नाही. अशावेळी मुंबईसारख्या मेट्रो सिटी मध्ये बसून वातानुकूलित वातावरणात बसून काही लोक शेतकऱ्यांच्या जीवनावर कथा कादंबरी कविता लिहीत असतात आणि शेतकऱ्यांची व्यथा आणि वेदना समजून घेतली म्हणून त्यांना पुरस्कारही मिळत असतात. हा विरोधाभास आपल्या कवितेतून व्यंगार्थ स्वरूपात सुधाकर कदम यांनी चपखलपणे व्यक्त केला आहे. सुधाकर कदम यांचे शेती जीवनाविषयीचे निरीक्षण फार उत्तम आहे. जेव्हा शेतकरी शेतामध्ये काबाडकष्ट करतो त्यावेळी शेतकऱ्याची पत्नी किंवा ग्रामीण शेती मातीतील स्त्री जे काम करत असते त्याबद्दल ते म्हणतात...

**घरघरून उठता जात्यामधून विठ्ठल
कष्टवतीच्या घामाचा चोहीकडे परीमल**

शेती-मातीत राबणाऱ्या स्त्रीच्या घामाला येणाऱ्या वासाला परीमल म्हणणे आणि कष्ट करणाऱ्या स्त्रीला कष्टवती म्हणून संबोधने हे काम बहुदा मराठी भाषेमध्ये सुधाकर कदम यांनी पहिल्यांदा केले असावे. सौंदर्यवती, लावण्यवती, रुपवती ह्या शब्दासोबत स्त्रीसाठी पहिल्यांदा कष्टवती हा शब्द वापरून मराठी भाषेत नव्या शब्दांची भर टाकत भाषेला समृद्ध करण्याचे कामही सुधाकर कदम करत आहेत असे म्हणणे जास्त सोयीस्कर ठरते. कष्ट करून शेतकऱ्याला समर्थ साथ देणाऱ्या स्त्री बद्दल बोलताना म्हणतात...

**किती संकटे येऊ दे दूर ठेऊया दुःखाला
तू असता संगे माझ्या घरपण येई घरट्याला**

फक्त शेतकऱ्यासंदर्भातच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या अर्धांगिनीच्या कार्याचा गौरव करत स्त्रीचे महत्त्व अधोरेखित करणारी घरपण ही कविता आहे असे आपल्या लक्षात येते. सुधाकर कदम यांचे निसर्गभान खूप लाघवी आहे. आपल्या कवितेमध्ये आपल्या शब्दातून त्यांनी अतिशय विलोभनीय असा निसर्ग टिपला आहे. शेती आणि निसर्ग यांचा समन्वय आपल्या शब्दातून मांडताना कवी म्हणतात,

**अवघं लाघव हिरवं तुडुंब द्यावी वाटे येथे मनालाही डूब
भरल्या शेताच दर्शन घडता सृष्टीपुढे झुके आपसुक माथा**

बहरलेले हिरवेगार शेत, रानामध्ये उभा जोंधळा, बरबटी अशी वेगवेगळी पिके, माळरानावर फुललेली रानफुले असे सृष्टीचे वेगळे रंग आणि हिरवा निसर्ग पाहून ह्या निसर्गामध्ये रममाण झाले पाहिजे, डुबून गेले पाहिजे अशी भावना कवी व्यक्त करतात. निसर्गावरील अनिल कविता या संग्रहामध्ये आपल्याला वाचायला मिळतात. अनवट सूर सारख्या कवितेमधून वर्षा ऋतूचे वर्णन श्यामरंग सारख्या कवितेतून निसर्ग, प्रेम, राधाकृष्ण अशा अलवार संदर्भातून कवी आपला मनोभाव उलगडतात.




पाऊस,चैत्रपालवी, निसर्ग किमया अशा रचनांमधून तर जिवंत निसर्ग आपल्या शब्दातून कवींनी रेखाटला आहे. आठवण सारख्या कवितेमधून संध्या समयीच्या कातर आठवणी असताना विविध ऋतूंचे रंग पृथ्वीचे अंगण सजवतात आणि आठवणीचा न्यारा श्रावण व्याकूळ करतो अशी भावना कवी व्यक्त करतात. निसर्गाचे हे अल्हाददायक रूप असे वाचकाला भुरळ घालते. तसेच रणरणत्या उन्हात निसर्गाचे भयावह रूप सुद्धा कधी कधी दिसून येते. रखरखत्या उन्हात दिसणारा निसर्ग टिपताना सुधाकर कदम म्हणतात... **वेदनेला येई। उदयास्ती रंग रोजची दुपार। पेटवीते अंग देहा फुटे झरा। पाणी शोधताना कोस कोस धाव। वेगाने घेताना डोळ्यावर दाटे। कारूण्याचे धुके जनावरांचेही। हंबरणे मुके**

उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी होणारी तगमग, जीवाची होणारी लाहीलाही, घोटभर पाण्यासाठी मैलोनमैल प्रवास करणारी जनता, पाण्यावाचून जनावराचे हंबरणे हे सर्व अंगावर येणारे दाहक वर्णन निसर्गाचाच एक भाग आहे. तोही तितक्याच प्रभावीपणे चितारण्याचे काम कवींनी केलेले दिसून येते. अर्थात जिथे पाण्याचे दुर्भिक्ष आपल्या कवितेमधून दाहकतेने कवी मांडत असतात त्याच वेळी **डोईवर एक। दुजी कटीवर घेउनी घागर। सुंदरी ही...** अशा शब्दात पाणी भरायला निघालेल्या रमणीचे वर्णन सुद्धा कवी तितके स्थापनेने करत असतात. सुधाकर कदम यांनी नजाकत भरल्या अश्या प्रणय रचना काळोखाच्या तपोवनातून ह्या संग्रहातून काव्यरसिकांच्या समोर ठेवल्या आहेत. कल्लोळ सारखी प्रणयरम्य कविता गणितीय भाषेत जाते. पूर्णत्वा, वर्तुळ, लांब त्रिज्येला जोडता अशा शब्दात प्रणयाचे पूर्णत्व कवींनी अधोरेखित केले आहे. प्रणयरम्य कवितेमध्ये गणितीय भाषा हा एक वेगळाच प्रयोग सुधाकर कदम यांनी या कवितेत केलेला दिसून येतो. ताळेबंद, प्रेमामध्ये, अत्तराचा फाया, रेशीम रात, भुलवा अशा अनेक कविता या संग्रहात प्रणयाच्या नवीन, अल्लड आणि आल्हाददायक भावभावनासह आलेल्या आहेत. नसे तू राधिका। नसे मीही कृष्ण बासरीची तान। नसे तेथे...

**(भुलवा) किंवा ना मी कृष्णा ना तू राधा**
का व्हावी गे सावळ बाधा ? असे प्रश्न विचारत कवींनी राधा-कृष्णाची प्रीत शब्दांकित केली आहे. राधा,कृष्ण, ययाती, द्रोपदी, जानकी अशा काही पुरातन व्यक्ती प्रतिमांचा आणि प्रतिकांचा वापर सुधाकर कदम यांनी आपल्या कवितेत फार सहजतेने केलेला दिसून येतो. स्त्रियांवरील अन्याय अत्याचार ह्याबाबत बोलत असताना कवी म्हणतात,

**ना महाभारत, न रामायण
तरीही जानकी अन् द्रोपदी
लागे पणाला...** असे सांगून मर्यादा पुरुषोत्तम राम किंवा भीष्म द्रोणाचार्य विदुर आणि पांडव असे धर्माचे रक्षण करते लोक बसलेले असताना स्त्रियांवर रामायण महाभारत काळातही अन्याय झाला आहे असेल तर कवी सांगतातच पण आजच्या काळामध्ये रामायण महाभारत नसले तरी आजही स्त्रियांना डावावर लावावे अशी वस्तू समजले जाते असे ते निक्षून सांगतात. स्त्रियांना फक्त पुरुषापासून त्रास होतो असे नाही तर स्त्री सुद्धा स्त्रीची शत्रू असल्याचे कवी आपल्या कवितेचे सांगताना म्हणतात,

**सासुरवासिनी चाहूल घेऊन सडासंमार्जन करो लागे...**

या कडव्यामध्ये एक स्त्री आपले घर-अंगण सारवते आहे सजवते आहे. असे वर्णन दिसत असले तरी सासुरवाशीण ह्या एकाच शब्दात सासूच्या दडपणाखाली, धाकाखाली काम करणारी स्त्री आपल्या समोर उभी राहते. स्त्रीवरील अन्याय आणि अत्याचार याप्रमाणेच आपल्या समाजातील जातिभेद अजूनही कायम आहेत. त्यालासुद्धा सुधाकर कदम यांनी आपल्या कवितेतून वाचा फोडली आहे.

**किती प्रबोधन केले तरीही जात नसे त्या असती जाती**

या ओळी मधून संत काळापासून तर महात्मा फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक विभूतींनी जात हे संबोधन नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र तरीही या समाजातील जातीभेद संपला नाही. नाठाळाचे माथी लाठी अशी भूमिका घेतली तरी तुकारामाचे कुणी ऐकले नाही. आणि जीवनभर विठ्ठल विठ्ठल करणाऱ्या चोखामेळ्याला जिवंतपणी तर गाभाऱ्यात प्रवेश मिळालाच नाही. आणि मरणोत्तर पायरीवर जागा मिळाली म्हणून धन्यता मानावी लागली. ही सर्व शोकांतिका सुधाकर कदम यांनी आपल्या रचनेत कधी व्यंगात्मक रीतीने तर कधी सरळसोट हल्ला चढवत मांडली आहे. देवाधर्माच्या नावाने जो व्यवहार या जगात चालू आहे त्याच्यावर अनेक ठिकाणे कवींनी शाब्दिक हल्ला चढविला आहे.

**विश्वात्मकतेला चौकटीत कोणी बांधतो अज्ञानी न्यूनगंडे...**

अशा अभंगरचना मधून आज अज्ञानी लोक संपूर्ण विश्व भावनेला चौकटीमध्ये बंदिस्त करत आहे. ही जाणीव कवींना अस्वस्थ करते. जगाच्या कल्याणासाठी समाधानासाठी; अत्त दीप भव; ही भावना मनामध्ये रुजली पाहिजे, वाढली पाहिजे असे कवीला आवर्जून वाटते. तशी ती जाणीव त्यांनी रे मना; या कवितेमध्ये व्यक्त सुद्धा केलेली दिसून येते. एकंदर समृद्ध काव्यानुभूती, विविध प्रतीके प्रतिमांचा वापर, समर्पक आणि चपलख उदाहरणे, सकारात्मक जीवननिष्ठा ह्या सर्वांचा एकत्रित दस्तावेज म्हणजे काळोखाच्या तपोवनातून हा संग्रह आहे असे म्हणावे वाटते. स्वयं प्रकाशन पुणे त्यांनी प्रकाशित केलेल्या ह्या सुंदर संग्रहाचे मुखपृष्ठ यवतमाळ जिल्ह्यातील पुसदचे प्रा. अविनाश वानखेडे यांनी तयार केलेले असून, ते अगदी समर्पक असे आहे. राम पंडित यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना संग्रहाची श्रीमंती वाढवते. कवितेचे बहुतांश प्रकार सुधाकर कदम यांनी या संग्रहात हाताळले आहेत. मात्र मुक्तछंद हा काव्यप्रकार यात दिसून येत नाही. कवी मुळात गायक असल्यामुळे आपल्या कविता लयबद्ध कशा होतील याचा विचार त्यांच्या अंतर्मनात असल्याने तसे घडले असावे असे वाटते. कवी शब्दाचे ऋण मानतात, शब्द आणि कविता त्यांच्यासाठी काय आहे ते त्यांच्याच शब्दात सांगायचे तर,

**आकळेल अर्थ घालता आवर्त एका एका आर्त शब्दाचा
तो... शब्दाचा तो भाव समजून घेता संपेल आर्तता
मनातील...**

शब्दांचा भाव म्हणजेच अर्थ समजून घेतला म्हणजे मनातील सर्व जळमटे आणि दुःख नष्ट होतील अशी अपेक्षा कवी सुधाकर कदम यांनी व्यक्त केली असून ती यथार्थ पणे योग्य आणि रास्त आहे यात शंका नाही. सुधाकर कदम यांच्या काळोखाच्या तपोवनातून ह्या संग्रहासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

# शासकीय आश्रमशाळांची स्थिती चिंताजनक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**गेल्या साडेपाच वर्षात आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूमध्ये वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.राज्याच्या आदिवासी विकास आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार फेब्रुवारी 2017 ते जुन 2022 या पाच वर्षे पाच महिन्यांच्या कालावधीत 680 विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले आहेत ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यात 22 वेगवेगळी कारणे असल्याचे सांगितले आहेत. यात सर्वाधिक मृत्यू आजारामुळे झाल्याचे सांगितले जाते.यावरून असे लक्षात येते की शासकीय आश्रम शाळांमधील आरोग्य सुविधा निकृष्ट दर्जाची असल्याचे स्पष्ट दिसून येते.आश्रम शाळांतील ही गंभीर बाब पहाता राज्य मानवी हक्क आयोगाने या प्रकरणी स्यू मोटो दाखल करून सरकारला जाब विचारला आहे.**

आजारामुळे सर्वाधिक मृत्यू 282 असुन आतड्याचा आजार, मुत्रपिंड, निकामी होणे, श्वसनाचा त्रास, कॅन्सर, फिट येणे,टीबी, ॲनेमिया, सिकलसेल इत्यादी अनेक आजारांनी मृत्यू झाले आहेत. यामध्ये 150 मुली तर 132 मुलांचा समावेश आहे. शासकीय आश्रम शाळांमध्ये एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचे मृत्यू होणे लाजिरवाणी बाब आहेच सोबत संपूर्ण महाराष्ट्राला वेदना देणारी आणि धक्का देणारी सुध्दा आहे.यावरून स्पष्ट होते की आश्रम शाळांमध्ये अत्यावश्यक सुविधांचा व आरोग्य सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव असल्याचे स्पष्ट दिसून येते. ठाणे, नाशिक, नागपूर व अमरावती विभागांतर्गत आश्रम शाळांमधुन झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू नाशिकमधील आश्रमशाळात 278, नागपूरमध्ये 171, ठाणे 150, अमरावती 80 अशा पध्दतीने आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच मृत्यूच्या आकडेवारीत प्रथम क्रमांक नाशिकचा तर नागपूरचा दुसरा क्रमांक लागतो ही अत्यंत गंभीर बाब आहे.यावरून स्पष्ट होते की आश्रम शाळांमधील व्यवस्था अत्यंत ढासळलेली असल्याचे दिसून येते. शासनाच्या अंतर्गत जेव्हा आश्रम शाळा चालविल्या जातात तेव्हा त्याच पद्धतीने आश्रम शाळांमधील व्यवस्था किंवा सुविधा निटनेटक्या पध्दतीने सुसज्जी असायला हवी. फक्त आश्रम शाळा सुरू ठेवुन चालनार नाही. राज्याच्या आदिवासी विकास आयुक्तालयाने शाळांसोबत आरोग्य



सुविधा व इतर संपूर्ण सुविधा मुलांना प्रदान केल्या असत्या तर कदाचित साडेपाच वर्षात झालेली 680 पैकी काही मुला-मुलींचे प्राण वाचविण्यात अवश्य यश प्राप्त झाले असते. परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे 680 मुला-मुलींना आपला जीव गमवावा लागला ही अत्यंत वेदना देणारी बाब आहे.कारण आश्रम शाळा म्हटलं की आश्रम शाळा प्रशासनाची जबाबदारी असते की विद्यार्थ्यांना संपूर्ण सुरक्षा प्रदान करणे.परंतु आश्रम शाळांची योग्य हाताळणी न झाल्याने साडेपाच वर्षातील शासकीय आश्रम शाळांमधील मृत्यूचा आकडा वाढल्याचे दिसून येते. सरकारला विनंती करतो की मुलं ही देवाघरची फुल असतात त्यामुळे संपूर्ण शासकीय आश्रम शाळांना आरोग्य सुविधांसह इतर संपूर्ण सुविधांनी सुसज्जीत करण्याची गरज आहे. यामुळे मृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झाल्याचे आपल्याला अवश्य दिसून येईल.

## वंचिताची आई...!!

विद्यार्थी एक वर्गामधला, गरिबीने होता पिडला
माय बिचारी होती भोळी, बाप व्यसनामध्ये बुडला

सर्व बाजू होत्या उजव्या, पण एकच बाजू डावी
संस्काराचा शिंतोडाही, नव्हता त्याच्या गावी

बस म्हणता बसत नव्हता, वर्गात हुज्जत घाली
लेकरांच्या खोड्या काढी, दावीत उनाड चाली

लाडाने त्यास बाई बोलून, लटकेच म्हणी "सोना"
छडीलाही तो भीत नव्हता, बधत नसे कोना

दरडाऊन त्या अजून मारता, भलताच करी चाळे
विचकाऊनी ते पिवळे दातं, मिचकावी तो डोळे

उपया सारे करुनी थकल्या, वर्गामधल्या बाई
सापडते का युक्ती कुठली, विचार करुनी पाही

शेवटचा उपाय म्हणाल्या, पाहुच एकदा करुनी
घरातले जुनेरे कपडे, आणले पिशवी भरुनी
इजार, कोट, स्वेटर, टोपी, देताचं खुलला गडी
शांत होऊनि इतरांसारखा, बसला सर्वांपुढी

इतके सुंदर कपडे त्याने, कधीच पाहिले नव्हते
ईच्छा असुनी किती गरिबी, लेकरांस नागवते ?


असेच एकदा बाईंनी त्या, खायांस दिला डबा
खुलले त्याचे लुकलूक डोळे, मिटला सवता सुभा

अनेक पहिले उपाय योजूनी, अंकित केले बाळा
गरिबा हृदयी असा फुलवीला, श्रीमंतीचा मळा

धन्य विद्यार्थी, धन्य शाळा, धन्य गुरु, त्या बाई
वंचिताच्या गरजा हेरून, बनते त्यांची आई

–भानुदास धोत्रे
परभणी, 7972625086

# नगर : मकरसंक्रांत आणि पतंग



विश्वास सोहोनी
मो. 9850995652

आधुनिक केसरी

**संक्रांत आली की नगरचे पतंग आठवतात! नगरमधे तयार झालेले खास नगरी पतंग आज बघायला सुद्धा मिळत नाही. त्या साठी हा लेख नगर मकर संक्रान्त आणि पतंग काटला रे काटला! लांब नेऊन काटला! काय भारी मांजा आहे रे तुझा! मग! आता पर्यंत पाच काटले आहेत...! नगर म्हणजे पतंग व पतंग म्हणजे नगरच इतके घट्ट नाते पतंग आणि नगरचे आहे. दिवाळी नंतर हळूहळू आकाशात पतंग दिसायला सुरूवात होत असे.....! नगर म्हणजे वाडे,उंच इमारती,जवळजवळ घरे, लांबलचक गच्च्या,उंच माळवदं मोठया पत्र्याच्या शेड,मोठी मैदान,रस्ते असा नगरचा सगळा पसारा असायचा....**

पतंगचा सिझन आला की या प्रत्येक ठिकाणाहून पतंग उडवले जायचे..अगदी लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत पतंग उडवण्याचा शौक सगळ्यांनाच असायचा.... पावसाळा संपला की वातावरणात एक वेगळा उत्साह असायचा... हवेतील ओल निघून गेलेली असायची. साधारणपणे दिवाळी नंतर नगरमधे पतंग उडवायचे वेध लागायला सुरूवात व्हायची... पतंग उडवायला सुरूवात झाली की हा सिझन साधारणपणे संक्रान्ती पर्यंत चालत असे.... त्या नुसार सर्व जण पतंग उडवायची तयारी सुरू करायचे... नगरचा पतंग म्हणजे एकदम वेगळा असे.

त्यास नगरी टच असे... कारण वेगवेगळ्या आकाराचे पतंग हे नगरमधेच तयार होत असत..... आपण गंजबाजारात गेलं की जामगावकरच्या दुकाना समोर कांतीलाल साकळचंद यांचे टेलरिंग साहित्य मिळायचे आडवे दुकान होते. तिथं सर्व प्रकारचे धागे मिळायचे.... साखळी छाप १० नंबर व घोडा छाप ४० नंबर बारीक धाग्याचा रिळ त्या काळात मांजासाठी खूप प्रसिध्द होता.... काही जण जाड तर काही जण बारिक धागा मांजा साठी वापरायचे... तसेच पुढे गेलं काळूराम मंगळचंद कोठारीकडे मांजा तयार करायची शिरस व काच पावडर मिळायची... तसेच बेल व सिरसमधे टाकण्यासाठी रुमा मस्तकी मिळायची त्यामुळे मांजा मजबूत होत असे....त्या काळात या वनस्पतीचा भाव दहा रुपये तोळा होता. आज अडीशे रुपये तोळा आहे. गंजबाजार म्हणजे पतंग साहीत्यासाठी एकदम फेमस असायचा...

गंजबाजारात आत घुसले की पतंगाचे सर्व काही तिथं मिळत असे.... त्या काळात गंजबाजारात भोसले फुटाणेवाले शेजारीच शेख पतंगवाल्याचे दुकान होते.,..

त्यांच्या दुकानात भिंतीवर आडवी सुतळी बांधून वेगवेगळ्या प्रकारचे पतंग वरुन खाल पर्यंत लावलेले असायचे....... शेख फमिली हे पतंग आपल्या समोरच बनवत असत.

त्यात मोठा रब्धान,छोटा रब्धान,छोटी टुक्कल मोठी टुक्कल,गोंड्यावाला अशा वेगवेगळ्या आकाराचे पतंग रुबाबात उभे असलेले दिसायचे.... यासाठी उभा चौकोन व आडवा चौकोन असे कागद कापून पतंग तयार होत असत. या पतंगाच्या कागदाला ताव म्हटले जायचे... शेख यांची पूर्ण फमिली हे पतंग बनवण्यात कायम बिझी असायची... या पतंगला लावण्यासाठी लागणाऱ्या बांबूच्या काड्या बुरुड गल्लीतून यायच्या किंवा वेळ असेल तर बांबू कापून पाहिजे तशा काड्या तयार केल्या जायच्या...

या काड्या सुद्धा एकसारख्या व एका साईजच्या असत....

चाकूने त्या चांगल्या तासून घेतल्या जात असत.......

नगर मधील काही अवली आमरधाम मधून तिरडीचा बांबू आणून पतंगाच्या काड्या बनवत असत. मांज्या गुंडाळण्यासाठी चकरी पण बाजारात मिळायची.या चक-या परदेशी गल्लीतील अशोक ब्रश कारखान्यात तयार व्हायच्या.... यात लहान मोठी साईज पण असायची.. मधे चाक लावल्यामुळे या चक-या मस्त फुगीर दिसत असत. लहान चक-या दोन चाकाच्या असायच्या. मोठ्या चकऱ्यामधील चाकासह तीन चाकाच्या असायच्या. यावर सुतवलेला मांजा मस्त गुंडाळला जायचा.......

हा मांजा बनवायची पण एक पद्धत होती. गंजबाजारात शिरस मिळत असे. ती जाड पापडा सारखीदिसायची. ती फडक्यात घेऊन वरवंट्याने किंवा दगडाने बारीक करावी लागे.... तसेच बाजारातून हाटेल मालकाची नजर चुकवून सोडा वाटरच्या बाटल्या अणायच्या... त्या बाटल्यांचे तुकडे करुन खलबत्त्यात हे तुकडे बारीक कुटायचे. नंतर ती काचेची पावडर चाळून घ्यायची.

ती पावडर पिठी साखरे सारखी बारीक झाली की मस्त पुडीत बांधून ठेवायची...... मांजा तयार करण्यासाठी दुपारची वेळ आदर्श असायची त्या साठी गांधी मैदान नाही तर किल्ल्या जवळचे मैदान योग्य असायचे. मांजा सुतवण्या आधी एक डबा लागत असे. शिरस शिजवण्यासाठी तीन दगड लावून चूल करायची. त्यावर डबा ठेवायचा. काड्या काटक्या वा रद्दीचे कागद घालून डब्यातील शिरस चांगली शिजवून घेतली जायची.

त्यात आपल्या आवडीचा रंग टाकायचा....

डबा खाली उतरवून डब्याच्या मागे काडीत दो-याचा रीळ धरुन एकजण बसायचा धाग्याचे टोक दाभणातून बाहेर काढून एकजण दाभण व कापडाची चुटकी धरायचा... दाभण शिरशीच्या डब्यात बुडवायचे. हा धागा चुटकीमधून बाहेर ओढून घ्यायचा....

ते टोक कापडाच्या मुठीतून बाहेर काढायचे. त्या मुठीत काचेची पावडर असायची. हा धागा हळूहळू ओढत एक जण लांब जायचा..या टिम मधील काच पावडरची मूठ धरणारा मुलगा अनुभवी असावा लागे.... मांजाला माती लागू नये म्हणून एक जण मधे जाऊन ओला मांज्या वर उचलायचा... थोडं थांबून लांब गेलेला मुलगा मांज्याचे टोक चकरीला बांधून ती हवेत फिरवत असे नंतर हळूहळू चकरीवर ताजा मांजा गुंडाळत यायचा...





त्यांचे असे आठ दहा राऊंड झाले की चकरीवर गुंडाळलेला मांज्या छान दिसायचा... यात गुलाबी लाल किंवा पिवळा कलर वापरेला असायचा. इतके सर्व व्याप केल्यावर पतंगाचा मांज्या तयार व्हायचा..... एकामागून एक असे सर्व मित्रांचे मांजे तयार व्हायचे. मांज्या तयार करणे हा पतंग उडवण्यातील महत्त्वाचा भाग असे... एकदा का मांजा तयार झाला की गंज बाजारातील शेखच्या दुकानात जायचे व आपल्या आवडीचा पंतग निवडायचा.

त्यांची पण एक पद्धत असायची. आवडलेला पतंग हातात घ्यायचा व त्याचे वरचे टोक हातात धरुन तो मागे पुढे हालवून बघायचा... त्याच्या काड्या तपासून बघायच्या व पतंगाचा ताव निट भरलेला आहे की नाही हे पहीले जायचे.. ताव भरणे म्हणजे पतंगाच्या साईडने पतंग फाटू नये म्हणून पातळ दोरा चारी बाजुने तावात चिकटवला जात असे. त्यामुळे हा पतंग एकदम टाईट फिट दिसत असे... एकदा का पतंगाचे सिलेक्शन झाले की, एकदम चार पाच पतंग खरेदी केले जायचे.... असे तयार केलेले पतंग नगरमधे चार पाच ठिकाणीच मिळायचे त्यात कलेक्टर कचेरी मागचा कन्हैया पतंगवाला प्रसिध्द होता.. आशा टाकीज मशिदी समोर तसेच बागडपट्टीत पण पतंग तयार व्हायचे..... परंतु प्रत्येक पतंगवाल्याचे पतंग हे वेगळे असायचे... तेली खुंटावर अब्दुलाचे पतंग पण छान असायचे... मला आठवते या पतंगाला जो पातळ ताव वापरला जायचा तो नवीपेठेतील साईनाथ सातनूर बदर्सच्या कागद दुकानात होलसेल भावात मिळत असे चला! आता पतंगाचे सुत्तर कसे बांधायचे ते पाहू...! पतंग हातात घ्यायचा वरच्या बाजुस क्रास काड्या जिथे आहेत तिथं दोन काड्यामधे खाली वर हळूवार काडीने छिद्रे पाडायची... नंतर पतंगाच्या मधल्या काडीवर एक वीत चार बोटाचे अतंर घेऊन खाली परत दोन छिद्र पाडायची. त्या नंतर डबल धागा वरच्या खालच्या छिद्रात ओवून गाठ मारायची.. हा धागा धरुन पतंग बलन्स करायचा तो जिथे स्थिर होईल तिथे वरती धाग्याला गाठ मारायची की झाले सुत्तर बांधून.... तयार..! संध्याकाळी वाऱ्याची दिशा कुठे आहे हे बघून गच्चीवर जायचे.... सुत्तरला मांजा बांधून एकजण पतंग घेऊन लांब जायचा हवेचा अंदाज घेऊन त्याला उडव म्हटले की तो उडी मारुन तो पतंग हवेत सोडायचा. थोडा मांजा आखडला की पतंग मस्त हवेत तरंगायला लागायचा. .... तो क्षण आमच्या साठी खूप आनंदाचा असायचा..... हवा जर जोरात असेल तर पतंग डावीकडे कलताना मस्त फरSSर असा आवाज यायचा... पतंग फारच कलत असेल तर त्याला खाली उतरवून कन्नी बांधली जायची. जेणे करुन पतंग वर गेल्यावर जास्त कलत नसे....

नगर मधे सोमवार ते रविवार सकाळ संध्याकाळ पतंग उडायचेच, परंतु बुधवार व रविवार हे दिवस पतंगासाठी भरगच्च असायचे... बुधवारी व्यापारी दुकाने बंद असल्यामुळे व्यापारी लोकं पतंग उडवण्याचा आनंद घ्यायचे. तसेच रविवारी साप्ताहिक सुटी असल्या मुळे आकाशात जास्त पतंग दिसत असत.....

आशा टाकीज तात्या टोपे चौक,गांधीमैदान परदेशी गल्ली चर्च रोड,कोठला मैदान,मिशन हायस्कूल कंपौन्ड वाडीया पार्क सोसायटी हायस्कूल ही ठिकाणे पतंग उडवण्यासाठी प्रसिद्ध होती... ज्यांना गच्ची नसायची ती मंडळी मोकळी जागा व मोठे रस्ते बघून पतंग उडवण्यासाठी वापरत असत... जशी संक्रान्त जवळ येत असे. तसा पतंग सिझन एकदम पिकवर असे. संध्याकाळी आकाश वेगवेगळ्या पतंगाच्या रंगाने भरलेले असे.... तांबटकर गल्लीत फिरोजभाई व मित्र आमरधाम मधून तिरडीचे बांबू आणून पतंग तयार करायचे त्या मुळे लहानपणीच भूता खेताची भिती निघून गेली होती.....

फिरोजभाई माणसाच्या आकाराचा पतंग तयार करुन तो आकाशात उडवायचे तो बघण्यासाठी लांबून पतंग शौकीन येत असत......

तसेच परदेशी गल्लीत संध्याकाळी मांजाला छोटे आकाश कंदील लावून पतंग उडवत असत. ह्या आकाश कंदीलची रांग आकाशात खूप छान दिसत असे.... नगरमधे पतंग उडवताना पतंगाची काटाकाटीची मच खेळायला फार मजा यायची....

पतंग व मांजात जोर असेल तर,काटाकाटी लागली की लगेच दुसऱ्याचा पतंग काटला जायचा... नाही तर ही पतंगाची जोडी डुलत डुलत लांबवर जात असे..... तेव्हा मांजाची फार मोठी ढिल द्यावी लागे, तो पतंग लांब नेऊन काटला की खूप आनंद होत असे... काटला रे काटला !

अशी आरोळी आपोआप बाहेर यायची. नगरची पतंग उडवायची स्टाईल म्हणजे एकजण चकरी धरायचा व मेन पतंगाचा मालक रुबाबात पतंग उडवायचा..... तुम्हाला एक गंमत सांगतो, एक स्थिर राहणारा पतंग आम्ही तो रात्री उडवला.तो छान उंच जाऊन स्थिर उभा राहिला. त्याचा मांजा विटेला बांधून ठेवला. रात्री दर एक तासाने तो पतंग आकाशात आहे की नाही ते बघायचो... उशीरा झोप लागली.सकाळी उठून बघितलं तर पतंग कुठेतरी बुडाला होता. फक्त मांजा हातात आला.....

नगराच्या सगळ्याच गल्लीत पतंग उडत असे. परंतु इमारत कंपनी, मिशन कंपौन्ड, परदेशी गल्ली, खिस्त गल्ली, माळीवाडा, आशा टाकीज झेंडीगेट परिसर, सर्जेपुरा, डाळमंडई तपकीर गल्ली या भागात पतंगाचा जास्त जोर असायचा......

पतंग खेळात दोन प्रकार असायचे एक म्हणजे गच्चीवरुन पतंग उडवणे व दुसरा म्हणजे काटलेले पतंग पकडण्यासाठी झुंबड उडत असे एखाद्याने काटलेला पतंग शिताफीने पकडला की तो बाजारातून एखाद्या विजयी वीरासारखा फिरत असे....

पतंग उडवण्याचा नाद म्हणजे तहान भूक विसरून गच्चीवर पतंग उडवले जायचे.. कधी कधी पतंग उडवताना भेळभत्याचा नाष्टा गच्चीवर येत असे... तो पण वर पतंगाकडे बघूनच खाल्ला जायचा.... पट्टीचे पतंग उडवणारे आपल्या बोटाला पट्टी लावून पतंग उडवत असत.... कारण सारखे पतंग उडवून मांजाने त्यांची बोटं कापत असत.... जानेवारीत संक्रान्त यायच्या अगोदर पतंग खरेदी करणे,चकरी मांजाने भरणे,पतंगाचे सुत्तर बांधून ठेवणे ही कामे अडव्हान्समधे करुन ठेवावी लागत. कारण आख्खा दिवस व रात्र होईपर्यंत पतंग शौकीन गच्चीवरच असायचे....

संक्रान्तीच्या दिवशी अगदी नवे कपडे घालून सकाळपासून घरातील सर्व जण गच्चीवर येऊन पतंग उडवत असत...

कधीकधी काय व्हायचे नेमकी संक्रान्तीच्या दिवशी हवा नसायची. त्यामुळे सर्वांचा मूड आफ व्हायचा हाच पतंग उत्सव नंतर दुसऱ्या दिवाशी त्याच उत्साहात साजरा व्हायचा....

आज पन्नास वर्ष झाली आहेत......! हे पतंगाचे दिवस अगदी जसे च्या तसे आठवत आहेत.... पतंग पकडण्यासाठी एका गच्चीवरुन दुसऱ्या गच्चीत मारलेल्या उड्याआठवल्या... !

कटलेले पतंग पकडण्यासाठी मोठ्या इमारतीच्या टोकाला गेलेले आठवले. घरात अडकवून ठेवलेले व पकडलेले मोठ्ठे पतंग आठवले. हे सर्व डोळ्यासमोर आले... त्या काळात मी आमच्या तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवरुन कमरे इतका उंच मोठ्ठा पतंग सुतळीने बांधून उडवला होता. त्याचा हेलीकाफ्टर सारखा आवाज आजही कानात आहे. ते थ्रिल आठवले की आजही हात पतंग उडवण्यासाठी शिवशिवतात. पुढे पुढे येतात..... पतंगामुळे आपले नगर किती मस्त व रंगीत होते.त्यामुळे पतंग उडविण्याचा आनंद पण मिळत असे .... त्या काळात पतंग कापले गेले परंतु प्रत्येकाच्या माना शाबूत असत. मित्रांनो, खरे तर हा पतंग उत्सव महीना दोन महिने चालायचा. परंतु हे दोन महिने वर्षभराची उर्जा देऊन जायचे.... व्यक्तीमत्व विकास म्हणजेच पतंग उडवणे असेही म्हणायला हरकत नाही... कारण यातून आपल्याला आत्मविश्वास,साहस,रिक्स घेणे, जबाबदारीची जाणिव,टाईम मनेजमेंट,डेअरिंग करणे टिम स्पिरिट इत्यादी गुण आपल्यात अपसूकच निर्माण झाले होते.....

काय ? आठवण आहे का! नगरच्या पतंगाची!

ज्यांनी नगरमधे पतंग उडवले आहेत

ते खरेच भाग्यवानआहेत... इसलिए

मेरे नगरका पतंग उत्सव, हैं महान!इसे कोई भूल नहीं सकता!

गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी सर्वांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

**माहिती सहकार्य**
**फिरोजभाई तांबटकर, शेषाद्री**

# पूजनीय सरसंघचालकांचा मोलाचा सल्ला !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०


आधुनिक केसरी

**सध्या पूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत याचे एक वक्तव्य प्रसारमाध्यमे आणि सामाजिक माध्यमात गाजते आहे . नेहमी प्रमाणे प्रत्येक विषयावर आपण बोललेच पाहिजे असा स्वतःबद्दल ग्रह करून चर्चेत राहणारा विदूषकी पत्रकार , राजकीय नेता , आंतरराष्ट्रीय प्रवक्ता यावर बोलला आहे . स्वतःच्या पक्षाची आणि संघटनेचे तात्विक आणि राजकीय अधःपतन होऊन पण याचे समाधान होत नाही . असो .**

पूजनीय मोहनजी काय म्हणाले ? त्याचे मागचे, पुढचे संदर्भ काय ? यांच्या खोलात जाण्याची, शहानिशा करून घेण्याची आवश्यकता या मंडळींना नसते. केवळ उथळ प्रतिक्रिया देणे आणि अपप्रचाराची राळ उठवणे यात ही सगळी मंडळी वाकबगार आहेत.

वास्तविक स्वातंत्र्य आंदोलननच्या काळात आणि खंडित स्वातंत्र्य मिळाल्यावर सुद्धा समाज चिंतक आणि राजकारणी यांनी हिंदू / मुस्लिम किंवा हिंदू / ख्रिश्चन या विषयावर परखड आणि स्पष्ट भूमिका घेणे अपेक्षित होते ती घेतली नाही . एखाद्याने आपल्याला झालेला आजार किंवा रोग लपवावा तसे हे सगळे वागले परिणामी आजार किंवा रोग फोफावला. या देशातील मुळ समाज हिंदू समाज आहे , काळाच्या ओघात उपासना पद्धत्ती बदलल्या पण पूर्वज , परंपरा , सण , उत्सव श्रद्धा , ग्रंथ , ऐतिहासिक पुरुष हे कसे बदलणार ? हिंदुत्व आणि हिंदू राष्ट्र या व्यापक कल्पनेत येथील मुस्लिम , ख्रिश्चन यांनी निघून जावे किंवा पुन्हा हिंदू व्हावे असे अपेक्षित नाही पण दुसऱ्या बाजूने जेते किंवा श्रेष्ठ या कल्पनेतून हिंदू समाजाला जर सारखे अपमानित केले जाणार असेल आणि त्याला मतांच्या राजकारणासाठी कुणी खत पाणी घालणार असेल तर आता हिंदू समाज जागृत झाला आहे ! हेच माननीय मोहनजी याना मुस्लिम समाजाला सांगायचे होते .

खरे तर यातील सकारात्मकता लक्षात घेण्याची गरज आहे . ज्यांचे मुळ हिंदू धर्मात आहे असेच आज बहुतांश मुस्लिम समाजात लोक आहेत . त्यांना योग्य प्रकारची वागणूक तेथे मिळत नाही हे पण सत्य आहे . याची जाणीव आता त्यांना पण होत आहे. पण मदरसे त्यातून अरबी भाषेतील शिकवण , आपलीच उपासना पद्धत्ती कशी श्रेष्ठ याचा अहंगंड आणि त्यातून जिहादी प्रेरणा देण्याची प्रक्रिया निरंतर सुरू आहे आणि याला पूर्ण विराम देण्याची गरज निर्माण झाली आहे .



हे आज नाही केले तर उद्या ते करावे लागेल ! देशाच्या भल्यासाठी मुस्लिम समाजाने हे अटळ सत्य स्वीकारावे , हीच पूजनीय मोहनजी यांची त्या वक्तव्य करण्यामागे भूमिका असणार आहे .

राष्ट्रीय प्रवक्त्याला लगेच त्यात हिंदू / मुस्लिम , फुटीरता वगैरे चा वास आला . आता त्या पक्षाने आणि उरल्या सुरल्या थोड्याच नेत्यांनी पक्षाचा झेंड्याचा रंग बदलून टाकला पाहिजे असे वाटते त्यांना आता बारामतीच्या वैचारिक रसदेशिवाय काही शिल्लक राहिलेले नाही . हिंदुत्वाच्या विचाराने भारलेल्या , प्रसंगी जीव गमावलेल्या अनेक सैनिकांच्या त्यागाचा अपमान करण्याची प्रक्रिया हे महाशय राबवत आहेत . राजकारणातील चिखलात शेणकिड्या सारखे वळवळणारे तुम्ही , खरे तर पूजनीय मोहनजी यांच्यावर प्रतिक्रिया देण्याची तुमची लायकीच नाही .लोक ऐकून घेतात म्हणून बेताल बोलणे यांनी थांबवण्याची गरज आहे .

भारत तोडो यात्रेचा शिल्पकार तर दक्षिणेत पोप चे आशीर्वाद घेतो आणि उत्तरेत हर हर महादेव घोषणा संघ का देत नाही ? असले बालीश प्रश्न विचारतो . संघावर खोटे आरोप ,टीका करून भिवंडी च्या कोर्टात खेट्या मारून अजून हौस फिटली नाही म्हणून नवीन नवीन ठिकाणी संघावर आरोप करण्याचे काम हा गृहस्थ करतो आहे .

संघाचे सरसंघचालक लोकानुरंजन करण्यासाठी बोलत नसतात किंवा राजकारणी लोकांसारखे त्यांच्या डोळ्यासमोर मतांच्या गठ्याचे राजकारण पण नसते . राष्ट्रहित सर्वतोपरी समोर ठेवून समाजाचे उद्बोधन करण्याची ९७ वर्षांची परंपरा समजून घेण्याची गरज आहे . ज्याला जग हिंदू म्हणून संबोधते त्या सगळ्या जगाच्या कल्याणाचा वसा घेतलेली ती संस्कृती , त्या परंपरेचा हा देश आहे आणि त्याचे संवर्धन , उत्थान करण्यासाठी संघ कटिबद्ध आहे . या ईश्वरीय कार्याला अपशकुन करण्यापेक्षा पूजनीय मोहनजी यांचे बोलणे नीट समजून घेऊन , तसे जर का व्यवहारात वागण्याचे ठरवले तर येणारी सर्व जागतिक आव्हाने पेलण्यास भारत समर्थ तर होईलच पण आपले नियत जागतिक लक्ष पण पूर्ण करेल !

# अमेरिकेच्या 'बंदुकी'ची गोष्ट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अमेरिकेतील शाळेत एका सहा वर्षांच्या शाळकरी मुलाने आपल्याच शाळेतील शिक्षिकेवर गोळीबार केल्याने या देशाच्या बंदूक धोरणावर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. अमेरिकेत नागरिकांपेक्षा बंदुका जास्त असल्याचे बोलले जाते. अशा स्थितीत जगातील या बलाढ्य देशाच्या कायद्यात काय कमी आहे की बंदुकीचा वापर करणे हा मुलांचा खेळ बनत चालला आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे. अमेरिकेचे बंधुक धोरण खूपच ढिलाई असल्याचे म्हटले जाते अमेरिकेचे तोफा धोरण खूपच ढिलाई असल्याचे म्हटले जाते.अमेरिकेतील व्हर्जिनिया येथील एका शाळेत एका सहा वर्षांच्या मुलाने शिकिकेवर गोळी झाडली आहे.**

अमेरिकेच्या व्हर्जिनिया राज्यातील न्यूपोर्ट न्यूज भागात एका शिक्षिकेवर गोळी झाडल्याबाबत पोलिसांनी सहा वर्षांच्या मुलाला ताब्यात घेतले आहे. यामागील कारणंही अत्यंत धक्कादायक आहे. शाळेत झालेल्या गोळीबाराने अमेरिकेचे वादग्रस्त तोफा धोरण पुन्हा एकदा चर्चेत आणले आहे. वेगवेगळ्या संशोधन आणि अहवालांवरून असे दिसून आले आहे की, अमेरिकेतील बंदूक धोरणाच्या हलगर्जीपणामुळे इतर देशांच्या तुलनेत सामूहिक ठिकाणी गोळीबाराच्या घटना अधिक आहेत. वोक्स या इंग्रजी वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या विस्तृत अहवालात असे म्हटले आहे की, अमेरिकेत (२००७) १०० पैकी ८८.८. लोक त्यांच्याजवळ बंदूक ठेवतात. अशा प्रकारे, बंदुका बाळगणाऱ्यांची संख्या अमेरिकेत सर्वाधिक आहे. दुसऱ्या क्रमांकावर येमेन येतो जिथे ही संख्या प्रति १०० लोकांमागे ५४.८ आहे.

अमेरिकेच्या राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला स्वसंरक्षणासाठी बंदूक ठेवण्याचा अधिकार दिला आहे. तर विरोध करणाऱ्यांचा असा विश्वास आहे की बंदुकांची संख्या आणि बंदुकीचा हिंसाचार यांचा थेट संबंध आहे. म्हणजेच समाजात जितक्या बंदुका असतील तितका हिंसाचार वाढेल. २०१२मध्ये, यूएसमध्ये बंदुकीने इतरांना लक्ष्य करण्याचा दर १ दशलक्ष लोकांमागे २९.७. होता, जो इतर देशांच्या तुलनेत खूप जास्त आहे.

२०१५ मध्ये वॉशिंग्टन पोस्टमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात असे म्हटले आहे की अमेरिकेत लोकसंख्येपेक्षा अधिक बंदुका आहेत. २०१३ मध्ये अमेरिकेची लोकसंख्या ३१७ दशलक्ष असताना सामान्य नागरिकांकडे असलेल्या बंदुकांची संख्या त्याहून अधिक म्हणजे ३५७ दशलक्ष होती, असे या अहवालात म्हटले आहे. एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या बंदुकांवरून याचा अंदाज बांधता येतो की अमेरिकेत नागरिकांसाठी बंदुका घेणे फारसे अवघड काम नाही.

अमेरिकेतही बंदूक खरेदी करण्यासाठी काही नियम पाळावे लागतात. उदाहरणार्थ, १८ वर्षांखालील व्यक्ती रायफल किंवा शॉटगन बाळगू शकत नाही. मानसिक आजारी किंवा कोणत्याही गुन्ह्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त शिक्षा झालेली व्यक्ती बंदूक विकत घेऊ शकत नाही. एवढेच नाही तर नागरिकांच्या वापरासाठी स्वयंचलित शस्त्रे तयार करणेही बेकायदेशीर आहे. बंदुकीबाबत केंद्र आणि विविध राज्यांनी आपापले नियम आणि नियम बनवले आहेत. असे असूनही, सध्याच्या कायद्यात मोठ्या पळवाटा आहेत, त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला खिशात बंदूक ठेवणे फारसे अवघड काम नाही.

येथे सर्वात मोठी कमतरता बॅकग्राउंड चेकमध्ये सांगितली आहे. अमेरिकेच्या फेडरल सिस्टम (मध्यभागी) अंतर्गत, परवानाधारक डीलरने बंदूक विकण्यापूर्वी खरेदीदाराची पार्श्वभूमी तपासणी करणे आवश्यक आहे. हा तपास एफ बी आय द्वारे केला जाऊ शकतो की त्या व्यक्तीचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड आहे की नाही, किंवा कोणतीही मानसिक आरोग्य समस्या किंवा इतर कोणतीही बाब आहे. ही पार्श्वभूमी तपासणी पास करू न शकणाऱ्या व्यक्तीला कायदेशीररित्या बंदूक खरेदी करण्याचा अधिकार मिळत नाही. परंतु हे पार्श्वभूमी तपासणे जितके कठीण वाटते तितकेच खाजगी विक्रीने ते सोपे केले आहे.

येथे खाजगी विक्रीचा अर्थ असा आहे की तुम्ही दुकानात न जाता थेट तुमच्या मित्राकडून किंवा कुटुंबातील सदस्याकडून बंदूक खरेदी करता. पार्श्वभूमी तपासल्याशिवाय, कारण तुम्ही परवानाधारक डीलरकडे गेल्यावर तपासाचे काम केले जाईल. खाजगी विक्रेत्याकडून बंदूक विकत घेतल्यास, तुम्ही पार्श्वभूमी तपासण्यासारखे 'पंच' टाळू शकता आणि हा मार्ग अनेकदा घेतला जातो. परंतु खाजगी विक्रेत्याकडून खरेदी करणे हे या खराब व्यवस्थेचे कारण नाही. खरेदीदाराची पार्श्वभूमी तपासण्याचे कामही मोठी अडचण आहे. या कामासाठी त्यांच्याकडे संसाधनांची मोठी कमतरता असल्याचे अमेरिकन तपास संस्था एफबीआयने मान्य केले आहे. अशा परिस्थितीत, जेव्हा एफबीआय मर्यादित वेळेत तपास पूर्ण करू शकत नाही, तेव्हा जास्तीत जास्त तीन दिवसांचा अतिरिक्त वेळ मिळाल्यानंतर, खरेदीदाराला बंदूक खरेदी करण्यास हिरवा सिग्नल मिळतो. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या तीन दिवसांत खरेदीदाराचे रेकॉर्ड तपासले जाणे आवश्यक नाही. तोफा नियंत्रण, तोफा धोरण, एनआरए एनआरएला बंदूक नियंत्रण धोरणाचा सर्वात मोठा खलनायक म्हटले जाते २०१५ च्या कॅरोलिना चर्च हल्ल्याला दोषी ठरविणाऱ्या डिलन रूफकडे यापूर्वीही नको असलेले पदार्थ बेकायदेशीरपणे ठेवले होते. परंतु एफबीआयला छतावरील गुन्हेगारी माहिती वेळेत गोळा करता आली नाही, ज्यामुळे त्याला हँडगन खरेदी करण्याची परवानगी मिळाली. नंतर, या बंदुकीने, रूफने कॅरोलिनामध्ये 9 लोकांचा बळी घेतला.

याशिवाय तोफा धोरणाबाबत केंद्र आणि अमेरिकेतील राज्यांमध्ये बरेच मतभेद आहेत. केंद्र पार्श्वभूमी तपासण्यांना महत्त्व देत असताना, अनेक राज्ये पार्श्वभूमी तपासण्यांना नागरिकांच्या बंदुका खरेदी करण्याच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन मानतात आणि त्यांना त्यांच्या राज्यात अनिवार्य मानत नाहीत. अशा परिस्थितीत, गुन्हेगारी किंवा इतर कोणत्याही अडथळ्यामुळे तुम्ही अमेरिकेतील एका राज्यातून बंदूक खरेदी करू शकत नसाल, तर तुम्ही हे काम दुसऱ्या राज्यात जाऊन करू शकता, जेथे त्यासंबंधीचे नियम कमी आहेत.

या संपूर्ण घटनेत नॅशनल रायफल असोसिएशन मुख्य



खलनायकाच्या रूपात दिसत आहे. अमेरिकेत बंदुकीच्या अधिकारांचे नेतृत्व करणाऱ्या या संघटनेवर जोरदार राजकीय दबाव आणल्याचा आरोप आहे. वेगवेगळ्या प्रसंगी असा आरोप करण्यात आला आहे की, अमेरिकेतील राज्यांना या संघटनेकडून मोठ्या प्रमाणात निधी पाठवला जातो जेणेकरून ते बंदुकांच्या मालकीबाबत कठोर धोरणे बनवू शकत नाहीत. असे म्हटले जाते की १९९८ ते २०१७पर्यंत एनआरएने निवडणुकीत उमेदवारांसाठी २०३ दशलक्ष डॉलर्स खर्च केले आहेत, म्हणजे १३१४६३८१५०० रुपये! संशोधनात असे दिसून आले आहे की बंदुकीचे कडक कायदे असलेल्या यूएस राज्यांमध्ये बंदुकीशी संबंधित मृत्यूचे प्रमाण कमी आहे. इतर देशांची आणि शहरांचीही हीच स्थिती आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या शस्त्रासंबंधीचे कायदे भक्कम असले तरी त्यातून होणारा हिंसाचारही कमी दिसतो. अमेरिकेच्या तुलनेत इतर देशांमध्ये बंधुक धोरण अधिक कडक आहे. जपान, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया या देशांबरोबरच भारतातील बंदुका ठेवण्याच्या अधिकाराबाबतची धोरणे जगातील सर्वात कठोर मानली जातात. भारतात बंदुकीचा परवाना मिळवणे सोपे काम नाही. तसेच अमेरिकेप्रमाणे तो नागरिकाचा घटनात्मक अधिकारही नाही. भारतात बंदूक असणे ही मूलभूत गरजेपेक्षा अभिमानाची बाब आहे. अलीकडेच सरकारने यासंबंधीचा कायदा अधिक कडक केला असून एअर गन आणि पेंटबॉल गन यांनाही शस्त्रांच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे.

एन सी आर बी डेटा दर्शवितो की २०१० ते २०१५ दरम्यान, भारतात बंदुकीमुळे होणारे मृत्यू ३०००ते ३६०० पर्यंत होते. अमेरिकेत हा आकडा १० पट जास्त आहे. त्याचबरोबर भारतात परवाना बंदुकीमुळे होणारे मृत्यू कमी असले तरी बेकायदेशीर शस्त्रांमुळे होणाऱ्या हत्यांचे प्रमाण जास्त आहे, ही चिंतेची बाब आहे. २०१४ आणि २०१५ मध्ये एक लाखाहून अधिक बेकायदेशीर शस्त्रे जप्त करण्यात आली होती, त्यापैकी ६०टक्के उत्तर प्रदेशातील आहेत. भारताच्या लोकसंख्येच्या १६% असलेले राज्य, सक्रिय बंदूक परवान्यांपैकी ३८% आहे आणि ते बंदुकांचे केंद्र म्हणूनही ओळखले जाते.

तथापि, भारतातही नॅशनल असोसिएशन फॉर गन राइट्स इंडिया सारख्या संघटना आहेत, ज्या बंदूक बाळगण्याच्या अधिकाराचा पुरस्कार करत आहेत. या संघटनेचा असा विश्वास आहे की सरकारने बंदुका खरेदी करणे इतके अवघड केले आहे की लोक रागाच्या भरात बेकायदेशीर बंदुका विकत घेतात. या वादाला अजून फारशी नावे नाहीत ही वेगळी बाब आहे. असो, इंडियास्पेंड समूहाने केलेल्या विश्लेषणातून असे दिसून आले आहे की भारतीयाच्या तुलनेत अमेरिकन व्यक्तीला परवानाधारक बंदुकीने मारले जाण्याचा धोका १२ पट जास्त आहे. सध्या भारत अमेरिकेच्या मार्गावर जाण्याच्या मनस्थितीत दिसत नाही.

---

तुकाराममनीती
भाग 41

# देव तिळीं आला । गोडें गोड जीव धाला ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मनःपटलावर उठणारे अनंत तरंग माणसाला नित्य कार्य करायला प्रवृत्त करतात. सातत्याने असे कार्य होत राहणे हेच खऱ्या अर्थाने मानवाच्या जिवंतपणाचे लक्षण! मानवातील सृजनशिल-गुणग्राहकता त्याच्या कृती-उक्तीवरून सातत्याने दृगोचर होत असते. काळ आणि वेळ कितीही खडतर असले तरी तुकाराम महाराजांनी अभंग का लिहिले असावेत? त्यांचे भजन-कीर्तन का थांबले नसावे? हल्ली वाचन संस्कृतीकडे कानाडोळा होत असतांना अनंत हात लिहित आहेत त्या पैकीच मी हे "तुकाराम नीती" सदर का लिहितोय? या सर्वच प्रश्नांची उत्तर म्हणजे 'माणसातील नित्य व्यक्त होण्याची तळमळ आणि अस्वस्थ वर्तमान!' अनेक नीतीकार तत्ववेत्यांनी तमाम मानव उत्थानासाठी आपल्या नीतीचे त्या त्या काळात उल्लेख करून माणसाला सावध करण्याची आणि वर्तमान आनंदी जगण्याची कालजयी तत्वे विषद केली. त्याप्रमाणेच तूकोबांनी अत्यंत खडतर जीवनसंघर्ष जगत-झेलत जगाला महान उपदेश करण्याचे कार्य आपल्या अभंगाद्वारे केले आहे. सरळ, साध्या, कुठेही बडेजाव न करता, सुटसुटीत प्राकृत भाषेत आपले कालातीत अनुभव लोकांना कथन करून सावध करण्याचे जगद्गुरू तूकोबांचे हे महत्कार्य सर्वमान्य झाले आहे!**

तूकोबांनी मराठी संस्कृती जनमानसाच्या मनावर प्रतिबिंबित करण्यासाठी त्या त्या कालानुरूप अभंग निर्मिती केली आणि त्यातून सर्वकाळ उपदेश केला.

**देव तिळीं आला । गोडें गोड जीव धाला ॥१॥**
**साधला हा पर्वकाळ । गेला अंतरीचा मळ ॥२॥ पापपुण्य गेलें । एका स्नानेंचि खुंटले ॥३॥**
**तुका म्हणे वाणी । शुद्ध जनार्दन जनीं ॥४॥**
**(शा.अ.गाथा अ.क्र.४०७९)**

मुद्दाम निवडला. जगद्गुरू तुकोबांच्या अभंगातून पूर्णतः महाराष्ट्रीयन संस्कृतीचे आणि त्यातील विविध सणसमारंभाचे सातत्याने दर्शन होत असते. त्यापैकी हा एक अभंग बरेच काही संदर्भ आणि महत्वपूर्ण तत्वे प्रतिपादित करून जातो. भारत वर्षातील मकर संक्रांत हे महत्वपूर्ण पर्व असून जानेवारी महिन्याच्या १४ किंवा १५ तारखेला सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतांनाचा हा ऋतूसंक्रमणाचा काळ! हा दिवस मकर संक्रांती नावाने भारतभर साजरा केला जातो. महाराष्ट्रांत आजच्या दिवशी सवाष्ण स्त्रिया एकमेकींना आपल्या शेतातील पिकांचे वान देऊन आपल्या पतीला दीर्घायुष्य मागतात. त्याचबरोबर आजच्या दिवशी एकमेकांना तीळ-गुळ देऊन "तीळ-गुळ घ्या, गोड गोड बोला" असे संबोधून मनातील वितुष्ट काढून टाकतात. याशिवाय आजच्या दिवसापासून सूर्य हळूहळू उत्तरेकडे सरकायला आणि वातावरणातील थंडी तीळातीळाने कमी व्हायला लागते. आजच्या दिवशी एकमेकांना तीळ-गुळ देऊन तीळातील स्निग्धता आणि गुळातील सौम्य गोडव्याने एकमेकांचे संबंध दृढ करण्याचा सुंदर दिवस! आजच्या दिवशी तिळाचे उटणे लावून अभ्यंगस्नान करण्याने देखील त्वचेतील शुष्कता कमी होऊन त्वचेवर तजेला येतो. यासाठी दिपावलीनंतर आजचा दिवस अभ्यंग स्नानासाठीसुद्धा महत्वपूर्ण आहे!

हे सगळेच संदर्भ आणि इथल्या मातीत रुजले-भिजलेले तुकोबाराय त्याच अनुषंगाने प्रस्तुत अभंग लिहितात. तिळाचे अनेक संदर्भ आणि त्या संबंधाने कथा आहेत. 'एक तीळ सात जणांनी विभागून खाल्ला' अशी आपल्याकडे म्हण आहे. त्याचबरोबर देव तिळी आला म्हणजेच तिळात देवाचे वास्तव्य आहे. तीच स्निग्धता, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, दयार्द भाव इथल्या मनामनात रुजण्यासाठी तीळ संक्रांत संपन्न होते. माणसाच्या सहवासात, बोलण्यात, वागण्यात आणि प्रत्येक व्यवहारात ईश्वराचे दर्शन होणे अपेक्षित आहे. सर्वच संतांनी सकळ प्राणीमात्रांमध्ये आणि वृक्षवेलींमध्ये ईश्वरानुभूती घेतली आहे. याच अनुषंगाने संत कबीरजी **ज्यों तिल माहि तेल है, ज्यों चकमक में आग। तेरा साईं तुझ ही में है, जाग सके तो जाग।** या दोह्यातून आपला भाव प्रकट करतात. संत तुकोबांच्या तीळातील देव सुद्धा हाच आहे. इथे माणसामाणसात देव जागृत करण्याचे कार्य ज्ञानोबा-तुकोबा आदि संतांनी केले आहे. तीळातील ईश्वराच्या अस्तित्वाने आणि गुळातील गोडव्याने संपूर्ण जीवच देव झाला. माणसातील दुर्दम्य इच्छाशक्ती आणि त्याला प्रेम-जिव्हाळा-आपुलकी याच्या अलौकिक संगमाने सर्वत्र गोडवा प्रसारित होणे म्हणजेच देव तिळी येणे होय! मकरसंक्रातीच्या पुण्य-पर्वकाळावर हा आनंद संगम मानवाने नित्य अनुभवणे अत्यावश्यक आहे. ज्याप्रमाणे तिळाच्या उटण्याने अंगावरील मळ जातो त्याच न्यायाने तिळगुळाने माणसाच्या मनातील राग-द्वेष-ईर्षा-असूया-अहंकार-लोभ-मत्सर आदि षड्विकार जाणे आजच्या दिवशी जगाला अपेक्षित आहे. माणसाच्या मनातील वरील विकार गेले की माणूस अंतर्बाह्य शुद्ध होईल. तसे झाले की आपोआप पापपुण्याचा क्षय होऊन सर्वत्र स्नेहार्द संबंध प्रस्थापित होतील. माणसामाणसात भेद राहणार नाहीत. सर्वत्र स्नेह वृद्धिंगत होऊन विश्वबंधुत्वाची भावना जागृत होईल. अशी अनुभती जनमानसात रुजणे आणि तमाम माणसांत प्रेम-आपुलकी-जिव्हाळा या भावना वृद्धिंगत होणे म्हणजे देव तिळी येणे! या सर्वच



घडामोडींचा परिपाक तुकोबाराय "तुका म्हणे वाणी । शुद्ध जनार्दन जनीं" या शेवटच्या चरणातून देतात. एकदा का माणूस अंतर्बाह्य निर्मळ झाला की आपोआप तो शांत होतो. तो प्रेमळ होतो. तो आनंदी होतो. तो निरागस होतो. तो प्रसन्न होतो. हे सर्वच गुण असलेल्या माणसाची वाणी शुद्ध-निर्मळ-प्रेमळ झाल्याशिवाय रहात नाही. असा शुद्ध-सात्विक झालेल्या माणसालाच जनी-जनार्दनात ईश्वर दिसायला लागतो, म्हणजेच देव तिळी येणे होय!

अशा प्रकारे तूकोबाराय सामान्य कृषक आणि इथल्या शेतीमातीतील विविध सणसमारंभाचे संदर्भ देऊन आपले लोकोद्धाराचे महत्कार्य सातत्याने करत राहिले. तुकोबानंतर भरपूर लेखन आणि काव्य प्रकाशित झाले परंतु तुकोबांचे अभंग वाङ्मय कालजयी ठरले. अनेक संकटांची आव्हाने झेलून तुकोबांचा गाथा लोकमनावर कायमचा तरला! त्याला बुडवायचा अनेकांनी प्रयत्न केला, आणि सुदैवाने बुडविणारांनासुद्धा तारून नेण्याचे महान काम तुकोबांच्या अभंगानीच केले हे या अभंगांचे विशेष वैशिष्ट्ये! तुकोबांचे अभंग सार्वकालिक संदर्भ घेऊन जन्माला आले आहेत! तुकोबांच्या प्रत्येक अभंगाला जनामनाचा हृद्य स्पर्श झाल्यामुळे ते अभंग इथल्या माणसाच्या हृदयातून बाहेर पडतच नाहीत. तुकोबांचे अभंग हे आजसुद्धा तेवढेच समकालीन आणि वर्तमानात पथदर्शी ठरतात. या अभंगांची आजसुद्धा तेव्हढीच आवश्यकता असल्याचे लक्षात येते. आज देव तिळी येण्याची नितांत गरज आहे. आज संयुक्त कुटुंब पद्धती कालवश झाली आहे. एका घराची अनेक घरे झाली आहेत. एक काळ असा होता, घरात माणसे जास्त असल्यामुळे गर्दीत माणसं झोपायची. जेवायला बसायला, झोपायला घरात जागा अपुरी पडायची. आज चित्र एकदम उलटे झाले आहे! मोठमोठाल्या घरांमध्ये झोपायला कुणी नाही. घरात दोघेच पती-पत्नी आणि ते ही आठआठ दिवस एकमेकांना बोलत नाहीत! सगळेजण मोबाईल नावाच्या निर्जीव डब्याशी चाळवाचाळवी करत आपला टाईमपास करत आहेत! कुणी कुणाशी बोलायला तयार नाही. संवाद संपूर्णतः मृतप्राय अवस्थेत गेला आहे. याचा परिणाम म्हणून अनेक पुरुष जीवघेण्या व्यसनाचे बळी ठरत असून आता तर स्त्रियाही व्यसन करायला, दारू प्यायला लागल्याचे कानावर येत आहे! हे फार भयंकर आहे! आज खरंच देवाला तीळातीळात येण्याची नितांत गरज आहे! मकर संक्रातीच्या या पर्वावर माणसाच्या दुरावलेल्या नातेसंबंधावरून संक्रांत जाऊन सर्वत्र नातेसंबंध दृढ होणे अत्यंत गरजेचे आहे. कोण श्रेष्ठ? कोण कनिष्ठ? कोण मोठा अन कोण लहान? कोण ज्ञानी अन कोण अज्ञानी? हे सर्वच प्रश्न बाजूला ठेवून माणसामाणसात संवाद वृद्धिंगत होणे अत्यंत गरजेचे आहे! घराघरात काही काळ मोबाईल-टीव्ही बंद होऊन घरातील सर्वानीच मस्त गप्पा मारण्याची वेळ आली आहे! घरातील सार्वांनीच आपल्या घरात एकत्र बसून सामुहिक भोजन घ्यायची वेळ येऊन ठेपली आहे! असे झाल्यास माणसाचे अनेक रोग आपोआप गायब होतील. एकाकीपणा, डिप्रेशन, चिडचिडेपणा, विमनस्कता, चेहऱ्यावर सतत ताणतणावाचे भाव जर कायमचे घालवायचे असतील तर सर्वांनाच खऱ्या अर्थाने यावर विचार करून आपापल्या कोसल्यातून बाहेर यावे लागेल. बाहेर येऊन एकमेकांना दिलखुलासपणे बोलावे लागेल. असे नाही झाले तर माणसाकडे सर्व सुख-सोयी असतील, सुविधा असतील मात्र त्याचा उपभोग घ्यायला कुनीच नसेल! असे होणे हे अत्यंत धोकादायक आहे! हे प्रमाण सातत्याने वाढत गेल्यास माणसांना आणखी दुर्धर आजार विळखा घालतील! माणसं वेडी होतील! आपल्या घरात एकटीच राहून मरून जातील! त्यांना कुणी पाहणार सुद्धा नाही. असे होणे ही आपली संस्कृती नाही!

तेंव्हा चला सज्जन सृजनांनो, मनाभावातून एकमेकांना तिळगुळ देऊन प्रेम-आपुलकी-जिव्हाळा-स्नेहार्द भावाचे वान एकमेकांना देऊन सगळेजण मिळून आनंदी होऊयात! एकटा माणूस आनंदी होण्यापेक्षा आपण सगळेजण मिळून आनंदी होऊन महत्प्रयासाने मिळालेल्या मानव जन्माचे आणि देहाचे सार्थक करूयात! असे होणे हेच तुकोबांना अपेक्षित होते आणि त्याच अनुषंगाने तुकाराम नीती समाजमनात सातत्याने काम करत राहिली पाहिजे! यातच आपल्या सर्वांच्या निरोगी जीवन-आनंद-यशस्वी आयुष्याचे गमक लपले आहे! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# राहूल गांधींची 'हिंदु धर्मावर'च आगपाखड का ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**काँग्रेसचे नेते आपल्या 'भारत जोडो' पदयात्रेत भाजपा व राष्ट्रीय स्वंय सेवक संघावर टीका करत आहेत.हिंदु मताचे विभाजन झाले तरच भाजपा पराभव होऊ शकतो.त्यात काँग्रेसला हिंदु अधिक मुस्लिम व दलित मते मिळाली तर २०२४ मध्ये केंद्रातील सत्ता मिळविता येऊ शकते,असे राजकीय गणित आहे.त्यासाठी राहुल गांधी सतत हिंदु लक्ष्य करत आहेत.दुसरीकडे काँग्रेस पक्ष मुस्लिम मतदार नाराज होणार नाही, याची काळजी घेत आहे.काँग्रेस पक्षाला यश मिळवायचे असेल तर अल्पसख्यांक मताबरोबर हिंदु मताची जोड द्यावी लागेल,असा पक्षातील ज्येष्ठ नेते सल्ला आहे.पण गांधी परिवार तो सल्ला मानावयास तयार नाही.**

भविष्यात काँग्रेसचे गांधी परिवार जे सांगेल, म्हणतील तेच धोरण असणार आहे.

हिंदु संस्कृती २८ हजार वर्षापूर्वीची आहे.तो सहिष्णु आहे.वसुधैव कुटुबंकम मानणारा,यात माणुसकीची अंतिम पायरी आहे.भारत ही मातेसमान आहे.तसेच आई,वडील,गुरूला वंदनीय आहेत.वेद व गाती हे आदर्श ग्रंथ आहेत.जगात हिंदु धर्मानेचा हिंसाचा इतिहास नाही,इतर धर्मावर आदर करतो,इतर धर्मावर अतिक्रमण केलेले नाही.खर तर! काँग्रेसला हिंदु धर्म समजलेला नाही. स्वातंत्र्यापासून काँग्रेसची भूमिका हिंदु विरोधी राहलेली आहे.त्यात देशात हिंदु धर्माला मानणारा भाजपा सारखा राजकीय पक्ष व आर.एस. एस. अशी संघटना नसावी,असे आधुनिक गांधी परिवाराला वाटते.म.गांधी यांच्या हत्यानंतर १९४८ मध्ये ब्राह्मण हत्याकांड घडले.हे म. गांधी विचारांच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी घडवून आणले होते.१९६९ मध्ये देशात गोहत्या बंदीची मागणीसाठी संताना गोळ्या घातल्या गेल्या.तर १९८४ मध्ये शीखांचे हत्याकांड घडले,यात काँग्रेसचे नेते होते.आयोध्यात हिंदु कारसेवकांवर गोळ्या झा घालण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर देशात हिंदु धर्मातील रूढी व परंपराच्या विरोधात कायदे केले गेले.तेंव्हा हिंदू धर्मपंडीतांचा विश्वासात घेतले गेले नाही.तेंव्हा भारतीय घटनेचा आधार दिला जात गेला.पण मात्र शाहबानो पोटगी प्रकरणात काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयाने विरोधात निकालाच्या विरोधात जाऊन मौलवीच्या दवाबाखाली कायदा केला.त्याचप्रमाणे प्रार्थनास्थळ विशेष तरतूद कायदा १९९१ हा आणला गेला. यात १५ ऑगस्ट १९४५ मध्ये प्रार्थनास्थळाची जी स्थिती होती त्यात बदल करता येणार नाही.म्हणजेच भारतात मोगलापासून मंदिरावर अतिक्रमण करून मस्जिदी बांधल्या त्याला संरक्षण देण्याचे काम या कायद्याने केले गेले. देशात अल्पसंख्याक कायदा १९९२ कायद्यानुसार राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग नेमला गेला. अल्पसंख्याक म्हणजे मुस्लिम नाही.त्यात पारशी, शीख,बौध्द,जैन,ख्रिश्चन समाजही येतो.या समाजाच्या उन्नतीसाठी केंद्र व राज्य शासन कोट्यवधी रुपये खर्च करते.पण भारतात आठ राज्यात हिंदु अल्पसंख्याक झाला आहे. यात मणीपूर ३१.३९,पंजाब ३८.४० अरूणाचलप्रदेश-२९ जम्मू -काश्मिर-२८.४४, मेघालय-११.५३,तर नागालँड-८.७५, लक्षव्दीप- २.५ मिझोराम-२.७५ टक्के हिंदु लोकसख्या आहे.याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली गेली आहे.त्यानंतर वक्फ बोर्ड कायदा १९९५ चा संपत्तीचा अधिकार कायदा केला गेला. लष्करानंतर वफ्क बोर्डाकडे सर्वाधिक संपत्ती आहे. वक्फ बोर्डाने जमीनीवर दावा केल्यास त्या विरूध्द न्यायालयात जाता येत नाही.जर घटनेने सर्वांना समान अधिकार दिले असताना काँग्रेस सरकारने विशिष्ठ समाजाचे लाड पुरविण्यासाठी हे कायदे का केले? ते केवळ मतासाठी ना! मग देशात बहुसंख्य हिंदु समाज असताना त्यांचे विरोधात कायदे का लादले जात आहेत? हाच काँग्रेसला प्रश्न विचारला जातोय? हिंदु व मुस्लिम भेदभाव हा काँग्रेस पक्षच करत आलेला आहे.त्यात २०१४ पासून भाजपा सत्तेत आला,तेंव्हा देशात व्देष पसविण्याचे काम केले जात आहे,यात राहुल गांधी आघाडीचे नेते आहेत.देशात काँग्रेस व गांधी परिवाराइतकी हिंदु धर्माची अवहेलना व अवमान कोणी केला नसावा. तरीही हिंदुंचे तोड बंद करून बुक्यांचा मार चालू आहे.देशात परकियांना अतिक्रमण केले.आता धर्मनिरपेक्षच्या नावाखाली स्वकीय हिंदुना टार्गेट करत आहे.नुकतेच सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुस्लिमांविषयी बोलताना म्हणाले त्यांनी भीती बाळगण्याची गरज नाही.आपण वेगळे अहोत,इतरासोबत आपण राहू शकत नाही,हिच भावना चुकीची आहे, असे म्हंटले.यावरून देशात बंधूभावाने राहिले पाहिजे,हिच संघाची भूमिका आहे. दुसरीकडे काँग्रेसने ज्येष्ठ नेते सलमान खूर्शीद यांनी तर राहूल गांधी हे रामाची उपमा देतात स्वतः च्या धर्माची अल्लाची उपमा देण्याची हिंमत नाही. त्याप्रमाणे भागवत गीतेतील उपदेशाला 'जहादी' शब्द वापला गेला.आता तर राहुल गांधी म्हणे तपस्वी व्यक्ती. ह.भ.प. राहुलमहाराज रोज हिंदु धर्मावर प्रवचन देत आहे.त्यांच्यासारखा धार्मिक नेता पृथ्वीवर अवतरला नसावा. भाजपा हा तपस्वीला मानत नाहीत, ते पुजाऱ्याला मानतात,अशी मुक्ताफळे त्यांनी उधळले आहेत. भगवा व हिंदु धर्माला अतिरेकी म्हंटले गेले.त्यात हिंदु आणि हिंदुत्व,श्रीराम व जय सीयाराम,आता कौरव- पांडव तुलना करत आहेत.गांधींनी कौरव २१ व्या शतकात चड्डी घालतात हातात काठी घेतात म्हणाले.तर मग काँग्रेस पक्षाला भगव्या,काळ्या टोपीचा विटाळ का असावा? या नेत्याना गोल टोपीचेच आकर्षण का आहे? गांधी स्वतःला पांडव समजत आहेत, खर तर ! काँग्रेस पक्षातच शंभर कौरवच नेते आहेत.पण धर्मनिरपेक्ष काँग्रेस पक्षातील नेते कट्टर इस्लाम धर्माबद्दल चकार शब्द काढणार नाहीत.पक्ष नेते ही हिंमत करणार नाहीत.काही मुस्लिम नेत्यांना भारतात शरियत प्रमाणे कायदे पाहिजेत,हे गांधीना मान्य आहे काय? मोदी धोरणाचा सतत विरोध करून काँग्रेसने काय मिळविले! नोटबंदी, राफेल, आधार कार्ड, जी.एस. टी. आणि तीन तलाक,सर्व मोदी सरकारचे निर्णय वैध ठरले आहेत.केवळ तीन कृषी कायदा मागे घेण्यात आला.या कायदा विरोधी आंदोलनात हिंसक व राष्ट्रविरोधी शक्तींचा शिरकाव झाल्याने सरकारने देशहिताच्यादृष्टीने निर्णय मागे घेतला गेला.भारत जोडो, पद यात्रेला देशात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा दावा काँग्रेस व काही दावणीला बांधलेले पत्रकार, लेखक करत आहेत.या भारत जोडे यात्रेचा मतात किती रूपांतर होते,हे २०२३ होणाऱ्या राज्याच्या विधानसभा व २०२४ च्या देशाच्या सार्वत्रिक निवडणुकीत कळेलच.राहूल गांधी 'देश जोडो' यात्रा देशहितासाठी मुळीच नाही,पक्षाच्या भल्यासाठी आहे,हे स्पष्ट झाले आहे.कारण २०२४ मध्ये काँग्रेस पक्षाचे पंतप्रधान 'राहुल गांधी' यांचाच चेहरा असणार आहे. काँग्रेस या राष्ट्रीय पक्षाची अवस्था प्रादेशिक पक्षापेक्षा वाईट आहे.केवळ तीन राज्य सोडले तर काँग्रेसची ताकद राहिलेली नाही. गांधीचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न स.पा.चे नेते अखिलेश यादव व आप चे नेते केजरीवाल,तृणमल काँग्रेसच्याच्या नेत्या ममता बॅनर्जी कधीच पूर्ण होऊ देणार नाहीत.महाराष्ट्रात केवळ राष्ट्रवादी पक्षाची सहकार्य मिळू शकते.पण शिवसेना ऐनवेळी धोका देवू शकतो,हे लक्षात ठेवावे!काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय अधिवेशनात प्रादेशिक पक्षांचे सहकार्य न घेता पक्ष स्वतंत्रपणे निवडणूका लढविण्याचा प्रस्ताव पारीत केला होता. आता मात्र राष्ट्रीय काँग्रेसला सत्तेसाठी प्रादेशिक पक्षाकडे मनधरणी,याचना करण्याची वेळ आलेली आहे.

देशात राष्ट्रीय तपास यंत्रणेने (NIA) देशभरात धाडी टाकल्या.यात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया( पी.एफ. आय.) या संघटनेच्या नेत्यांना व सक्रीय कार्यकर्त्यांना अटक केली होती.त्यानंतर राष्ट्रविरोधी कृत्यात पी. एफ. आय. इतर सबंधित आठ संघटने सहभाग असल्याचे कारण देत केंद्र शासनाने पाच वर्षेसाठी बंदी घातली.संघटनेवरील



या बंदीचे अनेक इमाम व इतर मुस्लिम मौलांना,नेत्यांनी स्वागत केले आहे.तर दुसरीकडे एम. आय.एम.इतर संघटना व कट्टरवादी मुस्लिम नेते मोदी विरोधी राजकीय पक्षांनी बंदीचा विरोध केला.आश्चर्य म्हणजे !काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस,राजद, या भाजपा विरोधी असलेले पक्ष हे पी.एफ.आय च्या समर्थन केले.इतकेच नव्हे,तर काँग्रेस व राजद' पक्षाने राष्ट्रीय स्वंयसेवक संघावर (आर. एस. एस )बंदी घालण्याची मागणी केलीहोती.या पक्षांना राष्ट्रहितापेक्षा व्हॉटबँक महत्वाची वाटते.या पी.एफ आय.या राष्ट्रविरोधी संघटनेची आर. एस. एस.ची या हिदु संघटनेची तुलना केली जाते.या नेत्यांच्या बुध्दीची कीव येते. पी. एफ.आय व संघाच्या धार्मिक विचारात मतभिन्नता आहे.संघ ही हिंदुत्वादी संघटना आहे,पण ती राष्ट्रविरोधी शक्तीला व कृत्याला कधीच थारा देणारा नाही.देशाचे विभाजन हे धार्मिक आधारावर झाले.यातून मुस्लिमांसाठी स्वतंत्र पाक राष्ट्र जन्माला आले पण हिंदूसाठी हिंदूस्थान मान्य करण्यात आला नाही.देशाच्या विभाजनापासून काँग्रेस पक्षाकडून हिंदूना लक्ष्य करण्याची मानसिकता तयार झाली,ती आजही कायम आहे. मताच्या स्वार्थासाठी, कट्टर मुस्लिम संघटनाना पाठबळ देणे,यालाच धर्मनिरपेक्षता म्हणावयाचे काय?भारतात मुस्लिम राजांनी अनेक वर्षे हिंदू धर्मावर आक्रमण, अत्याचार, धर्मांतर, तसेच हिंदू संस्कृंती नष्ट करण्याचा प्रयत्न केला.याचा काँग्रेसला स्मृतीभ्रंश झाला काय?भारताला २०४७ पर्यत इस्लामिक राष्ट्र करण्याचे मनसुबे आता पी.एफ. आय.सारख्या संघटना कट रचला जात आहे. इतकेच नव्हे,संघटना आंतर राष्ट्रीय दहशतवादी संघटना आय. एस. आय एस. मध्ये भारतील मुस्लिम तरूणांना भरती होण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत.पी.एफ आय.संघटनेच्या विचाराचे,कृत्याचे समर्थन होऊ शकत नाही.काँग्रेस सरकारने दहशतवादी कारवायावरून २००१ 'सीमी' वर बंदी घालेली होती. दहशदवादी संघटनेला आळा घालण्यासाठी १९८५ मध्ये 'ताडा व २००२ मध्ये पोटा कायदा आणला होता. मात्र २००४ मध्ये संयुक्त पुरोगाधी आघाडी सरकारमधील घटक पक्षाच्या दवाबा- खाली हे कायदे रद्द केले.तेंव्हा हे कायदे मुस्लिम विरोधी नव्हते काय?त्यावेळी विरोधी पक्षांनी राष्ट्रविरोधी कृतीचे समर्थन केले नव्हते.काँग्रेस राजवटीत देशात दहशदवादी संघटनेच्या कारवाया वाढत गेल्या. देशात विविध भागात बॉम्बस्फोट झाले.यात हजारोंचा बळी गेला आहे. पी.एफ.आय. ही संघटना हे सीमीचे दुसरे रूप आहे.ती बहुरूपी संघटना आहे.या संघटनेची 'हिस्ट्री' तपासून पहा! २२ नोव्हेंबर २००६ मध्ये तीन मुस्लिम संघटनातून ही संघटना जन्माला आली आहे.संघटनेचा मूळ उद्देश इस्लाम धर्माचे रक्षण करणे हा आहे.भारतात धार्मिक स्वातंत्र्य आहे. धार्मिक संघटना असे गैर नाही.पण दुसऱ्या धर्माचा तिरस्कार,आणि अतिक्रमण करणे,ही भारतीय संस्कृती नाही.पी.एफ.आय या संघटनेने धार्मिक कट्टरतेच्या मानसिकतेतून देशात विविध भागात दंगली, हत्या, अपहरण सारख्या घटना घडविल्या. कर्नाटकमध्ये हिजाब प्रकरणावरून, हिंसक आंदोलन करण्याचे कारस्थान केले.तसेच दिल्ली कर्नाटक, राजस्थान,पश्चिम बंगाल आदी राज्यातील धार्मिक दंगलीमागे याच संघटनेचा हात होता. इतकेच नव्हे या संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा नेते व आर. एस. एस.च्या मोठ्या नेत्यांची हत्या करण्याचा कट रचलेला होता,हे उघड झाले. काँग्रेसचे अश्या संघटनेचे समर्थन करत आहे हे राष्ट्रहिताचे मुळीच नाही.केंद्रातील सत्ताधारी व विरोधी पक्षात विरोध असला तर तो सकारात्मक व सत्ताधारी पक्षावर अंकूश ठेवणारा असावा पण राष्ट्र विरोधी शक्तीला पाठिंबा देणे हे कितपत योग्य आहे?काँग्रेससारख्या जबाबदार राष्ट्रीय पक्षाला झाले तरी काय?राष्ट्रीय स्वंयसेवक संघ मुस्लिम,राष्ट्रविरोधी विरोधी नाही,याचे उदाहरण म्हणजे,याच सप्टेंबर महिन्यात संघाचे सरसंघचालक भागवत यांनी दिल्लीतील एका मस्जिद, मदश्याला भेट दिली.अखिल भारतीय इमान संघटनेचे प्रमुख उमर अहमद इलियासी यांचेशी घेतली होती. यावरून संघ हा वैचारिक चर्चा व संवादाला महत्व देतो.संघ हा उद्देश हिंदुत्वादी, समाजसेवी,व राष्ट्रवादी संघटना आहे.ती मुस्लिम विरोधी मुळीच नाही,पण काँग्रेस एक गठ्ठा मते मिळविण्यासाठी संघ मुस्लिम विरोधी असल्याचा अप्रचार करत आलेला आहे.मुस्लिमांना आर,एस.एस. व भाजपाची भीती दाखयाचे व राजकारण करावयाचे.हे आता मुस्लिम समाजाला कळू लागलेले आहे.काँग्रेस पक्षाने भारतीय मुस्लिमांना कधीच राष्ट्रीय प्रवाहात आणलेले नाही.या मुस्लिम समाजाला शिक्षण, आरोग्य,व गरिबीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न झाले नाहीत.या समाजाला सतत धार्मिक भावनेत गुंतवून ठेवले.काँग्रेस नेते संघावर नित्य कितीही टीका करत असले तरी, तो कधी बिथरला नाही.त्यांच्यात सहनशिलता आहे. म. गांधीची हत्येनंतर १९४८ मध्ये संघावर बंदी घातली गेली होती. नंतर गांधीच्या हत्येत संघाचा हात नसल्याचे स्पष्ट झाले.नंतर संघावरची बंदी मागे घेण्यात आली.नंतर १९७५ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी आणीबाणीत व.१९९२ मध्ये बाबरी ढाच्चा पाडल्यानंतर संघावर बंदी घातली गेली.पण आजपर्यंत संघावर राष्ट्रविरोधी डाग लागलेला नाही. संघाने कधी हिंसेचे समर्थन केलेले नाही.देशात हिंदू महासभा संघटनेचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा प्रयत्न झाला.आता आर. एस. एस. सारख्या हिंदुत्ववादी,राष्ट्रवदी संघटनेला संपुष्टात आणण्याचे प्रयत्न होत आहेत. काँग्रेस व इतर राजकीय पक्षाला व नेत्यांना इस्लामिक संघटनेचे विचार मान्य आहेत का? पण हिंदूत्वाचे विचार मात्र मान्य नाहीत. एकीकडे मुस्लिम लिग एम. एम. एम. व पी. एफ. आय. पश्चिम बंगाल, आसाम मधील मुस्लिम संघटनेचे समर्थन करावयाचे तर दुसरीकडे भाजपाच्या आर.एस.एस,नावाने हिंदु धर्माला वेठीस धरले जात आहे.

केरळमध्ये पी.एफ आय च्या बंदीनंतर संघटनेला न्यायालयाने फटकारले होते.यातून राष्ट्रविरोधी संघटनेचे बिंग फुटले.केंद्रातील भाजपा व मोदी सरकार राष्ट्रविरोधी संघटनेला लगाम घालत आहे.तेंव्हा काँग्रेस व इतर पक्षाच्या पोटात गोळा उठतो. आज दलित,आदिवासी,मुस्लिम समुदाय काँग्रेसची'व्होट बँक' राहिलेली नाही.तीच पक्षाला चिंता सतावत आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षच हिंदु विरोधात व्देष पसरवित आहे,काँग्रेस पक्षाची सत्तेसाठी दुटप्पीनीती हिच राष्ट्रासाठी घातक आहे.

# वृतबद्ध कविता ते गझल : तंत्र आणि मंत्र



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**प्रसिध्द कवी-गझलकार आणि माझे मित्र - श्री.विजय जोशी (विजो) हे डोंबिवली निवासी आहेत. कविमनाच्या या व्यक्तीने त्यांच्या साहित्य-विषयक उपक्रमांमुळे अवघ्या मराठी साहित्य-विश्वात स्वतःची एक ओळख निर्माण केली आहे . माझ्यासारख्या त्यांच्या असंख्य चाहते -मित्रांसाठी ही मोठ्या आनंदाची -कौतुकाची गोष्ट आहे. कारण ही ओळख "स्व-केंद्रित कवीची नाहीये "तर , काव्य आणि गझल लेखनात धडपड करणार्या कवींना सतत मार्गदर्शन करणार्या कवी-मित्राची आहे."विजो यांचा २०२२ चा कविता संग्रह अंत:स्थ वाचतांना मला जाणवले होते ..हा कवी ..आपल्या सोबतच्या लेखन -सोबत्यांना खूप काही देऊ शकणाराआहे म्हणूनच कवी रसिकांनी विजय जोशी ( विजो ) यांना काव्यगुरु ही उपाधी प्रेमपूर्वक बहाल केली आहे.**

विजय जोशी यांच्या साहित्यिक कार्याची , आणि काव्य -गझल -लेखन कार्यशाळा "या उपक्रमांची घेतलेलीही दखल आहे.. एक-दोन वर्षांपूर्वी त्यांनी स्वतहापुढाकार घेत - इंटरनेटवर ..वृतबद्ध कविता , गझल लेखनाची ऑनलाईन कार्यशाळा घेतली..कवी-गझालकारांचामोठाचगोतावळा जमवला , या कार्यशाळेत काही दिवस मी पण हजेरी लावली होती . या उपक्रमाला अफाट प्रतिसाद मिळाला , याचे एक कारण आहे -माझ्या मते - कवी - विजय जोशी - विजो " यांनी " सुचना वगेरे करण्याच्या फंदात न पडता किंवा "मी स्वतहा यंव आहे -त्यंव आहे "असा अविर्भाव न आणता , नवीन -जुन्या अशा सर्वच कवींच्या मनातील "गझल आणि वृतबद्ध कविता लेखन "याबद्दलचा भयगंड दूर करण्याचा जो प्रयत्न केलाय "त्याला तोड नाही. ता त्यांच्या याच कार्याला "जोड "मिळाली आहे ती .. नुकत्याच प्रकाशित झालेल्या त्यांच्या " वृतबद्ध कविता ते गझल " यापुस्तकाची. १८ डिसेंबर -२०२२ रोजी या पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे. आपण असे ही म्हणू या की - कवी -विजो यांनी२०२२ या वर्षा अखेरीस ..नव -वर्ष -२०२३ साठी एक मोलाची अक्षर -भेट " लिहिणाऱ्यांनादिली आहे. १०४ पानांच्या या छोट्याश्या पुस्तकातील मजकूर मात्र शब्दशः लाखमोलाचा आहे ", एकूण ३१ छोट्या छोट्या प्रकरणातून कवी-विजय जोशी .यांनी . " कविता आणि गझल-लेखनाबद्दल अगदी साध्या -सोप्या भाषेतले शब्दातले विवेचन " ..अजिबात क्लिष्ट नाही , बोजड तर बिलकुल नाही. हे लेखन वाचून " .अनेक कवी ..गझलकार होण्याची मानसिक तयारी करू लागतील , तर कैक कवींनाहे पुस्तक "वृतबद्ध कविता लिहिण्यासाठी मदत करेल कविवर्य -अशोक बागवे सर म्हणतात - " नेटका व नीटस आढावा , आत्मीय शिकवण , वृत बद्धतेची किमया , गझलेचे रमल, आशयाला धक्का न लागता सहज होणारी मात्रांची दिंडी यांचा चिन्मयी परिपाठ या ग्रंथात अंतःस्थ जाणवला आहे ". मला वाटते ..यात अधिक भर घालून काही सांगण्याची गरजच नाही. वृत्बध्द कविता आणि गझल - लेखन संदर्भात ..मनातल्या शंकेचे निराकरण करणारे कवी-विजय जोशी लिखित हे पुस्तकउचित मार्गदर्शन करणारे आहे ". या पुस्तकाच्या सातशे (७०० ) प्रती लिहित्या हातांनी घेतल्या सुद्धा आहेत ", प्रचीती येण्यासहे प्रतिसाद उदाहरण पुरेसे बोलके आहे. वृतबद्धकविता ते गझल (तंत्र आणि मंत्र " ) आपल्या संग्रही असले पाहिजे " असा आग्रह एक वाचक म्हणून मी करतोयत्याचे कारण स्वतः कवी विजो" हे वृतबद्ध कविता , लयीत कविता , तंत्र आणि मंत्र सांभाळणारी गझल " अशा लेखनाचे आग्रही -पुरस्कर्ते आहेत " तेव्हा त्याच्या आग्रहाचा मान आपल्याला राखावाचलागेल. या पुस्तकाचे मुखपृष्ठ करणारे कलावंत - संदेश सावंत यांचा उल्लेख जरूर करतो.

प्रकाशक -अथर्व प्रकाशन -डोंबिवली यांचे या पुस्तकासाठी आभार.

कवी-मित्र -विजय जोशी -यापुढे ही तुमच्या हातून अशीच साहित्य -सेवा ,अविरत घडो, या शुभेच्छा देतो.

**पुस्तक -परिचय लेख-**
**अरुण वि.देशपांडे -पुणे.**
**संपर्क - 9850177342**

# राष्ट्रपतीपदक विजेत्या तमाशासम्राज्ञीस समर्पित तीन कविता

आधुनिक केसरी

तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर म्हणजे लखलखीत बिजली होत्या.



अस्सल घरंदाज लावणीच्या अदा करून दिवाणे करणारं ते व्यक्तीमत्व होते. पोटासाठी नाचते मी, परवा कुणाची..' ही प्रसिद्ध लावणी अभिनयासह त्या करायच्या तेव्हा तमाम स्त्री कलावंताच्या वेदना त्यातून व्यक्त व्हायच्या. महाराष्ट्रात त्या खूप गाजल्या.. सा-या जनसामान्यांच्या मनात फडातली राणी म्हणून त्या कायम रुजल्या. मायमराठी च्या लोककलेत विठाबाईंचे स्थान अजोड राहिले.या लोकप्रिय तमाशा समाज्ञीच्या निधनास बावीस वर्ष पूर्ण झाली. आज ( 15 जानेवारी ) विठाबाईंचा स्मृतिदिन त्यानिमित्ताने या लोकप्रिय तमाशासम्राज्ञीस समर्पित तीन कविता वाचकांसाठी....

**विठाबाई....**
बेभान होऊन तुम्ही नाचलेली ती घुंगरे
आजही मातीचा सुगंध जपून आहेत,
तुम्ही पेललेली अनेक दुःखे घुंगरांच्या सर्वांगात
भिनलेली आहेत... ती तुमची नऊवारी, डोईवरचा
पदर, केसातला सुगंधी गजरा, चकाकणारी नथ,
कमरपट्टा आणि कपाळावरचे मोठे गोलाकार कुंकू
बघितले की तुम्ही पटकन डोळ्यासमोर तरळून
जातात... परंतु, संस्कृतीच्या नावाखाली तमाशाला
सतत बदनाम करणाऱ्यांना वाजवून सांगावेसे वाटते
की, **विठाबाई**नी सोसलेले दुःख, **विठाबाई**तली
स्त्री- आई आणि **विठाबाई**च्या जीवनाचा सार समजून
घेतला की..
**विठाबाई** आणि त्यांचा तमाशा याची दैदीप्यमान
आख्यायिका आजही संपत नाही...

**विठाबाई....**
गरोदरपणाचे मोठे पोट घेऊन भर
रंगमंचावर तुम्ही
दर्दी रसिकांसाठी जाड चाळ पायात
बांधून बेधुंद होऊन नाचलात....
नाचताना तुम्ही किती दमला
असाल?
हे तुडुंब भरलेल्या तंबूने पाहिले...
अशातच, त्या प्रसूती कळा
विसरून, तुम्ही बाळांत होऊन
लगेच स्टेजवर येतात तेव्हा..
हे सारं विचारांच्या पलीकडचे होऊन
जाते आणि असंख्य
वेदनांच्या इंगळया मनास डसून
जातात...

**विठाबाई...**
तुमचा जन्म विठोबाच्या पंढरीत,
वारीच्या आणि अंभंगाच्या जयघोषात झाला
आणि
तुम्ही इतिहास झालात..!
परंतु तुम्ही 15 जानेवारी 2002 रोजी हे
विश्व सोडून गेलात तेव्हा, तमाशाचे सारे तंबू
बुडापासून हळहळले...
तमाशाचे सारे फड अमाप रडले
आणि कलावंतांचा आधारवड गेला...
म्हणूनच तुम्हाला मानाचा मुजरा करताना हाथ
थरथरात...
आणि ' पोटासाठी नाचते मी, परवा कुणाची...'
ही तुमची प्रसिद्ध लावणी आमच्या मनामनात
विचार पेरून जाते...



बाळासाहेब जोगदंड
औरंगाबाद.
संपर्क 9423051246

# राहुल गांधींना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ओळखता येईना, गरळ ओकल्याशिवाय ते का राहिना ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**राहुल गांधी भारताचे सुपुत्र आहेत का? तर माझ्या मते निश्चित नाहीत. कारण ते इटालीचे राजकुमार त्रिवादी सत्य आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यातला बालिशपणा कशामुळे त्यांना राजकिय परिपक्वतेकडे घेवुन जाईना हे कळत नाही. काही दिवसापासुन भारत जोडो यात्रा त्यांची भ्रमंती देशभरात सुरू असून यात्रेचा फोकस त्यांना मिळत असलेली प्रसिद्धी यावरून काँग्रेस पुनर्जिवीत होणार का? त्याचंही उत्तर नाही असंच असु शकतं. त्यांच्या पुर्वजासह अनेकजण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं प्रसंगी कौतुक करतात. अगदी राष्ट्रवादीचे नेते शरदचंद्र पवार यांनी देखील या सामाजिक संघटनेचं अनेकदा कौतुक केलं. एवढेच नव्हे तर माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जीसारखे संघ कार्याला भेट देण्यासाठी येवुन गेले. पण या राहुल गांधींना मात्र संघ ओळखता आला नाही. म्हणून अगदी बालिशपणातून संघाचे कार्यकर्ते म्हणजे हाती काठी घेणारे कौरव असं म्हणत ही मंडळी शंकराचं नाव घेत नाही तर श्रीरामाचं नाव घेताना सीतेचं नाव का घेत नाहीत? याची चिंता जाहिरपणे त्यांनी बोलुन दाखविली. खरं तर राहुल गांधींच्या तोंडून हलाहल विष प्राशन करणाऱ्या शंकराचं नाव त्याहुन अधिक प्रभु रामचंद्राचं नाव येणं हाच खरा भाजपा तथा संघ विचारसरणीचा विजय म्हणावा लागेल. एका सामाजिक संघटनेला अध्यात्मिक ज्ञानाशी जोडणं हा त्यांच्यातला बालिशपणा होय. 2014 साली देशाच्या राजकारणात परिवर्तन घडवताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेस मुक्तीची घोषणा केली आणि खरी करून दाखविली.**

तब्बल साठ वर्षे देश चालवणाऱ्या पक्षाची अवस्था मायक्रो सुक्ष्म मशिनरीद्वारे पाहिलं तरी सापडणार नाही अशी सद्या आहे. एक दोन राज्य सोडली तर कुठेच काँग्रेस दिसेना. ज्या पक्षाला संसदेत विरोधी पक्ष पदाएवढं देखील मताधिक्य मिळालं नाही. एवढेच नव्हे तर अध्यक्ष पदाची निवडणुक घ्यावी लागली. हा सुवर्णकाळ राहुल गांधींच्या नेतृत्वाचाच म्हणावा लागेल. त्यांच्या विचारप्रणालीचं आणि कार्यकर्तृत्वाचं वर्णन करायचं म्हटलं तर एका राष्ट्रीय पक्षाचं नेतृत्व करणारा हा माणुस अंगातला बालिशपणा जाता जाईना. संसदेत पंतप्रधानांची गळाभेट असेल किंवा नको ते आरोप त्यांच्या तोंडून अनेकदा केले जातात. भारत जोडो यात्रा त्यांची भ्रमंती सुरू आहे. खरं तर वर्षानुवर्षे सत्ता भोगलेल्या काँग्रेसला ज्या नरेंद्र मोदींनं जमिनीवर चालायला लावलं हे तसं उशिरा सुचलेलं शहाणपण देखील आहे. कारण ही मंडळी जमिनीवर कधीच चालु शकली नाही. म्हणून देशातील सर्वसामान्य जनतेचं कल्याण साद्य झालं नाही. भारत जोडो यात्रा नाव तसं चांगलं पण ज्यांच्या पुर्वजांनी भारत तोडो असं करून ठेवलं. त्याला जोडण्याचं काम नव्या पिढीतील काँग्रेस करताना दिसते. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे वक्तव्य अनेक वादातीत ठरले. महाराष्ट्रात त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विरोधात गरळ ओकताना काय तर म्हणे त्यांनी इंग्रजांची माफी मागितली. कुठलाही अभ्यास नाही. चरित्र वाचन नाही. कुणी तरी चिठ्ठीवर लिहुन दिलं की काँग्रेस नेते बोलतात. अज्ञानाचं ज्ञान त्यांना ऐनवेळी चिठ्ठीद्वारे सभेत मात्र सुचतं. तसंच काही राहुल गांधी यांच्या बाबतीत घडत असावं. चार दिवसापुर्वी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टिका करताना संघ शाखेवर जाणारे कौरव असा उल्लेख केला. त्याहुन अधिक ही मंडळी शंकराचं नाव घेत नाही. प्रभु रामचंद्राचं नाव घेताना सीतामाईचं का नाव घेत नाही? असाही हल्ला चढवला.

या त्यांच्या आरोपाचं राजकियदृष्ट्या विश्लेषण करायचं झालं तर निश्चित गोष्ट खरी म्हणावी. या बिचाऱ्या इटालीच्या राजकुमारला भारतातील सामाजिक संघटन आणि अध्यात्मिक संघटन हा फरक अद्याप कळाला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे खऱ्या अर्थाने सामाजिक संघटन त्याहुन अधिक हिंदु संघटन असं म्हणावे लागेल. अध्यात्मिक



स्तरावर संघाचं काम नाही. भारत संस्कृती, परंपरा टिकवुन ठेवताना हिंदु धर्मासाठी गत शंभर वर्षे याच काँग्रेसच्या अन्यायाला सडेतोड उत्तर देत, संघर्ष करत आज या विचारसरणीचा सुवर्णकाळ देशात नांदतो आहे. भारतीय अस्मिता, स्वाभिमान जतन करण्यासाठी मग काश्मिरमधील 370 कलम हाटवण्यासाठी वास्तविक पहाता राहुल गांधींच्या पुर्वजांनी जो पराक्रम करून ठेवला त्यासाठी वर्षानुवर्षे संघ विचाराच्या राष्ट्रभक्ताने लढा आणि बलिदान दिले. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी 370 कलमाचं बलिदान पण काँग्रेसी व्यवस्थेने वर्षानुवर्षे लोकशाहीच्या आदर्श देशात शामाप्रसाद मुखर्जी असतील किंवा पंडित दीनदयाळ असतील यांचं बलिदान आणि योगदान लोकांच्या समोर येवु दिलं नाही. प्रभु रामचंद्र यांचा जन्म आयोध्येतच झाला त्यावरही उभारलेला लढा अस्मितेचं प्रतिक हिंदु संघटनेचा भाग तेही स्वप्न आजच्या सुवर्णकाळात पुर्ण झालं. संघ सामाजिक संघटन, राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रभक्ती, मानवतेचं कल्याण, सेवाभाव, समर्पण आणि शेवटच्या माणसासाठी पुढे येणं हे सद्गुण संघ समर्पणातले आहेत. भारतीय रूढी परंपरा, संस्कृती टिकवुन ठेवण्यासाठी तथा हिंदु संघटन वाढवण्यासाठी, हिंदु राष्ट्र निर्मितीसाठी संघ कार्याचा इतिहास, बलिदान देणाऱ्याचा इतिहास राहुल गांधींनी खऱ्या अर्थाने वाचायला हवा. पाश्चिमात्य संस्कृती त्यांच्या पुर्वजापासून देशात आलेली आहे. उदा.त्यांच्या आजोबाचे कपडे देखील परदेशात धुण्यासाठी जायचे. असो. राहुल गांधींच्या तोंडी ज्यांनी अध्यात्माचं अनुकरण कधीच केलं नाही, ज्या काँग्रेसनं पुरोगामी धर्मनिरपेक्षता नावाखाली हिंदु देवादिकांची नेहमीच टेहाळणी केली. अशांच्या तोंडी आता शंकराचं नाव येणं, प्रभु रामचंद्राचं नाव येणं हाच खऱ्या अर्थाने भाजपा तथा संघ विचारसरणीचा विजय निश्चित म्हणावा लागेल. सीयावर रामचंद्र की जय, पवनसुत हनुमान की जय ही घोषणा आयोध्येकडे एक-एक वीट घेवुन जाताना संघ वीरांची पण त्याचा अर्थ या लेकराला कळणार कसा? सीयावर रामचंद्र की जय याचा अर्थ जरी राहुल गांधीनी भारत जोडो यात्रेच्या भ्रमंतीमध्ये शोधायचा प्रयत्न केला तर मग अगोदर सीया अर्थात सीतामाई नंतर प्रभु रामचंद्र की जय पण उसणं अवसान आणुन आता कुठं ही मंडळी हिंदु देवाधिकांची नावे घेत मंदिराच्या पायऱ्या चढु लागली. बाकी काही असलं तरी भारत जोडो यात्रेत राहुल गांधींनी संघावर गरळ ओकण्याचा केविलवाणा जो प्रयत्न केला त्यामुळे सर्वत्र संतापाची लाट पसरलेली दिसते. संघ काय आहे? संघाचं कार्य काय? याचा अभ्यास अगोदर त्यांनी करायला हवा. बाकी काही असलं तरी यात्रेच्या दरम्यान त्यांना हिंदु धर्माच्या देवाधिकांची आठवण होणं हेच खरं वर्तमान सुवर्ण पर्वकाळ व्यवस्थेत होत असलेल्या बदलाचे संकेत निश्चित म्हणावे लागतील.

# राजूर येथील प्रांजल बोराडे हिचे स्वच्छ भारत मिशन सामान्य ज्ञान स्पर्धेत यश




आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या स्वच्छ भारत मिशन अभियानाचा प्रचार, प्रसार व्हावा, स्वच्छता मोहीम ही एक व्यापक चळवळ निर्माण होऊन शालेय जीवनापासून बाल मनावर स्वच्छतेचे संस्कार व्हावे या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी औरंगाबाद येथे घेण्यात आलेल्या स्वच्छ भारत मिशन सामान्य ज्ञान स्पर्धेत राजूर येथील प्रांजल बाळासाहेब बोराडे हिने द्वितीय क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व कळावे,आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याची प्रेरणा मिळावी या हेतूने जिल्हा परिषद शिक्षण विभाग,श्री भास्कराचार्य प्रतिष्ठान आणि ड्रीमलँड शिक्षण संस्था औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध गटातील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ भारत मिशन सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रांजल बोराडे हिने द्वितीय क्रमांक पटकावला त्याबद्दल ड्रीमलँड संस्थेच्या अध्यक्षा संध्या गायकवाड, प्राचार्य प्रीती देशमुख,उपप्राचार्य स्नेहा सबनीस यांच्या हस्ते प्रांजल बोराडे हिस बक्षीस व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तिच्या या यशाबद्दल प्रांजल बोराडे हीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# भोकरचे भुयारी मार्ग बनले घाणीचे केंद्र

## नागरीकांत तीव्र संतापाची लाट

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातून जाणारा मूख्य रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने वाहनांची नेहमीच तोबा गर्दी असते. यातुन सूटका करण्यासाठी रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात आले आहे. याच पुलाखालून भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. अद्याप भुयारी मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नसल्याने तिथे घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बेफीकीर असलेल्या प्रशासना बाबत नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दक्षिण भारताला जोडणारा मुख्य रस्ता हा भोकर शहरातून जातो याच मार्गावर रेल्वे गेट उभारण्यात आले आहे.वाहनाची मोठ्या प्रमाणात सतत रेलचेल असते त्यामुळे वाहतूकीची डोकेदुखी वाढली होती. यांचा गांभीर्याने विचार करून रेल्वे गेटजवळ उड्डाणपूल उभारण्यात आले आहे.पूलाच्या खालील बाजूस भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.ऊड्डाणपूलावरील वाहतूक सुरू करण्यात आली आहे पण भुयारी मार्गाची वाहतूक सुरू करण्यात आली नाहि. तिथे पाणीसाचुन दूर्गंधी पसरते आहे.याच ठिकाणी केरकचरा जमा केला जातो आहे. इथे होणा-या घाणीमुळे परीसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी संबंधित विभागाला तक्रारी देऊन समस्या वर त्वरीत तोडगा काढावा अशी मागणी रेटून धरली होती.त्या तक्रारीची अद्याप कुणीच दखल घेतली नाहि. सदरील मार्गाचे कामपुर्ण होऊन सूध्दा वाहतूक सुरू न झाल्याने नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



**दिरंगाईस जबाबदार कोण :** शहरातील रेल्वे उड्डाणपूलाच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रेल्वे विभागानी आप आपल्या हद्दीत कामे केली आहेत .ऊड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला पण भूयारी मार्ग पूर्ण होऊन ही वाहतूकीसाठी खुला केला नाही . सदरील होणाऱ्या दिरंगाईस जबाबदार कोण आहे हे मात्र अद्याप कळू शकले नाही . जबाबदारी कुणाची हि असो नागरिक आणि वाहनधारकांना होणारा हेलपाटा कमी करण्यासाठी भूयारी मार्गाचे काम तात्काळ करून होणारी गैरसोय दूर करावी अशी नागरिकांची मागणी आहे .

# डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टच्या निमंत्रित संचालकपदी हेंमत माने

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** देशातील साखर उद्योग क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या



डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या च्या निमंत्रित सदस्यपदी कादवा सहकारी साखर कारखाना लि.,मातेरेवाडी चे कार्यकारी संचालक हेंमत माने यांची निवड करण्यात आली. कराड येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे पर्यावरण व्यवस्थापक म्हणुन त्यांनी 27 वर्ष काम पाहिले आहे. दरवर्षी 12 ते 14 लाखापर्यंत होणारे ऊसाचे विक्रमी गाळप व डिस्टीलरीचे 1 कोटी लिटर होणारे आर.एस./इथेनॉल उत्पादन, प्रक्रिया होत असलेल्या कारखान्यात पर्यावरण व्यवस्थापक म्हणून काम करताना शुन्य प्रदुषण व कारखाना परिसरामध्ये पर्यावरण समतोल राखणेचे यशस्वी व्यवस्थापन केले. गेल्या दोन वर्षापासून हेमंत माने हे कादवा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक म्हणून कामकाज बघत आहेत. इथेनॉल उत्पादन वाढीसाठी शासनाचे प्रोत्साहन,उसाचे रसापासुन, बी आणि सी हेवी मोलॅसीस पासुन विविध प्रक्रिया मार्फत इथेनॉल व इतर उप पदार्थ बनविले जाते. त्याचा फायदा कारखाना ऊस उत्पादक शेतकरी व शासनाचेही उत्पन्न वाढविणेबाबत होणार आहे. ही बाब विचारात घेवुन त्यांचे अनुभवाचा फायदा सर्वांना व्हावा म्हणुन हेंमत माने यांची सदर संस्थेने सदस्यपदी निवड केली आहे.

# कल्याणनगरीत पार पडले मनस्पर्शीचे भव्य कवी संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनस्पर्शी साहित्य परिवाराचे पहिले भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन रविवार दिनांक 8 जानेवारी 2023 रोजी कल्याण येथील श्री सिद्धिविनायक गार्डन हॉल भोईरवाडी, कल्याण (पश्चिम) येथे संपन्न झाले.

मनस्पर्शी साहित्य परिवाराचे व्यवस्थापक- कवी. निखिल प्रमोद कोलते यांच्या भगिनी व मनस्पर्शी साहित्य परिवाराच्या अध्यक्षा- मा. मानसी ताई पंडित तसेच समूहाचे मार्गदर्शक, सुप्रसिद्ध लेखक प्रा. विजय काकडे या दोन्ही अष्टपैलू व्यक्तिमत्त्वांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हे भव्य काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.

संमेलनाची बहारदार सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व सुरेल स्वागत गीत गाऊन मा.मानसीताई पंडित यांनी केली,त्यांना त्यांचा भाऊ कु.मंदार पंडित ह्यांची तबल्यावर साथ लाभली. स्वागत गीत मा.डॉ. निलांबरी गानू लिखित,मा.प्रा.विजय काकडे सवरबद्धित होते. संमेलनाचे उद्घाटन दत्तात्रय शिंदे यांच्या हस्ते झाले. सुप्रसिद्ध कवियत्री- प्रा. मानसी जोशी यांची स्वागताध्यक्ष म्हणून लाभलेली उपस्थिती नवोदित कवी/कवयित्रींसाठी मोलाची ठरली. प्रमुख वक्ते म्हणून, श्री. आनंद लेले यांनी देखील मोलाचे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून,मा. कल्पना गवरे, मा. अस्मिता पंडित यांनी स्थान भूषवले. कल्पना गवरे,अस्मिता पंडित यांच्या सुंदर भाषणाने सभागृह प्रफुल्लित झाले. संमेलनाध्यक्ष म्हणून लाभलेल्या सुप्रसिद्ध कवियत्री- प्रा. प्रतिभा ताई सराफ यांचे नवोदित कवींना मार्गदर्शन तसेच संमेलनाचे आयोजना संदर्भात सर्व कार्यकारिणीला दिलेला मोलाचा सल्ला आणि त्यांनी काव्यप्रकाराचे केलेले विस्तृत विश्लेषण आणि त्यांच्या कवितांचे सादरीकरण संमेलनाचे प्रमुख आकर्षण ठरले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समूहाच्या अध्यक्षा. मा. मानसी ताई पंडित, व समूहाचे व्यवस्थापक. मा. निखिल कोलते यांनी केले. कवयित्री- सौ. सोनाली जगताप, कवयित्री- सौ. मधुरा कर्वे, कवयित्री- सौ. संपदा देशपांडे, कवयित्री- मा. जयश्री चौधरी, कवी. प्रा. विजय काकडे यांनी संमेलन यशस्वी होण्यासाठी कार्यकारणी सदस्य म्हणून आपले अनमोल योगदान दिले. एकूण ३५ निमंत्रित कवी/कवयित्रींनी या संमेलनात बहारदार काव्य सादरीकरण करून संमेलनाला चार चांद लावले. साहित्यातील गद्य व पद्य विभागातील सर्वच साहित्य कृतींना मान देऊन विविध साहित्यिक उपक्रम राबवणे हा मनस्पर्शी मुख्य हेतू असल्याचे संयोजकांकडून सांगण्यात आले.

# आजीच्या गळ्यातील सोनसाखळी चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** ६२ वर्षांच्या आजी नातवाला आणण्यासाठी शाळेबाहेरील रस्त्यावर रिक्षात बसल्या होत्या. दुचाकीवरुन आलेल्या चोरट्याने या आजींच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावली. या आजींनी चोरट्याने गळ्यातील साखळीला हिसका दिल्यावर सोनसाखळी पकडून ठेवली. आजीच्या धाडसामुळे २१ ग्रॅम वजनाच्या सोनसाखळी पैकी ६ ग्रॅम सोने चोराच्या हाती लागले. या सर्व प्रकाराबद्दलची फिर्याद रबाळे पोलीसांना दिल्यावर या आजींनी पोलीसांना हा चोर पुन्हा पाहील्यास मी ओळखीन असेही सांगीतले.

# प्रा. दादाराव चंद्रभान काटकर यांना राज्यस्तरीय यशवंत रत्न पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठानर बीडच्या वतीने



दिला जाणारा राज्यस्तरीय यशवंतरत्न पुरस्कार 2022 हा कामधेनू शिक्षणशास्त्र महाविद्यालय औरंगाबाद चे प्र. प्राचार्य दादाराव चंद्रभान काटकर यांना नुकताच जाहीर झाला. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याचा हा गौरव पुरस्कार देऊन करण्यात येणार आहे. जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष प्रा. राजेंद्र गाडेकर, नियोजन समितीचे सर्व पदाधिकारी यांनी नुकताच जाहीर केला.

प्रा. श्री. दादाराव चंद्रभान काटकर यांचे खामगाव (गो.) नगरीचे गावकरी व महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना कार्यकारणी जिल्हा सदस्य शिवाजी ढेपले व विक्रेत्यांनी स्वागत केले. कामधेनू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.श्रीनिवास दराडे,अध्यक्षा श्रीमती. रिताताई दराडे,डॉ ज्ञानदेव घुगे, श्रीआदित्य दराडे, श्री भूषण दराडे, श्रीमती डॉ.ऐश्वर्या दराडे, कॉलेज चे प्रा. आघाव विठ्ठल, प्रा. सलगर हरिश्चंद्र, प्रा. बारवाल मिना,श्री. सोनकांबळे बालाजी, श्री बंडू बुंधवंत, श्री राजू मुरकुटे, श्री कांगने परशुराम आदिनी अभिनंदन केले 'यशवंत रत्न पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्वांनी त्यांची अभिनंदन केले.



# पिंपळगाव वळणमध्ये रॅली, स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण आज आदर्श प्रा. माध्यमिक व उच्च मा.विद्यालय व ग्रामगीता मा.विद्यालय पिंपळगाव वळण येथे, जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती तथा राष्ट्रीय युवक दीनानिमित्ताने विविध कार्यक्रम घेन्यात आले. मुली स्वराज्यप्रेरीका जिजाऊंच्या वेशभूषा करून तर मुलं स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत शाळेत दाखल झाले होते कार्यक्रमाची सुरुवात भव्य फेरी काढून झाली,लेझीम स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,विज्ञान प्रदर्शन,असे अनेक कार्यक्रम घेऊन त्यांच्या जीवनचरित्र यावर विद्यार्थ्यांनी भाषणे करून उपस्थितांचे मन जिंकले,यावेळी शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी जाधव, तसेच सचिव योगेश जाधव,सहशिक्षक सचिन निर्मल, अन्सार शेख, जीवन पवार, संदीप निधोकर, वैशाली तायडे, निता गायकवाड, सविता लोखंडे,यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री काशिनाथ जाधव यांनी जिजाऊ ची वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व शिक्षकांचे मनोबल वाढण्यासाठी प्रोत्साहन दिले व शिक्षकांना सांगितले की इथून पुढच्या काळात कार्यक्रम मोठ्या प्रमाणात व उत्कृष्ट दर्जाचे व्हावे विद्यार्थ्यांपर्यंत थोर मंडळी व वीरांचे गोडवे गाण्यात यावे.



# पारोळा चौफुलीवर टोमॅटोचा ट्रक उलटला; लाखोंचे नुकसान

## सुदैवाने कुठलीही जीवितहानी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराच्या पारोळा चौफुली जवळ टोमॅटोचा ट्रक अचानक पलटी झाल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. ट्रक ड्रायव्हरला विचारपूस केले असता त्याने सांगितले की, ट्रक जास्त भरलेले असल्यामुळे आणि रोडाचा भाग उतरता असल्यामुळे मालाचा तोल एकीकडे जाऊन अचानक गाडीचे स्पेअर पार्ट तुटले व जागेवर ट्रक पलटी झाला. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव येथून जळगावच्या दिशेने जाणारा टोमॅटो ने भरलेला फुल ट्रक धुळे उलटला. यामध्ये सुदैवाने कुठलीही जीवितहानी झालेली नसून मात्र लाखो रुपयांच्या टोमॅटोचे नुकसान या अपघातात झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार पिंपळगाव येथून टोमॅटोने फुल भरलेला ट्रक हा जळगावच्या दिशेने जात असताना आज पहाटेच्या सुमारास ट्रक क्रमांक MH 04 FD 3266 या टोमॅटोने फुल भरलेला होता. झालेल्या या अपघातामध्ये सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही, परंतु जळगाव येथे विक्रीसाठी जात असलेल्या लाखो रुपयांच्या टोमॅटोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



# जीवा संघटनेतर्फे जीवा महाले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू अंगरक्षक जिवाजी महाले यांची पुण्यतिथी निमित्त धुळ्यातील अखिल भारतीय जीवा सेना यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रकाश टॉकीज लगद पूर्ण कृती पुतळ्याजवळ जीवा महाले यांच्या फोटोला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या ठिकाणी संपूर्ण अखिल भारतीय जीवा सेना संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर उपस्तित दिनेश महाले,भगवान चित्ते,सुधीर महाले, गणेश ठाकरे, घनश्याम खोंडे,नरेंद्र खोंडे, शरद सैदाने, तुषार सैदाने, राहुल सूर्यवंशी, सतिष पवार,उमेश महाले,किशोर वाघ, मनीषा चित्ते, वैशाली सैदाने,भावना सोनवणे, कल्याणी ठाकरे, भीमराव वारुडे, अमृत महाले, नाना वारुडे, संदीप निकम, विलास सैदाने, किशोर जाधव, अड विनोद बोरसे, कैलास निकम, विशाल बोरसे, ईश्वर सैदाने,भुषण पगारे, धनराज पगारे आदी समाज मान्यवर उपस्थित होते.

# लोकसहभागातून नद्यांचे पुनरुज्जीवन करावे : जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** सामाजिक जाणिवेचे भान ठेऊन लोकसहभागातून अकोल्यातील मोरणा व औरंगाबादच्या खाम नदीचे पुनरुज्जीवन केल्याबद्दल जलतज्ञ डॉ राजेंद्र सिंह यांनी जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पाण्डेय व त्यांच्या सहकार्याच्या कामाचे कौतुक करत या उपक्रमाचा आदर्श महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी घ्यावा, असे गौरवोद्‌गार काढले. जलतज्ञ डॉक्टर राजेंद्र सिंह हे जल यात्रेनिमित्त नाशिकहून औरंगाबाद येथे आले असता त्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली 'चला जाणूया नदीला' व नदी पुनरुज्जीवन विकास प्रकल्पा बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

डॉ. सिंह म्हणाले की, आस्तिककुमार पाण्डेय यांनी लोकसहभागातुन अकोल्यातील मोरणा तसेच खाम नदीचा कायापालट केला. या नद्याचे पुनरुज्जीवन करत गतवैभव प्राप्त करुन दिले आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रशासकीय प्रशिक्षण देताना अशा प्रकारच्या सामाजिक कामाचेही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या नदी स्वच्छता अभियानाला आज मूर्त स्वरूप आले आहे याबद्दल आस्तिक कुमार पाण्डेय यांचे कार्य उल्लेखनिय असून या विकास कामाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे सांगून डॉ सिंह म्हणाले की, देशाचा अमृत महोत्सव साजरा होत असताना नद्यांच्या विद्रूपीकरण आणि दुर्दशेकडे लक्ष देण्याची गरज आहे. नद्यांच्या विकासासाठी प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येत नद्यांचे पावित्र्य राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असेही ते म्हणाले.

जिल्हाधिकारी म्हणाले अकोला येथील मोरणा नदी आणि औरंगाबादच्या खाम नदीच्या सौंदर्यीकरणाच्या कामात नागरिक, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी तसेच सेवाभावी संस्था, युवक, युवती आणि विशेषतः महिलांच्या श्रमदानातून नद्यांचा कायापालट केलेला आहे. लोकांचा उत्साह, आत्मविश्वास आणि ऊर्जा यातून हे शक्य झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. अशा पध्दतीचा उपक्रम खाम, शिवना व दुधना या नद्यांच्या सौंदर्यीकरणासाठी देखील राबविण्यात येईल असेही जिल्हाधिकारी पाण्डेय यांनी सांगितले.

अकोला येथील मोरणा आणि औरंगाबादच्या खाम नदीच्या पुनरुज्जीवनाची 'विकास गाथा' चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आली. या बैठकीला सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद पंचायत समितीमधील संबंधित अधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धुळे बसस्थानकावर आतंकवादी...?

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील बसस्थानकावर दोन आतंकवादी शस्त्र घेऊन फिरत असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली व नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण पसरले व पोलिसांनी इतर फौज घेऊन घटनास्थळी येऊन त्या दोघांना ताब्यात घेतले भीतीच वातावरण निर्माण होतं त्यानंतर झालेला प्रकार लक्षात येतात नागरिकांनी सुटकेचा विश्वास सोडला.

मात्र या घटनेचा प्रकार वेगळाच होता बस स्थानकावर कुठलाही आतंकवादी घुसला नसून पोलिसांनी आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केलेले हे नाट्य अर्थात मोकड्रिल असल्याचे समजताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला या ठिकाणी जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश रेड्डी यांच्यासह शहर आणि परिसरातील सर्व पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाची असणारी तयारी आणि त्या दृष्टीने करावयाचे नियोजन या पार्श्वभूमीवर हे पॉलिसी नाट्य करण्यात आल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांनी दिली.



काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# चपण ग्रुप 29 वर्षांनी आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथील उच्च माध्यमिक प्रशाला मध्ये शिकत असलेले १९९३-- ९४ चे विद्यार्थी आणी विद्यार्थींनी यांनी आज २९ वर्षानंतर गेट टू गेट पार्टी चे आयोजन केले होते. या पार्टीचे आयोजन व्हॉट्स अँप वर 'बचपन' ग्रुप द्वारे केले गेले.ही पार्टी कन्नड येथे गजानन हेरिटेज मध्ये आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाची सुरुवात शालेय प्रार्थना पासून सुरवात केली. कार्यक्रमात एकूण ५० विध्यार्थि आणी १० विद्यार्थींनी उपस्थित होते.

सगळ्या विद्यार्थ्यांनी आपापला परीचय् दिला व दिवंगत वर्ग मित्र मैत्रिणींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शाळेतल्या २९ वर्षातील पहिल्या आठवनी वर प्रकाश टाकला. शालेय नियमानुसार मध्ये थोडा ब्रेक घेऊन सगळ्या विध्यार्थ्यांनी मध्यांतर सुट्टीत जेवणाचा आस्वाद घेतला. नंतर सगळ्यांनी संगीत खुर्ची खेळण्याचा आनंद घेतला. संध्याकाळी ठीक ५ :००वाजता या कार्यक्रमाची सांगता पसायदान घेऊन करन्यात आली. कार्यक्रमामध्ये उपस्थित विध्यार्थी बेबी जाधव, आशा जाधव, वंदना नवले, सीमा चिंधे, फरिदा पठाण, मीना बोलधाने, माया चव्हाण, वैशाली देशमुख, सुरेखा दांडेकर, ज्योती जाधव, सखाराम कुलकर्णी, सतीश कापुरे, नितीन सुराशे, आबासाहेब चव्हाण, किशोर गायकवाड, सुनिल शेवाळे इत्यादींची उपस्थिती होती.

## राजू आहिरे शिवसेना उपशहरप्रमुखपदी

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशिर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे व संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संदिपान भुमरे यांच्या सूचनेनुसार मध्य विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार प्रदीप जैस्वाल व शहरप्रमुख विश्वनाथ राजपूत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन माजी नगरसेवक तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजू आहिरे यांची बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या मध्य विधानसभेच्या उपशहरप्रमुख पदी निवड करण्यांत आली. मध्य विधानसभा मतदारसंघात आहिरे यांचे अत्यंत धडपडीचे काम असून, सतत पक्षाच्या वाढीसाठी आणि सक्षमीकरणासाठी ते मेहनत घेत असतात म्हणून त्यांची या पदांवर वर्णी लागली असे प्रतिपादन आमदार प्रदीप जैस्वाल यांनी केले. याप्रसंगी गणेश पवार, रतन आहिरे, संदीप मानकर, स्वप्नील शिरसाठ, संदीप आंधळे, उमेश नेमाडे, समाधान वाणी, विनोद साबळे, विपीन वाकेकर, प्राजक्ता राजपूत, शारदा घुले, संगिता बोरसे, रेणुका गायकवाड, संगीता सरोदे आदींसहित पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सर्वांनी राजू आहिरे यांचे अभिनंदन केले तर या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रीडा आदी सर्वच क्षेत्रातुन कौतुक होत आहे.

## विद्यार्थ्यांनी व्यावसायिक बनावे : प्राचार्य चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबेजोगाई संचलित स्वा सावरकर



माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीड विज्ञान कला व व्यवसाय अभ्यासक्रम विभागमध्ये व्यवसाय मार्गदर्शन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. डॉ. दीपक देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षण हे महत्वाचे आहे. यातून स्वतःमध्ये कौशल्य विकसित करुन भारतात कौशल्य विकासास भारत सरकारने प्राधान्य दिले आहे. व्यवसाय क्षेत्र निवडून भविष्यात यश संपादन करावे. व्यवसायातून रोजगार निर्माण करणारे बनावे अध्यक्षीय समारोप प्राचार्य विजेंद्र चौढरी यांनी मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले की विद्यार्थ्यानी शिक्षण घेवुन (SKILL DEVELOPMENT ) विद्यार्थ्यात SKILL असते याचा शोध घेवुन ते विकसित करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यानी कौशल्य विकसित करावे यात भाषा कौशल्य हिंदी इंग्रजी वर पकड असावी संवाद कौशल्य आत्मसात करावे व विद्यार्थ्यानी व्यवसायिक बनावे व या क्षेत्रात निश्चित यश मिळेल. सुत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा शशिकांत पसारकर यानी केले आभार प्रदर्शन प्रा. मोहन मंकले यानी केले. यावेळी व्यासपिठावर प्राचार्य विजेंद्र चौधरी, प्रा. बाळासाहेब साळवे व प्रा. डॉ. दीपक देशमुख यांची उपस्थिती होती.

## संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या वार्षिक दिंडीचे सुलतानपूरातून येथून त्र्यंबकेश्वराकडे प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** ता.खुलताबाद, श्री संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी सोहळ्याच्या शुभारंभ शुक्रवार दि.१३ रोजी वेरुळ येथुन श्री संत शांतिगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात करण्यात आला. प्रथम सत्रात सुलतानपूर येथे संत जनार्धन स्वामी महाराज भक्त परिवार तर्फे दिंडीचे भव्य दिव्य असे स्वागत करण्यात आले,

दिंडीचे वेरूळ येथुन श्री संत शांतिगिरीजी महाराज यांचे आगमन होण्यापूर्वी सुलतानपूर बसस्थानक पासून प्रवचन स्थळाच्या नियोजित जागे पर्यंत दोन किलोमीटर पर्यंत रांगोळी काढण्यात आल्या होत्या, तर लेझीम पथक,बँड पथक यांच्या वाद्याच्या गजरा मध्ये दिंडीचे स्वागत करण्यात आले.ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करूण या पालखी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात स्वागत करूण या दिंडीचे संपूर्ण गावामध्ये गावामध्ये मिरवणूक काढण्यात आली.यावेळी ठिकठिकानी महिलांनी पालखीचे पूजन करुन दर्शन घेतले. यात दिंडी सोहळ्या मध्ये चांदीचा रथ भाविकांचा विशेष आकर्षण ठरला होता,या दिंडी सोहळ्यामुळे गावामध्ये मंगलमय वातावरण तयार झाले होते.



प्रत्येक माणसाला जीवनामध्ये गुरुची आवश्यकता असून गुरूने दाखवलेल्या मार्गावर प्रामाणिकपणे चालून सार्थक करून घेण्याचे प्रतिपादणं महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी प्रवचन करतानी केले.या प्रसंगी जय बाबाजी भक्त विनय मते यांनी शांतिगिरीजी महाराज यांची फळ तुला केली .तर शांतिगिरीजी महाराज यांच्या पूजेसाठी संजय नानासाहेब चव्हाण यांच्या शेतामध्ये आकर्षक कुटिया उभारण्यात आली होती. संत जनार्धन स्वामी यांच्या कालखंडा पासून वेरूळ त्र्यंबकेश्वर येथील निवृत्ती महाराज यांच्या समाधीस्थळा पर्यंत दिंडीची परंपरा आहे. तीच पंपरा स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी चालू ठेवली आहे.

## लोककलावंतांचे उपोषण मागे, महिनाभरात कोरोना अनुदान पॅकेजचे वाटप होणार...!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** येत्या महिन्याभरात राज्यातील लोककलावंतांना कोरोना अनुदान पॅकेजची आर्थिक मदत देण्यात येईल. तमाशा सम्राज्ञी कै. विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक उभे करण्यासाठी लवकरच मंत्रीस्तरावर बैठक आयोजित केली जाईल.असे आश्वासन सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात यांनी आमरण उपोषणाला बसलेल्या लोकनाट्य, लोककलावंत मराठी परिषदेच्या शिष्टमंडळाला आज मंत्रालयात झालेल्या एका बैठकीत दिले. त्यामुळे सदर आंदोलन मागे घेण्यात आले. लोकनाट्य,लोककलावंत मराठी परिषदेचे अध्यक्ष संभाजीराजे जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळ पासून आझाद मैदानावर राज्यातील लोककलावंतांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले होते या आंदोलनात शेषराव गोपाळ(धुळे), हसनशेख पाटेवाडीकर(नगर), रेखा पाटील कोल्हापूरकर, राजेश काशीद,गणेश डोंगरे, सुनिल वाडेकर (कराड), सुभाष जाधव वगसम्राट दादु इंदूरीकर प्रतिष्ठानचे(मुंबई) सरचिटणीस अशोक सरोदे (इंदूरीकर), लोककलेचा अभ्यासक बाबाजी कोरडे यांच्यासह आदी कला क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलिस संरक्षण देणे, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड समिती बरखास्त करणे, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या परवाने एक



खडकी योजने अंतर्गत आणणे. लोककलावंतांच्या मानधनात वाढ करणे, निवडणुकीच्या काळात आचार संहितेच्या बाबतीत पोलीस खात्याकडून होणार त्रास कमी होण्यासाठी निवडणूक आयोगाला पत्रव्यवहार करणे.आदी मागण्यांवर आज मंत्रालयात सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात यांच्या दालनात सविस्तर चर्चा झाली. संघटनेचे अध्यक्ष श्री.जाधव यांनी सदर बैठकीत आपली भूमिका ठाम मांडली. यावर सरकार निश्चित सकारात्मक निर्णय घेईल. असे आश्वासन यावेळी श्री.थोरात यांनी उपोषणला बसलेल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. दरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष श्रीमती रेखा ठाकूर यांनी एका पत्रकाव्दारे या आंदोलनाला जाहीर पाठींबा दिला.

## बांधकामाच्या आवारातून विद्युत मोटारची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील घर बांधकाम चालू असलेल्या बांधकामाच्या आवारातून चोरट्यांनी पाच हजार रुपये किंमतीची विद्युत मोटार चोरून नेल्याची घटना आमखेडा येथील गोपाळ राजाराम पाटील यांच्या घर बांधकाम चालू असलेल्या बांधकामाच्या आवारात घडली. याप्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोयगाव तालुक्यातील आमखेडा येथे फिर्यादी गोपाळ राजाराम पाटील यांचे घराचे बांधकाम चालू असलेल्या बांधकामाच्या आवारातून रात्रीचा अंधाराचा फायदा घेऊन चोरट्यांनी बांधकामाच्या आवारात चोरी केली. पाण्याची मोटर केबल चोरट्यांनी चोरून नेली. पाच हजार रुपयांची मोटार व ५ हजार रुपयांची केबल असा एकुण सहा हजार रुपयांचे साहित्य चोरून नेले. याबाबत बांधकामाच्या आवारात चोरी झालेली विद्दुत मोटारींची गोपाळ राजाराम पाटील यांनी सोयगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून सोयगाव पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा गु.र.नं.११/२०२३ कलम ३७९,३४ भा.द.वि.दाखल करण्यात आला आहे. सपोनि अनमोल केदार याच्या मार्गदर्शनाखाली तपास अंमलदार बर्डे करीत असतांनाच सदर गुन्ह्याचे तपास करीत असतांना आरोपी चेतन राजेंद्र सोनवणे वय २३, दिनेश दिलीप घुसले वय ३० , बाबासाहेब कैलास नेरपागरे वय २८ वर्ष सर्व रा काळेनगर सोयगाव यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास सपोनि अनमोल केदार सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अंमलदार बर्डे करीत आहे.

# 22 हेक्टर क्षेत्रावर कुऱ्हाड; वन विभागाचे दुर्लक्ष

## सोलापूर -धुळे महामार्ग लगत वन खात्याच्या हद्दीतील लाखोंच्या झाडाची अज्ञातांकडून कत्तल

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** राज्य शासनाकडून दरवर्षी वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येते. मात्र आपल्या सोयीसाठी माणूस वृक्षाचा मित्र राहिला नसून शत्रू बनला आहे व बेसुमार वृक्षतोड दिवसेंदिवस वाढत असल्याने वन खात मात्र याबाबत डोळ्यावर पट्टी व कानावर हात ठेवून आहे. असंच पर्यावरण प्रेमी मधून बोलले जात आहे. जिल्ह्यातील वाशी तालुक्यामधील तेरखेडा शिवारातील तब्बल 22 हेक्टर क्षेत्रावर अज्ञात समाजकंटकाकडून लाखो झाडांची कत्तल करून वन विभागाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला आहे.
संपूर्ण वृक्ष बुडासकट तोडून संबंधित वन विभागाचे क्षेत्र ताब्यात घेऊन जागोजागी तंबू ठोकण्यात आलेले आहेत. डोळ्यात समोर संपूर्ण वनक्षेत्र भुईसपाट करून संबंधित जमीन हडपण्याचा प्रयत्न अतिशय निंदणीय असताना वन विभागाचे कर्मचारी कुठल्या बंदोबस्ताची वाट पाहत बसले आहेत. हे मात्र कळायला मार्ग नाही.
बेसुमार वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्यास सुरुवात झाली आहे. त्याचे परिणाम दिवसेंदिवस वाढत्या तापमान वाढीने दिसून येत आहेत. जिल्ह्याचा तापमान वाढीबद्दल विचार केल्यास मार्च महिन्यापासूनच तापमानाचा पारा वाढत आहे. उष्णतेच्या तीव्र झळांनी नागरिक होरपळत आहेत. त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात नागरिकांनी स्वतः वर्षे लागवड आणि संगोपन करणे गरजेचे आहे. याबाबत जिल्ह्यातील काम चुकार अधिकाऱ्यांमुळे हे चित्र उलट दिसत आहे. वृक्ष लागवड करण्याऐवजी आहे, तेच वृक्षतोड करून गायरान जमीन बळकवण्याचा प्रयत्न कोणाच्या पाठिंबाने होतो हे कळायला मार्ग नाही. याच्यावर लवकरच आळा  घालण्यात आला नाही तर,उस्मानाबाद जिल्ह्याचा वाळवंट व्हायला उशीर लागणार नाही. उद्या जरी तगडा बंदोबस्त लावून अज्ञात समाजाकडून बळकवलेली जमीन वनविभागाने ताब्यात घेतली तरी तोडलेली झाडे पुन्हा वापस कधी येणार का? वर्षानुवर्ष जुन्या झाडांची अवैध वृक्षतोड  अगदी प्रशासनाच्या नाकासमोर करण्यात येत आहे. तरीही प्रशासनातील अधिकाऱ्यांना आपल्या कर्तव्य दक्षतेचा घाम फुटत नसल्याचे संताप जनक चित्र आहे.








# लोणी सावखेडा ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी पुष्पा दांडेकर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील लोणी ग्रामपंचायतला उपसरपंचांसह चार जागा बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) श्रीमती. पुष्पा बळीराम पाटील दांडेकर यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड. तसेच पुरुष उमेदवार संतोष शेषराव  दांडेकर, ज्योती घनश्याम वाडेकर, सरपंच व बिनविरोध निवडून आलेल्या इंदुबाई सुदाम गायकवाड यांनी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गटा  मध्ये प्रवेश केला. या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे खुलताबाद तालुक्याचे उपाध्यक्ष . ज्ञानेश्वर पाटील दांडेकर यांनी त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी बळीराम पाटील दांडेकर, घनश्याम वाडेकर, सुदाम गायकवाड, नाना काका दांडेकर, प्रभाकर दांडेकर, कृष्णा दांडेकर,भाऊसाहेब दांडेकर, अरविंद दांडेकर, नितिन दांडेकर, दिपक दांडेकर आदी उपस्थित होते.

# नामाविस्तार दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव** : तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सचिव व संचालक मंडळ उपस्थित होते संस्थेचे कार्याध्यक्षनारायण रायभान कोलते यांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादाचे नामविस्तार करण्यात आले. त्याबद्दल प्राध्यापक पंजाबराव शेळके यांनी सविस्तर माहिती दिली. या नामविस्तार दिनामध्ये शहीद झालेल्या सर्वांना अभिवादन करून या लढ्यासाठी हुतात्मा बहाल केलेल्या नेतृत्वांचे आभार मानण्यात आले व हा



नामविस्तार दिन आजही औरंगाबाद येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून विद्यापीठ सलग्न सर्व महाविद्यालयात नामविस्तार दिनाचे कार्यक्रम साजरे केले जातात याप्रस याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यातील प्राचार्य जयराम घोती शिक्षकबंधू विकास पाटील प्रा.जीवन कोलते, विजयसिंह राजपूत भास्कर ससाने विनोद जाधव सुदाम राठोड पोपटराव सोनवणे शिवाजी सत्रे व प्राध्यापक योगेश थोटे दीपक सिसोदे किशोर चोपडे योगेश राठोड सुनील कुमार चव्हाण योगेश शेळके प्रवीण महाले अनिता घोडके संजय अमृतकर हिरालाल सोनवणे अनिल सुरडकर मनोहर पडोळ सतीश गावंडे मोहन बोरे सतीश खवले गणेश मोहने सुभाष राठोड विकास पंडित व इतर शिक्षकेतर कर्मचारी विनोद राठोड राहुल बडक गजानन चव्हाण उपस्थित होते.अशी माहिती प्रा.जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले.

# थरारक अनुभव देणारा उत्कंठावर्धक 'व्हिक्टोरिया

आधुनिक केसरी

**हॉरर म्हटलं की त्याचा वेगळाच प्रेक्षकवर्ग असतो. शक्यतो, भयपट कुटुंबासह पाहिले जात नाहीत. मात्र, एक वेगळा पायंडा 'व्हिक्टोरिया'च्या निमित्तानं पडलाय. 'फॅमिली हॉरर' असा हा प्रकार म्हणता येईल. भूताने पछाडलेल्या हॉटेलमधून कसे बाहेर पडणार आशय-सोनाली? हेच 'व्हिक्टोरिया' चित्रपटाचे थरारक कथानक आहे. प्रेक्षकांच्या अंगावर काटा आणणारा असा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला आहे.**

एकूणच भारतामध्ये सस्पेन्स – हॉरर चित्रपट अभावानेच बनतात. जे बनतात त्यातले बहुतांश चित्रपट रहस्यमय किंवा भयप्रद न वाटता कंटाळवाणे, रटाळ किंवा हास्यास्पद वाटतात. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे चित्रपटाला भयप्रद किंवा रहस्यमय बनविण्याच्या नादात चित्रपट मूळ कथेपासून भरकटत जातो. अनेकदा यामध्ये चांगल्या कथानकाचीही वाट लागते. अर्थात यालाही अपवाद काही चित्रपट आहेतच. पण यामध्येही दाक्षिणात्य चित्रपटांचा वरचष्मा आहे. परंतु मराठीमध्येही काही उत्तोमोत्तम भयपट बनले आहेत ज्यामध्ये भय, उत्कंठा आणि रहस्याची उत्तम गुंफण करण्यात आलेली आहे. असाच एक नुकताच प्रदर्शित झालेला चित्रपट 'व्हिक्टोरिया'..

निर्माता आनंद पंडित, रूपा पंडित आणि अभिनेता पुष्कर जोग यांच्या बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित 'व्हिक्टोरिया' हा मराठी चित्रपट  प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अभिनेता विराजस कुलकर्णी हा या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. विराजस आणि जीत अशोक यांनी मिळून या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. प्रेक्षकांच्या अंगावर काटा आणणारा थरारक अनुभव देणारा असा हा चित्रपट आहे. युकेमधील 'व्हिक्टोरिया' नावाच्या एका आलिशान हॉटेल पासून सिनेमाची सुरुवात होते. हॉटेलमध्ये रेणुका नावाच्या एका स्त्रीचा मृत्यू झालेला असतो. सोनाली कुलकर्णी आणि आशय कुलकर्णी हे दोघे हॉटेलमध्ये राहायला जातात आणि या कथेतील थरार सुरू होतो. ती दोघं या हॉटेलच्या प्रतिबंधित जागेत जाण्याचा प्रयत्न करतात पण तेवढ्यात पुष्कर जोक त्यांना आडवतो. तेव्हापासून सोनालीला त्या हॉटेलमध्ये रेणुकाचे भूत दिसायला लागतं. ती दोघे हॉटेलमधून कशी बाहेर पडणार आणि त्या भूताचं पुढे काय होणार हे चित्रपट पाहिल्यावरच कळेल.लेखन आणि अभिनयानंतर दिग्दर्शनाकडे वळलेला विराजस कुलकर्णी आणि त्याचा मित्र जीत आकाश यांनी पदार्पणातच हॉरर मिस्ट्री थ्रिलर हा काहीसा आव्हानात्मक जॉनर हाताळला आहे. चित्रपटाची कथा स्कॉटलंडमध्ये घडत असून, तिथे घडलेल्या मिस्ट्रीचा थरारक शैलीत पर्दाफाश करण्याचं काम दिग्दर्शक द्वयींनी केलं आहे. त्यांना मिळालेली कलाकारांची उत्तम साथ हे या चित्रपटाचं सर्वात मोठं वैशिष्टय आहे. चित्रपटाची कथा अंकिता आणि सिद्धार्थ या जोडप्याभोवती गुंफण्यात आली आहे. सिद्धार्थच्या वडिलांच्या सांगण्यावरून दोघंही आराम करण्यासाठी स्कॉटलंडमध्ये आपल्या अधिराज काकांच्या घरी येतात. अधिराज दोघांना घेऊन बऱ्याच दिवसांपासून बंद असलेल्या व्हिक्टोरीया हॉटेलवर जातो. तिथे तो एकटाच रहात असतो. हॉटेलमध्ये पोहोचल्यावर अंकिताला तिथे कोणते तरी भास होऊ लागतात. सिद्धार्थ त्याकडे दुर्लक्ष करतो, पण अंकीताचं मन काही मानायला तयार नसतं. त्या रहस्याचा शोध घेत ती हॉटेलमधील




निर्बंधीत क्षेत्रात जाते. त्यानंतर काय घडतं ते चित्रपटात आहे.मिस्ट्री असल्यानं अखेरच्या क्षणापर्यंत रहस्य उलगडू न देण्याचं काम विराजसनं पटकथेत केलं आहे. कित्येकदा संभ्रमात टाकणारे आणि पुढे नेमकं काय घडणार आहे याचा थांगपत्ता न लागू देणारे संवाद यात आहेत. चित्रपटाची गती सुरुवातीपासूनच काहीशी मंद वाटते. नायिकेला असलेल्या आजारामुळे आराम करण्यासाठी नायकासोबत तिचं स्कॉटलंडला येणं यामुळे हा चित्रपट म्हणजे काहीशी शॉकींग ट्रीटमेंट असण्याशी शक्यता वाटते, पण क्लायमॅक्समध्ये काहीसं वेगळं आणि आश्चर्यकारक चित्र पहायला मिळतं. सुरेख कॅमेरावर्क आणि नेहमीपेक्षा वेगळं पार्श्वसंगीत यात आहे. चित्रपटात मुख्य कॅरेक्टरखेरीज कोणी नसले तरी संपूर्ण स्कॉटलंड शहरात, तिथल्या रस्त्यांवर लॉकडाऊनसदृश परिस्थिती का भासवण्यात आली ते समजत नाही. क्लायमॅक्समध्ये नायिकेला अंर्तज्ञानानं सर्व काही समजतं आणि ती खलनायकासमोर त्याच्या कृत्याचा संपूर्ण पाढा दिव्यदृष्टी प्राप्त झाल्याप्रमाणे वाचून दाखवते हे पचवणं थोडं अवघड जातं. हॉटेलमध्ये एकही माणूस कामाला नसूनही अधिराजचं स्टाफबाबत सांगणं खटकतं.आणि त्या हॉटेलमध्ये स्टाफ दिसत देखील नाही. दिग्दर्शनात काही उणीवा राहिल्या असल्या तरी विराजस आणि जीतचा पदार्पणातील प्रयत्न चांगला झाला आहे. तांत्रिकदृष्टया चित्रपट सक्षम आहे.या हॉरर चित्रपटात गाणे चित्रपटात गाणे नाहीये त्यामुळे सिनेमाची पकड टिकून राहते व उत्तरोत्तर उत्कंठा वाढत जाते.एक वेगळीच सोनाली कुलकर्णी यात पहायला मिळते. अंकीताची भूमिका तिनं खूप मेहनतीनं साकारली आहे. आशय कुलकर्णीचं कॅरेक्टर थोडं बिनधास्त असून, त्यानं त्याच शैलीत ते साकारलं आहे. पुष्कर जोगचं एक वेगळं रूप या चित्रपटात पहायला मिळतं. अभिनयाच्या दृष्टिकोनातून काहीसा परिपक्व होत असलेल्या पुष्कर यात दिसतो.सिनेमातील त्याचा लूक देखील भावतो. सर्वच कलाकारांनी चांगलं काम केलं आहे. उत्तम आधुनिक तंत्रज्ञान, वेगळ्या धाटणीची कथा या भरवशावर मराठीतही उत्तम भयपट निर्माण होऊ शकतो, हे या चित्रपटातून सिद्ध झालंय असं वाटतं.जशा चांगल्या बाजू, तशाच थोड्या कमतरताही जाणवतात.
काही प्रसंग संथ आहेत, ते 'कॉम्पॅक्ट' करता येऊ शकले असते, असं वाटतं.सुरुवातीला सिनेमाच्या कथानकात शिरायला थोडा वेळ लागतो पण नंतर एकेक प्रसंग कळू लागतात. पहिल्या भागातपेक्षा दुसऱ्या भागात थरार अधिक जाणवतो, उत्सुकता ताणली जाते. दुसरा भाग अधिक रोमांचक, भयकारी झालाय, असे वाटतं.दुसऱ्या भागातील काही दृश्ये अंगावर येतात.बॅकग्राउंड संगीत अप्रतिम झाले आहे. मात्र, सर्व काही अधिकच जलद गतीनं होतं. तरीही, कथेवरची पकड सुटत नाही. पटकथा, संवाद, अभिनय, दिग्दर्शन, सिनॅटोग्राफी, लोकेशन्स या सर्व सिनेमाच्या सकारात्मक बाजू आहेत.तर क्लायमॅक्समधील काही उणीवा, सिनेमाची मंदावलेली गती यामुळे थोडे लक्ष विचलित होते. थोडक्यात सांगायचे तर पदार्पणात दोन नवोदित दिग्दर्शकांनी प्रेक्षकांना थरारक अनुभव देण्याचा चांगला प्रयत्न केला असल्याने उणीवांकडे दुर्लक्ष करून हा चित्रपट एकदा पहायला हवा.